साप्ताहिक

# माणूस

१ मार्च १९८५/२ रुपये



## पिंपरी-चिंचवडचा चेहरा बदलणारा नवा उपक्रम



## प्रत्येक क्षण अभिनयाचा

साप्ताहिक

# माणूस

¤

वर्ष : चोविसावे

अंक : एकेचाळिसावा

¤

९ मार्च १९८५

किंमत : दोन रुपये

¤

संपादक

श्री. ग. माजगावकर

¤

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

मेधा राजहंस

¤

वार्षिक वर्गणी

साठ रुपये

¤

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही

¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले

¤

: पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४४३४५९

¤

मुखपृष्ठ

सुरेश नावडकर

## सप्रेम नमस्कार..

¤ प्रचलित नियतकालिकांचे माझे वाचन शून्यप्राय आहे. आपल्या साप्ताहिकाचा २३ तारखेचा अंक माझ्या हाती योगायोगाने आला. त्यातील पृ. १८–२६ वरील चिपळूणकर चरित्राबद्दलच्या श्री. रघुपती भट्ट याच्या लेखाकडे लक्ष गेले. त्या निमित्ताने लिहावेसे वाटले.

मथळयामध्ये 'लक्ष्मण कृष्ण चिपळूणकराच्या शब्दात' असा स्पष्ट उल्लेख आहे आणि श्री. भट्ट यांनी पृ २८ च्या डाव्या रकान्यात म्हटले आहे की, उपसहारात लक्ष्मण कृष्ण चिपळूणकर लिहितात की... परंतु उजव्या रकान्यात त्यानीच हे पुस्तक लिहिले असावे, असेही लिहिले आहे. (लेखकाने आपले नाव दिले नाही तेव्हा श्री. भट्ट याचे हे भाष्य योग्यच आहे.) मात्र पृ. १९ वरील 'संपादकीय' (?)' नोंदीत 'असा अंदाज आहे' असे बोटचेपे लिहिले आहे.

हे चरित्र लक्ष्मण कृष्ण यांनीच लिहिलेले आहे याबद्दल समकालीनांची भरपूर लेखी साक्ष आहे. लक्ष्मण कृष्ण हे अकोला येथे सरकारी शिक्षक असत आणि या धाकटया भावाशीच विष्णू कृष्ण याचे विशेष रहस्य असे. उभयतामध्ये नित्य पत्रव्यवहारही होता. पृ. २१ वरील फोटोमध्ये (आणि पृ. १८ वरील उतान्यात) हेडमास्तर हायस्कूल असे आहे. त्याचा अर्थ 'हेडमास्तर, सरकारी हायस्कूल, अकोला' असा समजावयाचा. पृ. १८ वर 'चरित्र लिहिण्याची इच्छा व्यक्त करणारा' म्हणून विष्णुशास्त्र्याच्या ज्या शिष्याचा उल्लेख आहे तो शिष्य म्हणजे हरि नारायण आपटे (१८६४–१९१९). विष्णुशास्त्र्यांच्या न्यू इंग्लिश स्कूलचे आपटे हे पहिले विद्यार्थी, आणि त्याना शास्त्रीबुवांबद्दल मोठी आदरभक्ती होती. १८८२ मध्ये शास्त्रीबुवा मरण पावले तेव्हा त्यांनी लिहिलेली 'शिष्यजनविलाप' ही कविता कित्येक वर्षे नावाजली जात असे आपटयाना लेखनाची हौस मनावर, आणि प्रस्तुत चरित्र होण्याआधीच १८८६ पर्यंतच आपटे हे मराठीतील एक 'नवे' श्रेष्ठ लेखक म्हणून गणले जात असत. त्यांना ते (चरित्र) लिहिता येणार नाही असे लक्ष्मण कृष्ण यांनी सांगितले त्याला एक कारण म्हणजे, लक्ष्मणरावांना जी थोरल्या भावाबद्दलची सर्वांगीण माहिती होती ती हरिभाऊना असणे शक्य नव्हते आणि सागितलेल्या माहितीवरून चरित्र कसे काय लिहिले जाईल याबद्दल संदेह लक्ष्मणरावांना होता. या संदेहाचे कारण आणि 'तुम्हाला चरित्र लिहिता येणार नाही' असे लक्ष्मणरावांनी सांगण्याचेही कारण म्हणजे हरिभाऊ सुधारक पक्षाचे कट्टे पुरस्कर्ते होते आणि सुधारकांमध्ये विष्णुशास्त्र्याचे टीकाकार अधिक असत. विष्णुशास्त्र्याची 'सनातनी वृत्ती' म्हणन जी म्हणतात तिच्याकडेच जास्त लक्ष दिल्यामुळे शास्त्रीबुवांच्या इतर कार्याकडे दुर्लक्ष करण्याची त्यांची वृत्ती असे. त्यामुळे हरिभाऊ शास्त्रीबुवांना कसा न्याय देतील याबद्दल लक्ष्मणरावांना आशंका असणे साहजिक आहे.

पुस्तक एक जून १९८४ साली (रोजी) प्रसिद्ध झाले असावे असे श्री भट्ट पृ. १८ वर लिहितात आणि पृ. २६ वर उपसहार १ जून १९८४ साली (रोजी) लिहिला आहे त्यावरून पुस्तकाचा प्रकाशन दिनांकही तोच असावा असा तर्क लिहितात. अगदी परवापर्यंत पुस्तकाला प्रकाशन दिनाक, उद्घाटन इत्यादी सोपस्कार केले जात नसत. (माझ्या स्वत.च्या एका पुस्तकावर सर्वत्र डिसेंबर १९७९ छापलेले आहे. परंतु बाधणी वगैरे पुरी होऊन पुस्तक मार्च-एप्रिल १९८० मध्ये केव्हा तरी बाहेर पडले.)

हे चरित्र १९८१ मध्येच लिहून तयार झालेले होते. त्याला प्रस्तावना लिहावी अशी विनती लक्ष्मण कृष्ण यानी शास्त्रीबुवाचे शाळेपासूनचे मित्र, वऱ्हाडातले एक थोर शिक्षक, मराठी कवितेला नवे (इग्रजीच्या विषयवळणाचे) रूप देणारे कवि, निबंधकार, टीकारार, श्री. विष्णू मोरेश्वर महाजनी (१८५१–१९२३) यांना केली होती. तिचा सभ्य पण स्पष्ट अव्हेर महाजनी यांनी केला. त्याबाबतीतले महाजनी यांनी १६ जानेवारी १९८२ रोजी जळगाव येथून लक्ष्मणरावाना लिहिलेले पत्र प्रसिद्ध आहे आणि महत्त्वाचेही आहे. (पत्र इग्रजीत आहे.)

महाजनी याचे म्हणणे असे की, विष्णुशास्त्र्याच्या मताबद्दलची माझी वृत्ती समरस सहानुभूतीची नाही. म्हणून मी यथान्याय प्रस्तावना लिहू शकणार नाही. निबंधमाला चालू असताना मी विष्णुपंतांना कैकवार पत्रे धाडली आहेत की तुमची टीका एकांगी आणि भाषा कडक आहे, असे महाजनी म्हणतात हे महाजनी यांनी लोकहितवादी आणि दयानंदस्वामी यांच्या संदर्भात लिहिलेले आहे. ( फुल्याचा उल्लेख महाजनी यांनी केला नाही. ) दयानंदाबद्दल महाजनी विस्तार करीत नाहीत; परंतु लोकहितवादी ( गोपाळ हरी देशमुख, १८२३–१८९२ ) यांजबद्दल सांगतात की शास्त्रीबुवांनी जी आणि जेवढी टर उडवली तेवढी आणि तशी टर उडवावी असे लोकहिवादींचे कार्य नव्हते. आणि शिवाय लोकहितवादींचे कार्य त्या टीकानिबंधाच्या काळी पार विस्मृतीमध्ये गेलेलं होते आणि म्हणून त्या तशा टीकेची काही गरजच नव्हती तुम्ही लोकांना पुढे न्यावे त्याऐवजी कित्येक बाबतीत लोकांचे दुराग्रह सांभाळत रहाता, असे माझे म्हणणे मी विष्णुपंतांना सांगत असे, असेही महाजनी लिहितात विष्णुपंत अंधश्रद्धाळू, सनातनी नव्हते, प्रचलित दुराग्रहावर त्यांनी बराच हल्लाही केलेला आहे विष्णुपंत हे खरे देशभक्त होते, प्रगत महान विचार चपखलपणे उत्तम शैलीने व्यक्त करण्याची क्षमता मराठी भाषेमध्ये आहे हे विष्णुपंतांनी स्वतःच्या उदाहरणाने दाखवून दिले, इत्यादी गुण महाजनी वाखाणतात. परंतु शेवटी म्हणतात की, ' लोकभ्रम ' 'आमच्या देशाची स्थिती' ' इतिहास ' 'डॉ. जॉन्सन' असे निबंध लोक आता ( १८९२ मध्ये ) विसरले आहेत आणि लोकहितवादी आणि दयानंद यांजवरील शास्त्रीबुवांनी केलेली झणझणीत टीका काय ती लोकांच्या स्मरणात आहे, पत्राच्या समारोपामध्ये महाजनी म्हणतात की विष्णुपंतांच्या कार्याची यथायोग्य यथान्याय साक्षेपी समीक्षा होण्याचा काळ अजून आलेला नाही.

या पत्राबद्दल मी विस्तार केला कारण ते मला अनेक दृष्टींनी महत्त्वाचे वाटले आणि १८८१ मध्येच पुस्तक लिहून तयार झाले होते याला महाजनी यांच्या पत्राच्या तारखेची साक्ष आहे

— ज्याचे संस्कृत भाषेचे (इंग्रजी) व्याकरण डॉ. भांडारकरांसारख्या विद्वानांना आपापला सुलभ व्याकरणपुस्तके करण्याला प्रेरक ठरले ते थोर संस्कृतज्ञ प्रो डॉ. किल्हार्न, थोर गणिततज्ज्ञ, ज्योतिर्गणिताचे अधिकारी विद्वान्, इंग्रजाच्या बरोबरीने प्रोफेसरकीचा मान मिळविणारे आद्य–विद्यार्थीप्रेमी निष्णात – शिक्षक, उत्तम संगीतज्ञ आणि नाट्यमर्मज्ञ प्रो. केरो लक्ष्मण छत्रे, जुन्या शास्त्रीमंडळींनी आणि नव्या इंग्रजीशिक्षित संस्कृततज्ज्ञांनी आदरिलेले प्रो अनंतशास्त्री पेंढारकर, ऐतिहासिक पवाड्यांचा आद्यसंग्रह–हॅरी आर्बुथनॉट ऑक्वर्थ यांच्या सहकार्याने आणि प्रोत्साहनाने छापून प्रसिद्ध करणारे शंकर तुकाराम शाळिग्राम, अशा महत्त्वाच्या व्यक्तींचा उल्लेख या परिचयलेखामध्ये ' किलहॉर्न हे गृहस्थ ', ' केरोपंत नाना छत्रे नावाचे गणिताचे प्राध्यापक ', ' पेंढारकर नावाचे शास्त्री ', ' शाळिग्राम हे गृहस्थ ' अशा प्रकारे केला आहे. त्यामुळे मोठी मौज वाटली त्याचप्रमाणे, तत्कालीन हूड विद्यार्थ्यांच्या व्रात्यपणाच्या वर्णनावरून लेखक श्री भट्ट यांना हल्लीच्या ' रॅगिंग ' ची आठवण झाली हे पाहूनही, गेल्या पन्नास–साठ वर्षांमध्ये लोकमानस किती पालटले आहे हे जाणवले.

पृ. २५–२६ वर आहिताग्नि शंकर रामचंद्र राजवाडे यांचा जो उल्लेख केला आहे तो अनावश्यक आणि अप्रयुक्त वाटला. राजवाडे यांचे आत्मचरित्र मी वारकाईने वाचले आहे, ते अतिशय अहंमन्यवृत्तीने आणि उथळपणे लिहिलेले आहे, असे माझे मत झाले आहे; पण ते वेगळे. विष्णुशास्त्र्याच्या नानाविध शैलीचा वारसाराही राजवाड्यांच्या लेखणीला नाही श्री. भट्ट यांनी हा उल्लेख का केला, तर त्यांच्यावर निबंधमालेचा सखोल परिणाम झाला याची साक्ष त्यांनी (राजवाड्यांनी) दिली आहे म्हणून. अशा एखाद्या व्यक्तीच्या साक्षीची गरजच काय होती ? मराठी वाङ्मयाचे अवलोकन करणाऱ्या प्रत्येक पुस्तकात तशा मतलबाचा मजकूर भरपूर सापडेल निबंधमाला संपूर्ण राजवाड्यांच्या संग्रही होती यातही आगळे असे काही नाही.

शास्त्रीबुवांची भाषा घाटावरची महाराष्ट्रभाषा होती, तिलाच पुण्याची मराठी असे नाव आहे हे श्री. भट्ट यांनी लिहिले ते बरे केले कारण पुणे, पुणेरी, सदाशिवपेठी इत्यादी शब्दांना गेल्या कित्येक वर्षांमध्ये एक खोचक अर्थ दिला गेला आहे–आणि त्याला जी कारणे आहेत ती भाषाविषयाच्या

मलपृष्ठ १ वर

## पुणे वार्ता

# ' कॉंटिनेंटल ' चा नवा, चांगला उपक्रम

लेखन–प्रकाशन व्यवसाय एकमेकाला खूप देणारा–घेणारा आहे एकाच वेळी लेखक–प्रकाशक मोठे होत असतात सुरुवातीच्या जम बसण्याच्या काळात एकमेकाला देण्यात आणि घेण्यात विवेकबुद्धी शाबूत असते, कोरडी व्यावहारिकता माहीत नसते. एकमेकाच्या आधाराने वर जाण्याची उमेद असते आणि त्याहीपेक्षा व्यवहारापेक्षा त्या पाठीमागचा माणूस जास्त महत्त्वाचा वाटत असतो व्यवसाय मोठा होत असताना, यशस्वितेच्या शिखरावर असताना हे भान राहणं फार महत्त्वाचं असतं सुदैवानं हे भान असणारी काही प्रकाशनं आहेत आणि त्यातलं एक महत्त्वाचं नाव पुण्याच्या कॉंटिनेंटलचं आहे.

कॉंटिनेंटल प्रकाशन ४० वर्षं या प्रकाशन व्यवसायात जम बसवून आहे दर्जेदार पुस्तकांची आणि लेखकांची मोठी यादी त्यांच्याकडे आहे आणि कॉंटिनेंटलतर्फे पुस्तक प्रसिद्ध होण्यात आपला सन्मान आहे अशी भावना असणारे मोठे लेखकही आहेत. हे वाटणं कशामुळे आहे ?

कॉंटिनेंटलच्या अनंतरावांच्या संपादनकौशल्यामुळे, पुस्तकाचा जीव ओळखणाऱ्या त्यांच्या अनुभवी नजरेमुळे, लेखकावर त्यांनी केलेल्या मनापासून प्रेमामुळे आणि नुस्तं प्रेमच नाही, तर स्वतः मोठं होताना लेखकांना मोठं करून नेटकेपणानं व्यवहार जोडून त्यांनी माणसं जोडली आहेत देण्याचं आणि घेण्याचं त्याचं भान अजून शाबूत आहे.

हे सगळं लिहायचं कारण म्हणजे नुकतंच कॉंटिनेंटलनं जाहीर केलेली दोन पारितोषिक पहिल आहे चि वि जोशी पारितोषिक आणि दुसर आहे कवी कुसुमाग्रज पारितोषिक स्वातंत्र्योत्तर काळात जे लेखक तयार झाले आहेत अशा तरुण लेखकासाठी ही पारितोषिके आहेत दरवर्षीच्या सर्वोत्कृष्ट विनोदी साहित्य पुस्तकाला चिं. वि जोशी पारितोषिक आणि दरवर्षीच्या सर्वोत्कृष्ट कवितासंग्रहाला कुसुमाग्रज पारितोषिक देण्याची कॉंटिनेंटलची कल्पना आहे.

पारितोषिक देण्याच्या या कल्पनेचं या व्यवसायातल्या अनेक मान्यवर लोकानी उत्स्फूर्त स्वागत केलं आहे.

या बक्षीस योजनेच्या निमित्त अनंतरावाची मुद्दाम भेट घेतली पारितोषिक-योजनेचं मूळ आणि ती प्रत्यक्षात आणतानाची भूमिका याबद्दल त्याना काही प्रश्न विचारले. विनोदी साहित्य आणि कविता-संग्रह या दोनच साहित्यप्रकाराना पारितोषिके का? या दोन साहित्यिकाच्या नावाने पारितोषिक देण्यामागे कोणती भावना आहे आणि हे पारितोषिक आत्ताच जाहीर करण्यामागे औचित्य कोणतं?

अनंतराव म्हणाले, 'खरं तर हे दोनच साहित्यप्रकार निवडले यामागे विशेष कारण नाही; पण यापेक्षा अधिक पारितोषिके देण्याची माझी कुवत नाही शिवाय पारितोषिक ठरवताना साहित्य प्रकारापेक्षा चिं. वि. जोशी व कुसुमाग्रज हे लेखक-कवी माझ्या डोळ्यासमोर होते. या दोन्ही साहित्यिकांची पंचवीसच्यावर पुस्तके कॉंटिनेंटलने प्रकाशित केली आहेत या दोघाबद्दलचा आदर ही पारितोषिक देण्यामागील मुख्य भावना आहे या दोन लेखकानी माझ्यावर खूप प्रेम केल आहे माझ्या प्रकाशनासाठी फार केल आहे व्यावहारिक आणि व्यक्तिगत कारणं दोन्ही एकत्र झाली आहेत. चि. वि जोशीसारख्या विनोदी साहित्य लिहिणाऱ्या मोठ्या लेखकासाठी आजवर कोणी काही केल नाही. ते आजपर्यंत उपेक्षित राहिले. साहित्यिक मानमरातबापासून दूर राहिले. त्याच ऋण फेडण्याचा हा छोटा प्रयत्न आहे. तीच गोष्ट कुसुमाग्रजाची. त्यानीही आपले गौरव कधी समारंभपूर्वक करून घेतले नाहीत हे पारितोषिक आत्ताच जाहीर करण्याचं कारण म्हणजे मी आता सत्तरीला आलो आहे, तात्यासाहेब पचाहत्तरीत पोचले आहेत. यात कुठेही अशुभता नाही; पण आता अधिक थांबणे नको असं वाटलं. त्यानी आजवर कोणताही वाढदिवस करून घेतला नाही. म्हणून त्यांच्या वाढदिवसाची ही भेट आहे असं मी समजतो. हे पारितोषिक त्याच्या नावानं जाहीर करण्यापूर्वी मी त्याना विचारल नव्हतं; पण ते जर मला न विचारता त्याच पुस्तक अर्पण करू शकतात तर मला त्याच्या नावानं पारितोषिक द्यायला काय हरकत आहे?' २७ फेब्रुवारीला तात्यासाहेबाच्या वाढदिवशी अनंतरावानी आपली पारितोषिक योजना जाहीर केली.

पारितोषिकाची कल्पना अनंतरावानी फार कल्पकतेनं केली आहे

## कायमचं उत्तेजन

पुण्याच्या साहित्य परिषदेकडे ५०,००० रु. त्यानी ठेवीच्या स्वरूपात गुंतवण्यासाठी दिले आहेत. त्या ठेवीवर मिळणाऱ्या ३०००-इतक्या व्याजात ४० टक्के रक्कम म्हणजे सुमारे १२००/-पारितोषिकप्राप्त पुस्तकाच्या कवी किंवा लेखकाला, ३० टक्के रक्कम (९०० रु) हे पुस्तक प्रसिद्ध करणाऱ्या प्रकाशकाला, १५ टक्के रक्कम अदाजे ४५०1- निवड समितीच्या सभासदाचे मानधन देण्यासाठी आणि १५ टक्के रक्कम साहित्य परिषदेला ही पारितोषिके समारंभपूर्वक देता यावीत म्हणून खर्चासाठी

लेखक किंवा कवी तरुण असावा आणि एकदा पारितोषिक मिळालेल्या लेखकाला किंवा कवीला पुन्हा पारितोषिक मिळू नये अशी कल्पना आहे शिवाय एखाद्या वर्षी निवड समितीला उत्कृष्ट पुस्तक निवडता आले नाही तर त्यातल्यात्यात चागल्या पुस्तकाना ही पारितोषिके द्यावीत; पण रक्कम गोठवू नये असं मुद्दाम नमूद केलं आहे. निवड समितीत काव्यसंग्रहासाठी गो. म कुलकर्णी, अनुराधा पोतदार व अनिरुद्ध कुलकर्णी तर विनोदी साहित्यासाठी प्रा बाळ गाडगीळ, द. मा. मिरासदार व रत्नाकर कुलकर्णी याची नावे आहेत. ही सर्व मडळी कॉंन्टिनेंटल परिवारातली आहेत आणि निवड चोखदळपणे करणारी आहेत, याबद्दल कुणालाच शका नसेल.

अनंतराव पारितोषिकाची कल्पना प्रथम पुलशी बोलले. त्यानी ती उचलून धरली. निवड समितीतील नावं ठरवतानाही पुलशी विचारविनिमय केला आणि मगच साहित्य-परिषदेच्या अध्यक्ष, सेक्रेटरी आणि कोषाध्यक्षाशी चर्चा केली. कल्पना तर सर्वांना आवडलीच. शिवाय परिषदेनं योजनेचा मूळ गाभा व कॉन्टिनेंटलचा त्यामागील हेतू भविष्यात कायम ठेवण्याचा विश्वास त्याना दिला आहे.

अनंतरावानी दिलेल्या या पारितोषिकातली मला जाणवलेली वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी पारितोषिकातील मोठी (३० टक्के) रक्कम पुस्तकाच्या प्रकाशकासाठी ठेवली आहे अनंतराव म्हणाले,- 'सरकारी पारितोषिकात लेखकांना स्थान आहे; पण प्रकाशकाना नाही पारितोषिक वितरण समारंभाना प्रकाशकाला बोलावल जात नाही. प्रकाशकाला बक्षीस ही कल्पना यातून निघाली असावी असं मला वाटत. शासन, मुद्रक व विक्रेते याच्यामध्ये प्रकाशक महत्त्वाचा आहे ही जाणीव काही लेखकांना आहे पण सर्वांनाच नाही'

दुसरी गोष्ट त्यानी तरुण लेखकाना प्रोत्साहन देण्यात दाखवलेली कल्पकता. आज तरी स्वातंत्र्योत्तर काळातील लेखक-कवी एवढाच तरुणपणाचा निकष असला, तरी आणखी काही वर्षांनी हा निकष मूळ योजनेप्रमाणे बदलेल बनचुकेपणा टाळण्यासाठी निवडसमितीही काही वर्षांनी बदलत राहील.

आजपर्यंत आपल्या लेखकाचा गौरव प्रकाशकानी वेगवेगळ्या प्रकारानी केला आहे. कोणी लेखकाचे वाढदिवस साजरे केले आहेत, कोणी छोट्या-मोठ्या भेटी दिल्या आहेत, कोणी लेखकाची स्नेहभोजन घडवून आणली आहेत. काही प्रकाशकाच्या नावान व्यक्तिगत पारितोषिकेही जाहीर केली आहेत. 'कॉन्टिनेन्टल पुरस्कृत' पारितोषिकात व्यक्तिगत घटक खूप कमी आहे आणि या ज्येष्ठ साहित्यिकाबद्दलचा आदर आणि तरुण लेखक कवीना कायमच उत्तेजन देणारं निखळ साहित्यप्रेम त्यात व्यक्त झाल आहे

अनंतरावाशी गप्पा मारताना त्यानी प्रकाशनातले कितीतरी अनुभव सागितले. म्हणाले, मी मला सगळ्यानी चागलं म्हणावं म्हणून खास प्रयत्न केले नाहीत; पण कोणी मला वाईट म्हणू नये याची मात्र जरूर काळजी घेतली आहे अनंतरावानी जी काळजी घेतली त्याची पुरेपूर पावती त्याच्या कॉन्टिनेंटलला मिळते आहे. कॉन्टिनेंटलवर प्रेम करणारी माणस वाढत राहिली ती याचमुळे. ज्याच्याबद्दल पाठीमागेसुद्धा फार चागलं, आदरान बोललं जात, ज्याच्या सहृदयतेच्या आठवणी सागितल्या जातात अशा या व्यवसायातल्या मोजक्या व्यक्तीमध्ये 'बाबा' आहेत.

प्रकाशन व्यवसाय हा आता बदनाम झालाय. झटपट वर चढणाऱ्याचं पीक आलय. बाबा म्हणाले, हा व्यवसाय शेतीसारखा आहे २५।३० वर्ष जमिनीची मशागत करावी तेव्हा कुठे पीक दिसायला लागत; पण तेवढंच नाही, पीक दिसायला लागल्यावर ऋण फेडायच असतं ही विनम्र भावना त्याच्यात आहे. म्हणूनच अशी सर्वार्थानं 'उचित' पारितोषिक योजना ते आखू शकतात.

—मेधा राजहंस

## जम्मू-काश्मीर

# देशद्रोही शक्तींच्या हालचाली वाढल्या

अभय गोखले

शेख अब्दुल्लांचे जावई जी. एम्. शहा यांनी नॅशनल कॉन्फरन्समध्ये फूट पाडून राज्यपालांच्या सहाय्याने फारुक अब्दुल्ला यांना मुख्यमंत्रीपदाच्या खुर्चीवरून खाली खेचल्यानंतर आता ते इंदिरा काँग्रेसच्या हातातील बाहुले बनले आहेत. शहा यांचा सोळा आमदारांचा फुटीरगट नामधारी बनला असून विधानसभेत २६ आमदारांचा पाठिंबा असलेला काँग्रेस (इं) पक्ष जम्मुकाश्मीरवर राज्य करीत आहे. रणबीरसिंगपुरा (जम्मु) मतदारसघातील पोटनिवडणुकीत जिंकून आलेले प्रदेश काँग्रेस (इं.) अध्यक्ष मुफ्ती मोहमद सईद हे मुख्यमंत्री शहा यांच्या भूमिकेवर बेहद्द खूश असून महत्वाकांक्षी सईद हे जरी मुख्यमंत्रीपदावर डोळा ठेवून असले तरी नजीकच्या काळात काँग्रेसपक्षाचा मुख्यमंत्री जम्मूकाश्मीरमध्ये होणे शक्य दिसत नाही. शहाचे मंत्रिमडळ हे जरी काँग्रेसच्या पाठिंब्यावर उभे असले तरी शहा व त्यांचे सहकारी यांच्यापेक्षा काँग्रेसपक्षाला शहा सत्तेवर रहाणे जास्त महत्त्वाचे वाटत आहे. लोकसभेचे निवडणूक निकाल पाहिले तर काश्मीर खोऱ्यातील तीनही जागा प्रचंड बहुमताने जिंकणाऱ्या फारुक अब्दुल्ला यांच्या नॅशनल कॉन्फरन्स गटाशी टक्कर देण्याचे धारिष्ट्य काँग्रेस करेल असे वाटत नाही तेव्हा नजीकच्या काळात विधानसभा निवडणूक जम्मूकाश्मीरमध्ये होणार नाही व शहा आणि काँग्रेस यांचे सबंध चांगले असेपर्यंत विधानसभा निवडणूक मुदत संपण्याअगोदर घेणे शहा व काँग्रेस पक्षाला परवडणारे नाही डॉ फारुक अब्दुल्ला यांना सत्तेपासून दूर ठेवण्याकरिता शहा व काँग्रेस यांची आघाडी कोणत्याही परिस्थितीत कायम राहिली पाहिजे. काश्मीर खोऱ्यातील तीनही जागा सत्ताधारी आघाडीने गमावल्यावर कर्नाटकप्रमाणे जम्मूकाश्मीरमध्येही, लोकमताचा आदर राखून शहा मंत्रीमंडळाच्या राजिनाम्याची मागणी करण्यात आली; परंतु शहा म्हणजे काही हेगडे नव्हेत आणि शहांनी राजिनामा द्यायचा किंवा नाही हे ते स्वतः ठरविणार नसून काँग्रेसपक्षाने ठरवायचे होते. शहा जरी मुख्यमंत्री असले तरी सर्व महत्त्वाचे निर्णय दिल्लीहूनच घेतले जातात.

सत्तेपासून दूर झाल्यामुळे फारुक अब्दुल्ला हल्ली खपच निराश झाले आहेत काँग्रेसवाल्यांनी त्यांचा (फारुकचा) काटा त्यांच्या मेव्हण्याकडूनच काढल्याने त्यांना काहीच करता आले नाही. जी एम्. शहा यांची पत्नी म्हणजे फारुक यांची बहीण खलिदा शहा ही शहा यांची प्रमुख सल्लागार आहे व ती शहा यांच्यापेक्षाही लोकप्रिय आहे. फारुक यांना ज्याप्रकारे पदच्युत करण्यात आले त्यामुळे जम्मूकाश्मीरमधील व विशेषतः काश्मीर खोऱ्यातील बहुसख्याक जमातीत संतापाची लाट उसळली होती; पण शेखसाहेबांच्या लाडक्या कन्येच्या नवऱ्यालाच काँग्रेसवाल्यांनी पुढे करून मुख्यमंत्रीपदी बसवल्याने जनक्षोभ फारसा वाढला नाही. मात्र जम्मूकाश्मीरच्या जनतेने हे पुरेपूर ओळखले आहे की, जी. एम् शहा हे काँग्रेसवाल्यांचे कैदी बनलेले आहेत काश्मीर खोऱ्यात आपली शक्ती वाढविण्याचे काँग्रेसने हरतऱ्हेने प्रयत्न केले; परतु लोकसभेच्या निवडणुकीत शहा-काँग्रेस आघाडीच्या उमेदवारांना मतदारांनी फेकून दिले व ही अभद्रयुती आपल्याला पसत नसल्याची जाणीव करून दिली मुफ्ती मोहमद सईद यांच्यासारखा मुस्लिम नेता (प्रदेशाध्यक्ष) स्वत:च्या मतदारसघातून, बिजबेहरामधून (काश्मीरखोरे) १९७७ व १९७३ च्या विधानसभा निवडणुकीत पराभूत झाला व शेवटी त्यांना जम्मूमधून निवडून आणावे लागले, यावरून काँग्रेसपक्षाची काश्मीरखोऱ्यातील केविलवाणी स्थिती स्पष्ट होते केवळ जम्मूमध्ये मोठ्या प्रमाणात पाठिंबा मिळाल्याने हिंदूंचा पक्ष म्हणून काँग्रेसवर शिक्का बसलाच; परतु शहांच्या कुबड्या घेऊन काश्मीरमध्ये परिस्थिती सुधारण्याचा काँग्रेसचा प्रयत्न फसलेला आहे असेच म्हणावे लागेल.

शहांची बाजू मजबूत करण्यासाठी डॉ. फारुक अब्दुल्ला यांचेवर आरोपांची खैरात करण्यात आली. त्यांना देशद्रोही ठरविण्यात आले. देशद्रोही शक्तींना त्यांचा पाठिंबा असल्याचा उद्घोष सुरू झाला. फारुक मुख्यमंत्री असताना श्रीनगर येथील क्रिकेट सामन्यात भारतविरोधी घोषणा देणाऱ्या देशद्रोह्यांना फारुकची सहानुभूती होती ही जुनी, घासून गुळगळीत झालेली रेकॉर्ड पुन्हा पुन्हा वाजविण्यात आली शीख अतिरेक्यांना मदत केल्याचा व राज्यात त्यांना पूर्ण मुभा (देशविरोधी कारवाया करण्यास) दिल्याचा आरोप करण्यात आला, निवडणुका जिंकण्यासाठी मौलवी फारुक यांच्यासारख्या जातीयवादी व पाकिस्तानवादी नेत्यांची मदत घेतल्याची टीका करण्यात आली. अशा प्रकारे नानातऱ्हेने फारुक विरोधी प्रचाराचा राळ उडविण्यात आली; परंतु लोकसभेच्या तीनही जागा जिंकून आपण व आपली आई, बहीण व मेव्हणे यांच्यापेक्षा बरेच लोकप्रिय असल्याचे फारुक यांनी दाखवून दिले आहे काँग्रेसपक्षाने व मुख्यमंत्री शहा यांनी फारुकवर केलेले सर्वच आरोप खाटे मानता येणार नाहीत; परतु फारुक हा विरोधी पक्षांच्या ऐक्य परिषदात सामील होऊ लागला, स्वतःची देशातील एक लोकप्रिय मुस्लिमनेता अशी प्रतिमा तयार करू लागला व मुख्य म्हणजे काँग्रेसला विरोध करू लागला म्हणून तो देशद्रोही व जातीयवादी बनत असेल तर तो काँग्रेसपक्षाच्या प्रचाराचाच एक भाग समजला जाईल. भारतविरोधी

शक्ती या शेखसाहेबाच्या कारकिर्दीनही कार्यरत होत्या फारुकच्या कारकिर्दीत त्याचा जोर वाढला असे नव्हे कारण शहाच्या कारकिर्दीतही त्या आपली शक्ती दाखवत आहेत मध्यतरी, देशद्रोही मकबूल बट, ज्याला गेल्या वर्षी फाशी देण्यात आले (या बटने १८ वर्षांपूर्वी एका राज्य गुप्तहेर सघटनेतील अधिकाऱ्याचा खून केला होता) त्याच्या प्रथम पुण्यतिथीनिमित्त काही देशद्रोही सघटनानी बंद पुकारला होता हा मकबुल बट म्हणजे काही देशसेवक नव्हता की, त्याच्या पुण्यतिथीनिमित्त बद पुकारण्यात यावा पाकिस्तानवादी काश्मीर लिबरेशन फ्रटचा तो एक नेता होता व त्याचे सर्व आयुष्य भारतविरोधी कृत्ये करण्यात खर्ची पडले होते. अशा २५ बटला आदर व्यक्त करण्यासाठी बदचे आवाहन करणाऱ्याना सडकून काढावयास हवे होते; परतु देशद्रोह्यांच्या या चळवळी काश्मीरखोऱ्यात नित्याच्याच झाल्या आहेत. त्याला शेखसाहेब आवर घालू शकले नाहीत, फारुक त्याना काबूत ठेवू शकला नाही व शहाही त्याना जरब बसवू शकलेला नाही.

### फारुक अब्दुल्लांचे पुनरागमन ?

मकबूल बटच्या पुण्यतिथीनिमित्त बंदचे आवाहन करणाऱ्या सघटना होत्या पिपल्स लीग, मुजाहिद इ आझादी, इस्लामी जमीयत इ तुलबा आणि अल जेहाद. यातील शेवटच्या सघटनेने बदच्या दिवशी हायकोर्ट प्रिमाईसेस व निवृत्त सेशनजज्ज गजू याच्या घरी जे बॉबस्फोट झाले त्याची जबाबदारी घेतली आहे या गंजू यांनीच मकबुल बट याला फाशीची शिक्षा सुनावली होती. अल जेहाद या सघटनेने स्टेट इनफर्मेशन डिपार्टमेंट व आर्मी पब्लिक रिलेशन्सच्या कार्यालयाला ज्या आगी लावण्यात आल्या त्याचीही जबाबदारी स्वीकारली आहे. अशा प्रकारे देशद्रोही बटची पुण्यतिथी साजरी करण्याच्या निमित्ताने या राष्ट्रविरोधी सघटनानी काश्मीरखोऱ्यात बराच धुमाकूळ घातला या दंगलीमध्ये एक व्यक्ती मृत्यू पावली. मात्र मुख्यमंत्री शहा व त्याची पत्नी खलिदा शहा यांनी मात्र या दगलीना डॉ फारुक व अवामी ॲक्शन कमिटीचे नेते मौलवी फारुक जबाबदार असल्याचा आरोप केला त्याच्यामते ही देशद्रोही कृत्ये करणारे लोक फारुक याचेच पाठिराखे होते. वर उल्लेखिलेल्या सघटना या बरीच वर्षे देशद्रोही कारवाया करत आहेत. पिपल्स-लीगचा काश्मीर लिबरेशन फ्रटशी संबंध आहे याच सघटनेच्या नेत्याने दोन वर्षांपूर्वी राजकीय नेते, नागरिक, पत्रकार यांना धमकावणारी पत्रे पाठवून दहशत बसवली होती. मुजाहिद इ आझादी ही सघटना काश्मीरला भारतापासून मुक्त करण्याकरिता झटत आहे. तर अलजेहाद ही सघटना सर्वात जास्त कार्यरत असून ती पोस्टर्स व पत्रके काढून भारताविरुद्ध सशस्त्र लढा पुकारण्याचे आवाहन करत असते. गमतीची गोष्ट म्हणजे देशद्रोही संघटना फारुकच्या कारकिर्दीत जास्त कार्यरत होत्या असा आरोप करणारा जी. एम्. शहा मुख्यमंत्री असूनही या संघटना आपले काम उघडपणे करत असतात. या सघटनाच्या कारवायाना शहा व त्याचे सल्लागार असणारा कॉंग्रेसपक्ष पायबद घालू शकलेला नाही दरवेळेस मुख्यमंत्री शहा व त्याचे पाठिराखे या दंगलीची जबाबदारी डॉ. फारुकवर टाकून मोकळे होतात मुख्यमंत्री शहाही कॉंग्रेसच्या बॉसिंगला वैतागला आहे; परंतु करतो काय बिचारा ! हल्ली शहाचे व त्याला गादीवर बसवण्यास मदत करणाऱ्या राज्यपाल जगमोहन याचे फारसे पटत नाही. डॉक्टर फारुकही विरोधीपक्षात राहून कटाळले आहेत अखिल भारतीय विरोधी पक्षाच्या राजकारणात त्याला रस उरलेला नाही. कॉंग्रेस पक्ष व राजीव गाधी याना खूश करण्याकरिता त्याने विरोधीपक्षाची संगत जवळजवळ सोडली आहे व कॉंग्रेस पक्षावर टीका करण्याचेही कमी केले आहे. मध्यतरी डॉ. फारुक यानी राजीव गाधीची भेट घेऊन त्याच्याजवळ बराच वेळ चर्चा केली. या चर्चेला बरेच महत्त्व देण्यात येते. मात्र या चर्चेमुळे फारुक अब्दुल्ला याचा पुन्हा सत्तेवर येण्याचा मार्ग मात्र मोकळा झालेला नाही. जी एम्. शहा याना वाऱ्यावर सोडणे कॉंग्रेसला परवडणारे नाही शिवाय मुफ्ती मोहमद सईद याच्यासारखा नेता आता निवडून आल्याने बऱ्याच कटकटी निर्माण झाल्या आहेत समजा डॉ फारुकशी पुन्हा जवळीक करून त्याना मुख्यमंत्रीपदाच्या खुर्चीवर बसवण्यात आले तर तो कॉंग्रेसविरुद्ध फिरणारच नाही याची खात्री देता येत नाही. म्हणजे तसे झाले तर कॉंग्रेसला स्वतच्या पायावर आपणच धोंडा पाडून घेतल्यासारखे होईल. फारुक अब्दुल्लाचा भरवसा काय ? काश्मीरखोऱ्यात त्यानी मोठ्या प्रमाणावर पाठिंबा असल्याने तो पुन्हा एकदा कॉंग्रेसविरुद्ध दड थोपटून उभा राहू शकेल, शहाप्रमाणे कॉंग्रेसपक्षाच्या हातातील बाहुले बनणार नाही व जम्मूकाश्मीरमध्ये कॉंग्रेसची काही आवश्यकता नसून कॉंग्रेसने नॅशनल कॉन्फरन्समध्ये विलीन व्हावे ही आपली जुनी मागणी फारुक पुढे रेटेल. या सर्व परिणामाचा विचार करता राजीव व फारुक याच्यामध्ये कशा प्रकारची चर्चा झाली असेल याचा अदाज करता येणे शक्य आहे फारुक यानी आपण विरोधी पक्षाची सगत सोडू व कॉंग्रेसविरुद्धची टीका थांबवू असे सुचवले असेल तर राजीव गाधी यानी त्याला कोणतेही आश्वासन न देता त्याच्या सूचनेचे स्वागत केले असेल सध्या तरी शहाला दूर करून फारुकला जवळ करण्याच्या मनःस्थितीत कॉंग्रेस श्रेष्ठी नाहीत एखादेवेळेस फारुक आपले आश्वासन (आपली बदलेली भूमिका) कितपत प्रामाणिकपणे पाळत आहेत, याचा अभ्यास कॉंग्रेसश्रेष्ठी करतील मात्र फारुकचे सत्तेवरील पुनरागमन नजिकच्या भविष्यकाळात सभवत नाही. □


प्रसिद्ध स्त्री-रोग तज्ज्ञ डॉ वी. एन्. पुरंदरे

याची आत्मकथा

**शल्य-कौशल्य** मूळ किंमत रु. ६०/- सवलतीत रु. ४५/-

**सुधारित २ री आवृत्ती**

श्री. नानासाहेब याचे रुद्राक्षावरील संशोधन, गर्भवती स्त्रियाना मुलगा होणार की मुलगी याची रुद्राक्षावरून ते करत असलेली परीक्षा व मेडिकल कॉलेजच्या प्रवेशासबंधीची त्याची परखड मते असे मिळून सुधारित आवृत्तीत वाढवलेले प्रकरण ११ वे अत्यत वाचनीय.

तसेच प्रसिद्ध लेखक श्री. रा. भि. जोशी यांची

दोन संग्राह्य पुस्तके

**१. सोन्याचा उंबरठा** रु. ४०/-

**२. घाट शिळेवरि उभी** रु. ५०/-

एकूण ९०/- रु. किमतीची पुस्तके ६५/- रुपयांत.

संपर्क साधा : **अश्वमेध प्रकाशन**

द्वारा : ज्ञानदा ग्रंथ वितरण, कृष्ण निवास,

मानपाडा रोड, डोंबिवली पूर्व ४२१२०१.

हृया ना त्या निमित्ताने

# आणखी एक नाना

फिरोझ रानडे

खर म्हणजे 'नाना' हा मुळातला फारसी शब्द. पण मराठी जीवनात तो किती चपखल बसला आहे, नाही? मराठी जीवनातल्या वेगवेगळ्या अंगोपांगात वेगवेगळ्या नानांनी जी काही मौज उडवून दिली तेवढी त्या मूळच्या फारसी भाषेतही आणली नसेल.

श्याम मनाशी विचार करत होता. आज त्याला मनाशी विचार करण्याशिवाय दुसरे काही करणे शक्य नव्हते. तसं बघितल तर आज रविवार—म्हणजे दूरदर्शनवरच्या कार्यक्रमाची *झुबड. त्यातून आज संध्याकाळी* कोणातरी दत्ताचा एका काळचा फार गाजलेला सिनेमा दाखवला जात होता. तरी श्यामचे घरी अगदी शुकशुकाट होता.

कारण स्पष्ट होते. त्यांचा टी. व्ही. नेहमी प्रमाणे चांगल्या सिनेमाच्या वेळी बिघडला होता. मुले तर केव्हाच शेजारी—पाजारी गेली होती. काही झाल तरी आजचा सिनेमा आपण सोडणार नाही असे राधाने दुपारच्या जेवणाचे वेळीच जाहीर केले होते. त्याप्रमाणे ती खालच्या कामताकडे निघून गेली होती. श्यामला लोकाकडे टी. व्ही. वर सिनेमा पाहायला जायला आवडत नसे. त्यामुळे तो घरी एकटा होता.

एवढंच काय की रविवार असून, त्यातून संध्याकाळ असून व त्यातूनही चांगला हिंदी सिनेमा असूनही श्याम घरी एकटा होता व एकटा माणूस जसा मनाशी विचार करत रहातो तसा करून राहिला होता व तसा विचार करता करता तो 'नाना' ह्या शब्दावर येऊन ठेपला. त्यानंतर 'नाना' हा मुळातला फारसी शब्द असूनही मराठी जीवनात किती चपखल बसला आहे नाही, अशा कौतुकास्पद प्रश्नावर येऊन पोहोचला होता.

श्यामला वेगवेगळ्या शब्दाचे मूळ शोधून काढणाऱ्यांबद्दल फार कौतुक वाटायचे व *अजुनी* वाटते. कौतुक अशा करता की बिचारे किती खटपट करून मूळ शोधून काढत असतील नाही? त्याची स्वतःची वृत्ती अशी की हा शब्द आपण नेहमी वापरतो आहोत ना? आपल्याला हवा तो अर्थ त्यातून निघतो आहे ना? मग त्याचे मूळ शोधायची गरज काय? आता 'नाना' हा शब्द मूळचा फारसी असला काय, अरेबीक असला काय किंवा अगदी ग्रीक व लॅटीन असला काय त्याच्यामुळे नानाच्या वागणुकीत वा वृत्तीत काय फरक पडतो वा पडणार आहे? असा त्याचा सवाल.

पण सगळे मराठी लोक काही 'श्याम' वृत्तीचे नेसतात. त्याना शब्दाचे मूळ हुडकून काढण्याची फार हौस असते. त्याच्यासाठी ते अगदी जंग जग पछाडतात. अशाच एका जग—जंग पछाडणाऱ्या गृहस्थाची व श्यामची काही वर्षापूर्वी गाठ पडली होती. काही वर्षापूर्वी म्हणजे आपले पाकिस्तानशी युद्ध चालू होते त्या वर्षी गाठ पडली होती. बरोबर दोन—चार मित्रमंडळी पण होती.

अर्थातच गाठ पडल्यावर काश्मिर, शेख *अब्दुल्ला*, भुट्टो *वगैरे विषय अगदी अटीतटीने* चर्चिले गेले होते. बोलता बोलता ते शब्दाचे मूळ शोधण्याची हौस असलेले गृहस्थ म्हणाले, 'काहो श्यामराव ह्या *बारामुल्ला गावाच्या नावाचे मूळ* माहीत का तुम्हाला?'

हा प्रश्न ऐकून श्याम कातावला. अरे गृहस्था, आज आपली काश्मिरक्षेत्रात पाकिस्तानी लोकांशी लढाई चालली आहे तेथे कित्येक जवान अधिकारी जीवानीशी मरताहेत, त्याबद्दल बोलायचे किंवा भारतसरकारच्या कचखावू धोरणाबद्दल बोलायचे का *बारामुल्ला गावाचे मूळ नाव काय* होते, ह्याचा विचार करत बसायचा? अर्थात श्याम हे सगळे मनाशी बोलला

कारण तो कितीही कातावलेला असला तरी ते गृहस्थ फार प्रतिष्ठित होते. साऱ्या महाराष्ट्रात त्याचा फार मोठे कवी म्हणून उदो उदो झाला होता आणि मुख्य म्हणजे श्याम आणि ते गृहस्थ दोघेच नव्हते. आणखी काही प्रतिष्ठित मंडळी तेथे होती.

तेव्हा श्यामने आपला राग जेव्हढा गिळणे शक्य आहे तेव्हढा गिळून शांतपणे विचारले. 'पण त्याने काय फरक पडतो?'

'काय फरक पडतो?' त्या मूळ शोधणाऱ्या गृहस्थानी उलट प्रश्न केला. असा प्रश्न येणार अशी त्याची खात्री होती असे दिसले. फार फरक पडतो. त्या गावाचे मूळ नाव कळले तर तेथे एके काळी हिंदू—संस्कृती होती हे सिद्ध होईल व त्या सर्व भागात एकेकाळी आपले राज्य होते हेही सिद्ध होईल.

'पण त्या सिद्ध होण्याने काय होणार? आता रावळपिंडी हे गावाचे नाव पहा रावळ हे इतिहासप्रसिद्ध राजपूत घराणे. हे गाव पूर्वी त्या रावळाचे होते तेथे हिंदु संस्कृती होती. हिंदू राज्य होते हे अगदी भुट्टोसुद्धा कबूल करेल पण म्हणून काय तो रावळपिंडी हिंदुस्थानला देऊन टाकेल?'

'ते देवोत किंवा न देवोत; पण आपले तेथे राज्य होते—संस्कृती होती हे तर सिद्ध होईल. आता सांगा बारामुल्ला हे नाव कशावरून आले असेल? त्याचे मूळ नाव काय?'

आता हा वाद थांबवावा ह्या हेतूने तेथे हजर असलेला एक प्रतिष्ठित माणूस म्हणाला,

'अहो, तेथे पूर्वी कधी तरी दहा—बारा मुल्ला मौलवी रहात असतील म्हणून त्याचं *नाव पडले असेल बारामुल्ला!'*

'चूक अगदी चूक! ते मुळाच्या मागे लागलेले कविवर्य मोठ्या विजयानंदात म्हणाले. त्याना काश्मिरच्या वा कच्छच्या रणांगणावर मिळणाऱ्या विजयाबद्दल काही सुख दुःख नव्हते 'अहो, बारामुल्ला हे मूळ 'वराह मुलःह' ह्या संस्कृत नावावरून आले आहे!'

बारामुल्लाचे हे मूळ ऐकून सगळे चाट पडले. तसा श्यामही पडला; पण तसा पडता पडता त्याचे मनात त्या 'वराह मुलःह'ची फिरकी घ्यावी अशी इच्छा निर्माण झाली.

'अरे वा! बारामुल्ला नावाची उपपत्ती अशी आहे काय? श्याम गंभीरपणे म्हणाला, 'पण काहो, चर्चिल ह्या नावाचे मूळ काय आहे माहित आहे तुम्हाला?'

आता भाबावून जाण्याची त्या गृहस्थाची पाळी होती. आतापर्यंत ते सर्वसामान्यांप्रमाणे चर्चिल हे इंग्रजी नाव समजून चालले होते. तेव्हा ते म्हणाले, 'काही कल्पना नाही बुवा. पण चर्चिल हा काही हिंदू संस्कृतीचा शब्द नाही.'

'अहो, ह्या चर्चिलचे कुटुंब सगळ्या बाबतीत खूप चर्चा करत असणार, म्हणून चर्चणारा तो चर्चिल! असे त्याचे मूळ असणार. तसे असेल तर तो नुसता हिंदुत्व संस्कृतीचा नाही तर अगदी मराठी संस्कृ-

तीचा निवावा ! त्या प्रतिष्ठित लोकाच्या अड्डयात फक्त एकटा श्यामच टवाळ होता असे नाही. त्यातला एक जण म्हणाला व खूप मोठा हशा पिकला.

हे लोक आपली टवाळी करताहेत हे त्या गृहस्थांच्या लक्षात आले. ते रागाने म्हणाले,

'अहो ह्या पोरकटपणे घेण्याचा विषय नाही. नावाचे मूळ कळले की पुष्कळ गोष्टी कळतात. त्या माणसांची सस्कृती, वृत्ती वगैरे सारख्या गोष्टी.'

'नाही, नाही, मी पोरकटपणे म्हणत नाही, अगदी खरे खरे विचारतो आहे.' श्याम घाईघाईने जबाब देत म्हणाला.

'नाही बुवा, त्याबद्दल काही वाचनात आले नाही कधी !' तो गृहस्थ मोठ्या खजील-पणे म्हणाला. आपल्याला चर्चिल ह्या नावाची उपपत्ती माहीत नसावी ना ? ह्या विचाराने त्यांना खजीलपणा आला होता. त्यांना तसे खजील झालेले पाहून श्यामला खूप आनंद झाला. त्या आनंदातच तो म्हणाला,

'अहो चर्चिल हा शब्द चार–शिल म्हणजे आपल्या पडित नेहरूचे कसे पचशिल होते. त्याप्रमाणे पूर्वी चार–शिल होते त्यावरून आला आहे. त्या चार–शिलचे पुरस्कर्ते म्हणजे चर्चिल साहेबाचे पूर्वज ! चारशिलवरून चारचिल व त्यावरून चर्चिल व आत्ताचे चर्चिल !'

सगळी मंडळी–फक्त ते मूळ व्यापी कवी सोडून–सगळी मंडळी खो–खो करून हसली. तेव्हा ते कुरकुरत म्हणाले, 'तुम्ही काही म्हणा नावात व त्याच्या उपपत्तीमध्ये फार अर्थ असतो.' तेव्हढ्यात चहा आला व ती बैठक संपली.

आता इतक्या वर्षानंतर श्यामला त्या गृहस्थाची व चर्चिल साहेबांची आठवण आली. त्याचबरोबर चहाचीपण आली; पण चहा पिणे ही काही एकट्याने करण्याची गोष्ट नाही. पण रविवारचे संध्याकाळचे घरी कोण असणार ?

ह्या विचाराने श्याम बाल्कनीत आला. सर्वच कर्फ्युच्या वेळी असतो तसा शुकशुकाट होता. तेव्हढ्यात शेजारच्या बाल्कनीत कर्वे आले. चला, कर्वे तर कर्वे ! ह्या विचाराने त्याने त्यांना चहाकरता हाक मारली व स्वत: चहा करण्याचे मागे लागला.

चहा करतानाही त्याचे मनात 'नानां' बद्दल विचार येत होता.

व तसे होणे साहजिकच होते. दिल्लीच्या नानानी गेल्या आठवड्यात पत्रकावर पत्रक काढून नाना तऱ्हेचा विचार–गोंधळ निर्माण केला होता. काही वर्षांपूर्वी त्यानी राज-कारणातून सन्यास घेतल्यामुळे तर त्याच्या पत्रकाना फार अर्थ निर्माण झाला होता.

आता जर माणसाने सन्यास घेतला आहे तर परत राजकीय पत्रक कशाला ? असा विचार श्यामच्या मनात येईपर्यंत शेजारचे कर्वे आलेसुद्धा.

चहा घेता घेता अर्थातच नानांचा व त्यांच्या पत्रकांचा विषय निघाला. कर्वे पूर्वा-श्रमीचे खाकी हाफपँटवाले. त्यामुळे त्यांच्या मताला फार महत्त्व होते,

'मला नानांची मतं पटतात बुवा.' कर्वे चहा पिता पिता म्हणाले.

'कोणती मतं ?' नानांनी आतापर्यंत इतकी उलटीसुलटी मतं दिली होती म्हणून श्यामचा प्रश्न. आता कर्व्यांनाही प्रश्न पडला. कारण नानांची नाना मते गेल्या काही महि-न्यात प्रसिद्ध पावली होती.

'हीच की राजीव गांधीचे हात बळकट करा ?'

'अरे पण हा गृहस्थ आताच पंतप्रधान झाला आहे व त्याचे हात बळकट करा म्हणजे काय ? त्यापेक्षा बळकट हाताचाच पंतप्रधान का नाही निवडत ? अर्थात हे खरे आहे की, त्याची आई पंतप्रधान होती म्हणून हा पंत-प्रधान झाला आहे. तेव्हा त्याचे हातच काय पण सगळेच बळकट करायला पाहिजे !'

श्यामचा खडूस स्वभाव व राजीव गांधीवरचा राग कर्व्यांना चांगला माहीत होता. ते नानाच्याच गभीर भावात म्हणाले,

'अहो, तस नाही, देशाची परिस्थिती गभीर आहे. इकडे पाकिस्तान आहे, तिकडे ............' 'देशाची परिस्थिती नेहमीच गंभीर असणार व इकडे पाकिस्तान तिकडे बंगला देश खाली सिलोन तर कायमचेच आहे; पण म्हणून काय तुम्ही ह्या पंतप्रधानांच्या बाजूने बोलणार ?

आपल्या पेशवाईतले नाना फडणवीस पहा. एकदा राघोबा दादाला विरोध करा-यचा ठरला तर त्याने बारभाई–कारस्थान काय केले. वयाने लहान असलेल्या सवाई माधवरावला गादीवर काय बसवले. त्या वेळी काय परिस्थिती गंभीर नव्हती ? एका बाजूला अंग्रेज होता, दुसऱ्या बाजूला निजाम तिसरीकडे टिपू !'

'त्या पेशवाईच्या गोष्टी सोडा हो !'

'बर, सोडल्या पेशवाईच्या गोष्टी. अगदी चर्चिलची गोष्ट सागतो. महायुद्धानंतर झालेल्या निवडणूकीत चर्चिल हरला तरी त्यानंतरच्या निवडणुकीत तो जिंकला होता व इग्लंडचा पंतप्रधान झाला होता. त्या वेळची गोष्ट.

'चर्चिलचे एक मोठे तैलचित्र पार्लमेंटांत लावायचे होते. व त्याचा समारंभ व्हायचा होता त्या वेळचा विरोधी पक्षाचा नेता अॅटलीकडून. अनावरण समारंभ संपला त्या नंतरच्या भाषणात अॅटली म्हणाला,

'चर्चिलने आपल्या राष्ट्राकरता फार मोठे काम केले आहे. जवळजवळ त्याच्या-मुळेच आपण हे युद्ध जिकले. त्याचे असे भव्य तैलचित्र लावून गौरव करणे अगदी योग्य आहे.

'तथापी विरोधी पक्षाचा नेता म्हणून मी स्पष्टपणे सागतो चर्चिलने–ह्यापुढे एक दिवससुद्धा देशाचा पतप्रधान म्हणून राहू नये. त्याची धोरणे देशाच्या दृष्टीने योग्य नाहीत असे मला ठामपणे वाटते.

'आपल्याकडे झाले असते असे ?'

'नाही, नाही, आम्ही असे नाही म्हणत की विरोधी पक्ष नसावा, तो ही असावा, त्याच्या बद्दलही आम्हाला प्रेम आहे, तो ही वाढावा.' कर्व्यांचा समतोलपणा उतू जात होता.

'तो कसा वाढणार ? राजीवचे हात बळकट करा असे तुम्ही म्हणता. त्या बळकट हाताने सर्व प्रथम तो विरोधी पक्ष दाबून नाही का टाकणार ? हे दोन्ही बाजूचे बोलणे कसे व्हावे ?' श्याम कर्व्यांना इतकी साधी गोष्ट कशी समजत नाही ह्याच्या रागात म्हणाला.

तेवढ्यात दारावरची बेल वाजली. श्यामने दार उघडले. दारात कर्व्यांचा मुलगा होता. तो आत येत म्हणाला,

'नाना, आईने बोलावले आहे तुम्हाला.' नाना गडबडीने उठले व 'अच्छा, येतो हो.' म्हणून निघून गेले.

'म्हणजे कर्व्यांना घरी नाना म्हणतात तर आता कळलं......श्यामने वाक्य काही पुरे केले नाही.

□

## पिंपरी-चिंचवड

# परिसर बदलून टाकणारा वृक्षारोपण कार्यक्रम

काही दिवसापूर्वीचा एक प्रसंग आठवतोय. चिंचवडमधील एक कार्यक्रम आटोपून गो. नि. दांडेकर यांना पोहोचते करण्यासाठी मुंबई-पुणे रस्त्यावर बसची वाट पहात आम्ही उभे होतो. सकाळचे अकरा वाजून गेलेले. लोकल नसल्यामुळे बसनेच तळेगावला जायचा विचार होता. उन्हाचा चटका हळूहळू चांगलाच जाणवू लागला आणि निवाऱ्याला आसपास कोणतेही झाड अथवा बस स्थानकाची सावली नसल्याने उन्हाचा त्रास असह्य होऊ लागला. अप्पांच्या बरोबरच्या गप्पांची गाडी अखेर त्या उन्हावर घसरली आणि ते सात्विक संतापाने उद्गारले, 'नुसत्या सिमेंट कॉंक्रिटच्या भिंती बांधायचं आम्हाला कळतं, साधी झाड लावायच समजू नये! इतका पैसा आहे. श्रीमंत नगरपालिका म्हणून गाजावाजा होतोय; पण या कारखान्यामुळे गावाच गावपण गेलंय एवढा मोठा रस्ता, एकही झाड लावायचं सुचू नये.... '

अप्पा त्या वेळी केवळ संतापून थांबले नाहीत. घरी गेल्यावर त्यानी पिंपरी-चिंचवड नगरपालिकेच्या त्या वेळच्या नगराध्यक्षांना-श्री. दिनेश अफझुलपूरकर याना पत्र टाकून कळविले आणि काय आश्चर्य, चिंचवडस्टेशनला रस्त्यावर तातडीने बसस्थानक उभारण्यात आले. दोन गुलमोहराची झाडे लावण्यात आली.

अस्ताव्यस्त पसरलेल्या आजच्या या महानगरीच्या वृक्षारोपणाचा पहिला कार्यक्रम असा गाजावाजा न होता झाला!

एकीकडे सतत धडधडत रहाणारा मुंबई-पुणे हमरस्ता रूंदीकरणामुळे झाडे तोडल्याने ओकाबोका दिसत होता. त्याचबरोबर भोसरी परिसरात कारखान्यांचे जंगल फोफावत होते त्या जंगलातून राबणाऱ्या माणसाची गर्दी दिवसेंदिवस वाढतच होती. एका विलक्षण गतीनं छोटयाशा गावाचं महानगरीत रूपांतर होत होतं. आपलं जीवन फुलविण्यासाठी आलेला माणूस या गतिमान चक्रात स्वतःला हरवून बसला होता. वाहनांनी गजबजलेले रस्ते, हळूहळू उंच वाढणाऱ्या सिमेंटच्या इमारती, त्याचबरोबर खरजेसारखी झपाटयान फोफावणारी झोपडपट्टी. पैशाच्या मोहामुळे अस्ताव्यस्त बांधलेल्या उबग आणणाऱ्या चाळी, तुंबलेली गटारे, डुबणारी डुकरे, पिंपरी-चिंचवड नगरी जन्मत:च गलिच्छपणाचा, रूक्षपणाचा रोग घेऊन आली!

रस्तारूंदीकरता झाडे तोडली गेली. कारखाने, घरे, चाळी बांधताना झाडांची तोड झाली. एकेकाळी हिरव्यागार डुलणाऱ्या शेतांच्या जागी एक सुस्त, रूक्ष, भगभगीत अशी नगरी उभी राहिली. निसर्गापासून दूर जाणारी... वाहनाच्या धुरात कारखान्यांच्या खडखडाटात हरवून बसलेली ..

कुणालाच हिची काळजी नव्हती. इथं रहाणाऱ्याना या कोंदट-रूक्षपणावरचा इलाज सापडत नव्हता किंवा त्यांना सवड नव्हती. आणि अशातच ती जणू काही उपवर झाली म्हणून तिला महापालिका लाभली! आणि या महापालिकेचे कुशल प्रशासकही!

एका अत्यंत अवघड कामगिरीची जबाबदारी आपल्या शिरावर घेऊन श्री. हरनामसिंग यानी आपल्या कामास सुरुवात केली आणि बघता बघता केवळ दोनच वर्षात या महानगरीचा चेहरामोहरा बदलून टाकला. रूक्ष, ओसाड, भगभगीत भासणारी महानगरी आता डोळयाना सुखावू लागली. पूर्वी थकला-भागला कामगार सुट्टी मिळताच बायकामुलासह पुण्याला – लोणावळयाला नेहमी पळत असे. या कटाळवाण्या, भगभगीत वाटणाऱ्या नगरीपासून लांब जात असे. दिवसभर आठवडयाचे श्रम विसरण्यासाठी निसर्गाच्या ओढीने जात असे आणि पुन: काम करण्यासाठी एक उत्साह घेऊन येत असे. आता चित्र बदलू लागलंय. पिंपरी-चिंचवड परिसर फुलू लागलाय, खुलू लागलय त्याच्या शरीरावर एक हिरवी झाक पसरू लागलीय. बागबगीचे वनश्रीनी मोहरून गेलेत. आठवडयातून एकदा बाहेर पळ काढणारा कामगार आता रोज निसर्गाच्या सन्निध्यात जाऊ लागलाय. हरवलेल्या नगरीचा सूर त्याला गवसलाय. चार हाताच्या अंतरावर कुठेही जा, त्याला सावली झालीय. क्षणभर जगाला विसरून श्रमपरिहार करण्यासाठी निसर्ग त्याच्या जवळ झालाय. अगदी जवळ!

मुंबई-पुणे हमरस्त्यावर निगडीच्या पश्चिमेस एक उंच हिरवागार पुंजका दिसतो. जणू पाचूचे बेटच! चार-पाच वर्षांपूर्वी उघडीबोडकी असणारी ही टेकडी होती. आणि अगदी परवापरवापर्यंत इथ सुरूंग लावून काळाकभिन्न दगड या टेकडीच्या खाणीतून काढला जात असे. आज त्या टेकडीचं रूपांतर नयनरम्य अशा ठिकाणात झालय. सर्वत्र उंचसखल भागात हिरवळ पसरलेली. दाट झाडी-दिवसा काळोख वाटावा इतकी! त्या हिरवळीवरून जात जात टेकडी चढतानाचे श्रम बिल्कुल जाणवणार नाहीत अशी रचना. छोटे छोटे रस्ते-नैसर्गिक वाटावेत असे पाण्याचे झरे. त्या झऱ्याचं पाणी सर्वत्र अशा रीतीनं खेळवलेलं की लावलेल्या वृक्षांना त्याचा उपयोग व्हावा. अधूनमधून हिरवळीतून डोकावणारे काळे खडकही मनाला मोहात पाडतात. टेकडीच्या मध्यावर एक छोटासा जलाशय आहे. दगडाची पूर्वीची खाण. एका बाजूला खोदलेली दगडी भिंत. त्या भिंतीवरून विविध प्रकारच्या वेली पाण्याकडे झेपावताना दिसतात. स्वच्छ पाणी, बांधलेला परंतु नैसर्गिक वाटावा असा कठडा, सभोवार हिरवळ, विविध प्रकारचे सळसळणारे निस्तब्ध मासे, आणि पांढरीशुभ्र तरंगत जाणारी बदके. आसपासच्या वृक्षराजीतून विविध रंगाचे पक्षी मधूनच पाण्यावर पंख फडफडवून जाताना दिसतात. वाऱ्याच्या झुळुकीनं आपण स्वत:ला हरवून बसतो. लहानांप्रमाणेच मोठयांना आकर्षित

करणारी पवनचक्की, वाऱ्याच्या झोतावर तिचे मोठे पख फिरत असतात. त्या शात, निशब्द वातावरणात, तिचा येणारा एक प्रकारचा लयबद्ध आवाज आणि गती मनाला प्रसन्न करून सोडते. टेकडीच्या माथ्यावरून सूर्यास्ताची शोभा पहात रहाण्यातला आनद, हुरहूर अपूर्वच !

या स्वप्नवत वाटणाऱ्या किमयेचा किमयागार – एक प्रसन्न चेहऱ्याचे छोटीशीच परंतु गालभर दाढी असलेले कुशल प्रशासक हरनामसिंग ! नावामुळे वाटणारा दबदबा, आय. ए. एस. बिरूदावलीने वाटणारा रूढ आदर आणि प्रशासक या खडबडीत शब्दांतून व्यक्त होणारा चावकाचा सणसणीतपणा. या सर्वांमधूनही हरनामसिंग वेगळे उठून दिसतात, लक्षात रहातात ते त्यांच्या मृदू बोलण्याने ! कुठेही अधिकारपणाचा आव नाही. सुरुवातीला आले त्यावेळी अडखळत एकएक शब्द मराठी उच्चारणारे हरनामसिंग आता अस्खलित मराठी बोलू लागलेत. केवळ अधिकारपदानेच नव्हे तर मनाने या महानगरीशी एकरूप झालेत. त्यांच्या वृक्षारोपण, वृक्षसवर्धनाच्या कार्याचा गौरव नुकताच वृक्षसवर्धन मंडळाने करून त्याना 'निसर्गपुत्र' हा किताब आणि रोख एकहजार रुपयाचे पारितोषिक दिले. त्यांच्या कार्याची यावरून सहज कल्पना येईल.

केवळ दोन वर्षात पिंपरी–चिंचवड परिसरात पाच लाख वृक्ष लावून त्यांचे सवर्धन करणाऱ्या व्यक्तीशी माणूसच्या वाचकासाठी हितगुज करावे म्हणून गेलो. (यातील एक लाख नव्वद हजार वृक्ष एकट्या दुर्गा टेकडीवर लावण्यात आलेत !)

'निसर्गपुत्र' हा सन्मान मिळाल्याबद्दल 'माणूस' तर्फे हरनामसिंग याचे अभिनंदन करून मी त्यांना विचारलं, 'केवळ दोनच वर्षं आपल्या कारकिर्दीला झालीत. एवढ्या अल्पावधित आपण या रूक्ष, औद्योगिकरणाने गजबजलेल्या महानगरीचा कायापालट कशा प्रकारे केलात...?'

'प्रथम मी 'माणूस' ला धन्यवाद देतो. माझा हा जो सत्कार झालाय तो सत्कार केवळ माझाच एकट्याचा नसून, या महानगरीतील नागरिकाचा, विद्यार्थ्यांचा, तरुणमंडळाचा – विविध संस्थांचा, कामगाराचा उद्योग समूहाचा आणि आमच्या महापालिकेतील कर्मचाऱ्याचा – विशेषत उद्यान विभागाच्या कर्मचाऱ्यांचा आहे असे मी मानतो. या सर्वांचे वृक्षारोपण कार्यक्रमास सहकार्य लाभले म्हणूनच या महानगरीचा थोड्याफार प्रमाणात कायापालट करता आला.'

आपल्या मुद्याचे स्पष्टीकरण करताना हरनामसिंग म्हणाले, 'प्रशासकपदाची सूत्रे हातात घेतल्यावर मला सर्वप्रथम एक गोष्ट जाणवली–ती म्हणजे औद्योगिकरणाचा प्रचड वेग आणि नगर विकासातील मंद गती. येत्या काही वर्षात येथे सिमेंटच्या भव्य भिंती आणि धूर ओकणाऱ्या उच चिमण्या याशिवाय काही दिसणार नाही. औद्योगिकरणाबरोबर सतत वाढणारी लोकसंख्या – माणसाची गर्दी वाढत रहाणार, कामगार वसाहती वाढत रहाणार आणि मोकळ्या जागेत अनधिकृत बांधकामे, झोपडपट्ट्या वाढत रहाणार असे माझ्या नजरेसमोर दृश्य आले आणि त्यातून आरोग्याच्याबद्दल काळजी वाटू लागली. झोपडपट्ट्यासारख्या वस्त्यांमुळे आरोग्याचे–साडपाण्याचे *असख्य प्रश्न भेडसावू लागले* होते.'

## दुर्गा टेकडीवरचा चमत्कार

'या परिसरातील पर्यावरणाबाबतच्या समस्या कशा प्रकारच्या आहेत ? त्यासंबंधीच्या कायम स्वरूपाच्या योजना कोणत्या आखल्या आहेत ?' या प्रश्नावर हरनामसिंग म्हणाले. 'प्रदूषण हा या युगातील सर्वात मोठा प्रश्न बनला आहे. प्रदुषणाचे नागरी जीवनावर दूरगामी परिणाम होत असतात आणि त्याची जाणीव मला इथ आल्यावर प्रकर्षाने झाली. वातावरणातील समतोल राखण्यासाठी मोकळ्या जागाचे आरक्षण करण्याची योजना तयार करून मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करण्याचा मी निश्चय केला. शासनाच्या वीस कलमी कार्यक्रम धोरणाशी सुसंगत असा हा कार्यक्रम होता. ही सगळी धुराडी, त्यातून बाहेर पडणारा धूर, विषारी वायू, वाहनाची प्रचड गर्दी, त्याच्यातून बाहेर पडणारा धूर यामुळे हवेतील कार्बनमोनाऑक्साईड आणि कार्बनडाय ऑक्साईड वायू याचे प्रमाण वाढल्याने नागरिकांच्या स्वास्थ्यावर त्याचा परिणाम झाल्याचे लक्षात आले. नागरिकाचे जीवन गुदमरल्यासारखे झाले. पुढे ते अधिकच होईल. यासाठी वृक्षारोपण हाच एकमेव दीर्घकालीन कायम स्वरूपाचा उपाय आहे आणि त्याचा उपयोग आम्ही करून घेतला.'

'आपल्या निसर्ग प्रेमामागचे रहस्य काय. प्रेरणा कोणती ?' या प्रश्नावर ते किंचित हसून म्हणाले. 'यामागे रहस्य ते काय असणार ? माणूस हा स्वभावतच निसर्गप्रिय असतो. त्याला निसर्गात रममाण होणे आवडते हिरवळ (लॉन) पाहिल्यावर कुणाला बसावेसे वाटत नाही ? मानवाला निसर्गाचे आकर्षण पुरातन कालापासून आहे औद्योगिकरणामुळे तो श्रम आणि पैसा या चक्रात अडकला. त्यातून सुटका जरी करता आली नाही तरी त्याचे श्रम, त्याचा त्रास कमी व्हावा, त्याला शुद्ध निर्मळ हवा मिळावी यामाठी हा प्रयत्न. प्रसिद्ध तत्वज्ञ रूसो यानी तर अशी घोषणाच केली होती. Back to nature ! आपल्याकडील सत ज्ञानेश्वर–संत तुकाराम यानी सुद्धा वृक्षवल्लीचे मानवाशी असलेले नाते सागितले आहे; परतु मला याहीपेक्षा जाणीव होती ती म्हणजे आधुनिक *काळात मानवी जीवन गतिमान झाले आहे,* गुतागुतीचे झाले आहे. माणूस त्यात गुरफटत चालला आहे. त्याचे मन त्यातून सोडवायचे आहे. त्याच्या मनावर त्याचा परिणाम झाला आहे. मनाला प्रसन्न वाटेल, विरंगुळा वाटेल, असे एखादे केंद्र असावे असे वाटले. निसर्गाच्या आपण सान्निध्यात आहोत, 'मॉडर्नलाईफ' च्या काळात निसर्ग प्रवाहापासून दूर नाही असे वाटावे, निसर्गाशी जवळीक साधावी यासाठी सहलकेंद्र – उपवन प्रकल्प हाती घेतला. गढवालच्या चिपको आदोलनासबधी माहिती आहे. मनुष्याचे निसर्गाशी नाते किती अतूट आहे हे त्यातून दिसते'

नगरपालिका काळातील वृक्षारोपणासंबंधी बोलताना ते म्हणाले, 'नगरपालिकेच्या काळात वृक्षारोपणाचे कार्य चागल्याप्रकारे झाले. महापालिका झाल्यावर याचे परीक्षण केल्यावर असे लक्षात आले की, याची गती वाढवली नाही तर लवकरच या नगरीचे रूपातर एका गलिच्छ नगरीत होईल. त्यामुळे पूर्वीच्या लोकानी सुरुवात केली होती त्यातच आणखीन प्रयत्न केले. पर्यावरण प्रदूषण समस्येच्या सोडवणुकीसाठी शासनाने 'वॉटरपोल्युशन' सारखी मडळे स्थापन केली आहेत. त्याचे नियम कारखान्याना लागू असतात. त्याचे काटेकोर पालन होईल याकडे या

संस्था लक्ष देत असतात. महापालिकेने या सर्व प्रश्नाच्या मुळालाच हात घालून प्रचड प्रमाणात वृक्षारोपण करून भविष्यातील *संकटावर मात करण्याचा प्रयत्न केला आहे.'*

'दुर्गादेवी प्रकल्पाला पक्षितज्ज्ञ सलिम अलि, राज्यपाल आय. एच् लतिफ, सुप्रसिद्ध उद्योगपती आणि सुदर पुणे या कल्पनेचे जनक शंतनुराव किर्लोस्कर यासारख्या थोर मडळींनी भेट देऊन त्या प्रकल्पाबद्दल गौरवोद्गार काढलेत. *त्या प्रकल्पासबधीची कल्पना* कशी काय पुढे आली ?' यावर हरनामसिंग म्हणाले,

'दुर्गादेवी टेकडी ही एक विराण–भकास टेकडी आहे सर्वत्र खडक असलेल्या टेकडीवर खुरट्या गवताशिवाय काही उगवत नसे ही *टेकडी तशीच राहिली असती तर तिथे* औद्योगिकरणाने झोपडपट्ट्या झाल्या असत्या जसे पुण्यात पर्वती परिसरात झाले आहे. अशा परिस्थितीत त्यावेळचे पुणे जिल्हाधिकारी आणि नगरपालिकेचे अध्यक्ष श्री. दिनेश अफझुलपुरकर यानी या प्रकल्पाला प्राधान्य देऊन शासनाकडून ही टेकडी पालिकेच्याच ताब्यात त्याच्यात परिवर्तन करण्यासाठी घेतली आणि आम्ही 'टॉप प्रायॉरटी' कल्पनेवर त्याचा विकास घडवून आणला मोठमोठ्या शहरामध्ये काहीना काही आकर्षण असते पर्यटकाना आकर्षित करेल असे या भागात काहीच नसल्यामुळे एक पर्यटन केंद्र म्हणून या टेकडीचा विकास आम्ही करीत आहोत तरुण, आबालवृद्ध, स्त्री–पुरुषाना हे एक विश्रांती स्थान झाले आहे त्यामुळे शहराच्या सौदर्यात भर पडली आहे. डॉ. सलिम यानी या टेकडीवर एक तासापेक्षा अधिक कालावधित पक्षी निरीक्षण केले आणि वृक्षारोपणासबधी काही सूचना केल्या झाडे कोणत्या प्रकारची लावावीत म्हणजे पक्षी आकर्षित होतील, पाणी–जलाशय कसे ठेवावेत यासाठी त्याचा सल्ला आम्ही उपयोगात आणला. महाराष्ट्राचे राज्यपाल आय एच् लतिफ यानी या प्रकल्पास भेट देऊन वृक्षारोपण केले आणि मला अभिमान वाटतो की, त्यानी महाराष्ट्रातील सर्व महापालिकाना या प्रकारच्या योजना राबविण्याबाबत सल्ला दिला त्याच्या समवेत पिंपरी–चिंचवड परिसरातील मडळे, सस्था, महिला मडळे, शिक्षणसंस्थानी वृक्षारोपण केले या टेकडीवरील झाड हे या परिसरातील कुणी ना कुणी व्यक्तीने लावलेले आहे. त्यासाठी या खडकाळ टेकडीवर बाहेरून माती आणून मगच वृक्षारोपण केले. *पाण्याचा योग्य तो वापर* केला. उच सखल भागाचा नैसर्गिक बाज न मोडता लॉन्स तयार केले त्यामुळे 'दुर्गा टेकडी प्रकल्प' एक रमणीय सहल केंद्र म्हणून भविष्यात पिंपरी–चिंचवडकरांनाच नव्हे तर पर्यटकानाही आकर्षित करेल. येथील वृक्षराजीमुळे *आपोआपच पक्षी येऊ लागलेत* आणि भविष्यात हे नैसर्गिकरित्या एक पक्षी अभयारण्य बनेल'

पिंपरी–चिंचवड महानगरविषयी बोलताना हरनामसिंग म्हणाले, 'माझा कामावरती अधिक भर असतो. जी कामे लोक*नियुक्त प्रतिनिधीना करण्यात अडथळे येतात* त्याना मी प्राधान्य दिले. हे महानगर नवीन आहे. इतर शहरासारखा याचा तोंडावळा नाही. त्या त्या ठिकाणच्या भौगोलिक परिस्थितीप्रमाणे त्या त्या भागाचे प्रश्न असतात. त्याची सोडवणूक त्याप्रमाणे करावी लागते आणि म्हणूनच वृक्षारोपण आणि सवर्धनाला मी प्राधान्य दिले आहे. मानवाला निसर्गाची गरज आहे. आजच्या गतिमान, गुतागुतीच्या *युगात मनुष्य निसर्गापासून दूर फेकला गेल्याने* त्याच्या मानसिक आणि शारीरिक क्षमतेवर परिणाम झाला आहे. निसर्गाकडे त्याला जाता येणं अवघड असल्याने निसर्ग त्याच्या जवळ आणण्याचा हा प्रयत्न केला आहे. त्याला सर्वांच्या सहकार्याने यश येत आहे.'

*हरनामसिंग यानी आपल्या सथ मृदू भाषेत* मानवाच्या आणि निसर्गाच्या नात्यासबधी विश्लेषण केले महानगरपालिकेसारख्या अत्यंत क्लिष्ट आणि रुक्ष सस्थेच्या प्रशासकपदी राहूनही त्याचे मन सवेदनशील राहिले आहे. यातच त्याच्या निसर्गप्रेमाचे रहस्य आहे. जसे *स. गो. बर्वे याचे नाव पुण्याशी निगडीत* झाले आहे, तसेच 'निसर्गपुत्र' हरनामसिंग याचे नाव पिंपरी–चिंचवडशी कायमचे निगडीत झाले आहे यात सशय नाही.

—गिरीश प्रभुणे

---


## 'निसर्गपुत्र'

निसर्गाचे वेड असणारे श्री. हरनामसिंग (३८) हे दिल्ली विश्वविद्यालयाचे राज्यशास्त्राचे एम. ए आहेत १९७३ ला आय. ए. एस उत्तीर्ण झाल्यावर महाराष्ट्रात चद्रपूर जिल्ह्यात असि. कलेक्टर म्हणून त्यांची नेमणूक झाली. त्यानतर ते गोंडियाला सबडिव्हिजनल ऑफिसर झाले. त्यानतर विशेष ट्रेनिंगसाठी (कोलबो प्लाट) अमेरिकेतील बर्मिंग्हॅम विद्यापिठात एक वर्षभर होते. त्यानतर आदिवासी विकास महामडळाचे मॅनेजिंग डायरेक्टर या पदावर रूजू झाले.

पिंपरी–चिंचवड महानगरपालिकेत प्रशासक म्हणून येण्यापूर्वी 'अर्बन लँड सिलिंग पुणे, मध्ये अॅडिशनल कलेक्टर म्हणून त्यांनी आपली कारकीर्द यशस्वीपणे केली. पिंपरी–चिंचवडला त्याची एक वर्षाकरिता नेमणूक झाली होती. सतत तीन वर्षे त्याना मुदतवाढ मिळाली. आपल्या कार्याच्या विशिष्ट पद्धतीमुळे पिंपरी–चिंचवडच्या सर्वांगीण विकासात त्यानी गती आणली आहे त्याच्या कारकिर्दीत पूर्णत्वाला जाणारी मोठी कामे आहेत–पिंपरीचा 'फ्लाय ओव्हर ब्रिज', प्रशासकीय इमारत, दुर्गा टेकडी, गुलाबपुष्प वाटिका, मुबई–पुणे हमरस्त्याचे निगडी ते फुगेवाडी रूंदीकरण, झोपडपट्टी निर्मूलन प्रकल्प, अडरग्राऊड ड्रेनेज ह काही ठळक गोष्टी सागता येतील.

---

# भारताची सागर संशोधन संस्था



● डॉ. सुभाषचंद्र सारंग ●

Have you any problems connected with the sea ? Approaeh NIO भारताच्या सागर संशोधन सस्थेचे हे आवाहून आहे. NIO म्हणजे नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ ओशनोग्राफी. गोव्यामध्ये, पणजी पासून जवळच डोनापावलाच्या ऊच टेकडीवर भारताची ही अत्यंत महत्त्वाची संशोधन सस्था असून गोव्याच्या मांडवी आणि झुआरी या नद्या ज्या ठिकाणी समुद्राला मिळतात त्या ठिकाणच्या मध्यवर्ती टेकडीवर या सागर सशोधन संस्थेला मिळालेले स्थान अत्यत रम्य स्वरुपाचे आहे.

भारताच्या अटार्क्टिका मोहिमांमध्ये या संस्थेचा सहभाग मोलाचा आहे एम् व्ही. पोलार सर्कल' या नौकेमधून भारतीय शास्त्रज्ञांचे पहिले पथक ६ डिसेंबर १९८१ रोजी मार्मगोवा बंदरातून अंटार्क्टिकेकडे निघाले. मोहिमेचे नाव होते 'ऑपरेशन गंगोत्री.' आणि त्याबरोबरच डोनापावलाच्या सागर संशोधन केंद्राचे नाव देशभर ज्ञात झाले.

कौन्सिल ऑफ सायंटिफिक अँड इंडस्ट्रियल रिसर्च (CSIR) मार्फत इ स. १९६६ मध्ये या सागर संशोधन सस्थेची स्थापना करण्यात आली. NIO ही भारताची एकमेव सागर संशोधन संस्था असून तिची प्रादेशिक केंद्रे, मुंबई, वाल्टेअर आणि कोचिन येथे आहेत.

मानवाने त्याला उपलब्ध असलेल्या तुटपुंज्या जमिनीचा अनियोजित वापर करून जमिनीवरील साधन संपत्ती प्रमाणाबाहेर वापरून टाकली आहे. पृथ्वीच्या पृष्ठभागाचा २/३ पेक्षा जास्त भाग व्यापणारे सागर हाच मानव जमातीचा अखेरचा आधार आहे. अन्न, रसायने, ऊर्जा, खनिजे, खनिज तेल या सर्वांसाठी मानवाला सागरावरच अवलंबून रहावे लागणार आहे. भारतीयाच्या दृष्टीने सागराचे महत्व अनन्यसाधारण आहे. प्रत्येक भारतीयाच्या जीवनाशी निगडीत असणारा 'मन्सून' हा एक प्रकारे सागरी ऊर्जेशी संबंधित असाच आविष्कार आहे. सागराचा जास्तीत जास्त विनियोग करण्याच्या दृष्टीने राष्ट्रीय स्तरावरील संशोधन व विकास कार्यक्रम हाती घेणाऱ्या संस्थेची देशाला नितांत गरज होती व ती NIO ने पूर्ण केली आहे. सागर विषयक माहिती शास्त्रज्ञ, नियोजनकार आणि शासन यांना पुरविण्याचे मोलाचे कार्य ही सस्था करते.

NIO चा सचालक हा रिसर्च अॅडव्हायझरी कौन्सिल (RAC) व एक्झीक्यूटिव्ह कमिटी (EC) यांना जबाबदार असतो. संस्थेतील प्रत्येक विभागाचे प्रमुख तसेच प्रादेशिक केंद्रांतील प्रमुख व शास्त्रज्ञ हे सर्व संचालकाला जबाबदार असतात. आज डोनापावलाची मुख्य संस्था व तीन प्रादेशिक केंद्रामध्ये, प्रशासकीय अधिकारी, शास्त्रज्ञ व तंत्रज्ञ तसेच कर्मचारी मिळून सुमारे सहाशे व्यक्ती काम करतात. त्यापैकी २/३ शास्त्रज्ञ व तंत्रज्ञ आहेत. प्राकृतिक सागर शास्त्र, रासायनिक सागरशास्त्र, भूगर्भ–सागरशास्त्र जैविक सागरशास्त्र, सागरशास्त्रीय उपकरण विभाग, सागर–अभियांत्रिकी व नियोजन अशा सात प्रमुख विभागामार्फत या सस्थेचे कार्य चालते

भारतीय सागरी विभागाचे प्राकृतिक, रासायनिक, जैविक, भूस्तरीय, भूभौतिक ज्ञान मिळविणे, आवश्यक त्या सागरशास्त्रीय उपकरणाचा विकास करणे या उद्दिष्टाबरोबरच सागरातील जैविक साधन सपत्तीचा शोध, सागरी कृषितंत्राचा विकास, सागरतळावरील खनिजाचा शोध, सागरी प्राणी व वनस्पतीपासून औषधी व रसायनांची निर्मिती, सागरी ऊर्जेचा वापर, सागरी क्षेत्रातील

खनिज तेलाचा शोध, किनारे व बदराचा विकास व सागराच्या प्रदूषणावर प्रभावी उपाय योजना करून सागरी क्षेत्रात सशोधन व विकास करणाऱ्या सस्थाना माहिती पुरविणे अशा विविध प्रकारचे कार्य ही सस्था करते. NIO ने अनेक ठिकाणी सागरी खनिज क्षेत्रे निश्चित केली आहेत लाटा, भरती–ओहोटी व सागरी तापमानातील भिन्नतेचा ऊर्जा निर्मितीच्या दृष्टीने उपयोग करून घेण्याच्या दृष्टीने प्रयोग चालू आहेत. सागरी लाटामुळे किनाऱ्याची होणारी झीज थाबविण्याच्या दृष्टीने उपाय योजना सुचविली आहे. खाड्या व समुद्र या मधून सुरक्षित व मोठ्या प्रमाणावर वाहतूक करण्यासाठी मार्ग सुचविले आहेत. सागरी प्रदूषणाचा अभ्यास करून आपले सागरी पर्यावरण सुरक्षित राखण्याचे प्रयत्न केले आहेत. त्यासाठी सागरी किनाऱ्यावर कारखान्याच्या जागाच्या निश्चितीपासून तो कारखान्यातील त्याज्य पदार्थांच्या विल्हेवाटीपर्यंत ही सस्था मार्गदर्शन करते सागर तळावरून नळ टाकण्यासाठी सुद्धा या सस्थेने मार्गदर्शन केले आहे भारताच्या तेल व नैसर्गिक वायू मडळाला ही संस्था मार्गदर्शन करते मुबई–हाय तेलक्षेत्राच्या विकासाच्या बाबतीत या सस्थेचे मार्गदर्शन मोलाचे ठरले आहे.

अरबी समुद्र व बगालच्या उपसागरामधील अनेक मत्स्य-क्षेत्रे विकसित करण्यासाठी NIO ने परिश्रम घेतले आहेत. झिंगे म्युसेल व सागरी वनस्पतीच्या विकासासाठी प्रयोग करून निश्चित उपाययोजना सुचविली आहे हिंदी महासागरातील धातूच्या गोट्याचे व्यापारी तत्वावर उत्खनन अथवा सकलन करणे NIO मुळेच शक्य होणार आहे सागरी औष्णिक ऊर्जा परिवर्तना-(OTEC) साठी यत्रणा निर्माण करण्याचे कार्य सुद्धा या सस्थेने केले आहे

सागरापासून गोडे पाणी मिळविणे, मासे वाळविणे इ. साठी प्रकल्प विकसित करणे किनाऱ्याच्या लाटामुळे होणाऱ्या झिजेला पायबंद घालणे, बदर विकासासाठी मार्गदर्शन करणे ही NIO ची कार्ये अत्यत महत्वाची आहेत. म्हणजेच आता भारतीयाना अटार्क्टिका मोहिमेच्या रुपाने ज्ञात झालेली ही सशोधन सस्था सागराशी सबधित अशा असंख्य प्रश्नावर व्यापक व परिपूर्ण सशोधन करीत आहे.

## सुसज्ज संशोधन नौका

'महासागर' हे त्रैमासिक NIO मार्फत नियमितपणे प्रकाशित केले जाते भारतातील सागर शास्त्रज्ञ, सागर सशोधन प्रकल्प व सागरी सशोधन व प्रशिक्षण देणाऱ्या सस्था याची माहिती देणारी प्रकाशने या सस्थेने निर्माण केली आहेत. सागरी–नकाशा सग्रह, तांत्रिक अहवाल, छोट्या मोठ्या पुस्तिका या खेरीज सुमारे एक हजारपेक्षा जास्त सशोधन निबंध या सस्थेने प्रकाशित केले आहेत या सर्व प्रकाशनावरून NIO च्या कार्याची व्यापकता लक्षात येते

डोनापावलाच्या डेकडीवर खास या सस्थेच्या विविध विभागाना सोयिस्कर अशी सुरेख इमारत आहे इमारतीमध्ये प्रत्येक विभागाच्या सुसज्ज व अत्याधुनिक अशा प्रयोगशाळा आहेत. माहितीच्या विश्लेषणासाठी थर्ड जनरेशन–कॉम्प्यूटर(TDC–316) आहे सागरी जीवाच्या संशोधनासाठी असलेल्या ॲक्वाकल्चर प्रयोगशाळेत समुद्राचे पाणी खेळविले असून त्याला कोणत्याही धातूचा स्पर्श होणार नाही अशी व्यवस्था करण्यात आली आहे चक्री वादळाची सूचना देणारी खास रडार यत्रणा या सस्थेकडे आहे. भारतीय हवामशास्त्र विभागाने पुरविलेल्या या रडारमुळे ५०० चौ कि मी. क्षेत्रातील अचूक माहिती व पूर्व सूचना मिळू शकते. NIO च्या समृद्ध ग्रथालयात सुमारे १४ हजार शास्त्रीय ग्रथ, चार हजार पेक्षा जास्त तांत्रिक अहवाल, सागरशास्त्रीय माहिती देणाऱ्या शोध निबधाच्या हजारो रिप्रिंटस् आहेत दर वर्षी तीनशेपेक्षा जास्त सशोधन विषयक नियतकालिके या संस्थेकडे येत असतात. सस्थेचा स्वतत्र वर्कशॉप आहे छायाचित्रण विभाग, मुद्रण विभाग, आलेखन विभाग व परिक्षण विभागाने NIO परिपूर्ण आहे

शास्त्रज्ञ व कर्मचारी याच्यासाठी निवास व्यवस्था, वसतीगृह, उपहारगृह, बंक, पोस्ट ऑफिस, दवाखाना अशा सर्व आवश्यक सुविधा NIO मध्ये आहेत दोन मोठ्या सागर संशोधन नौका व अनेक छोट्या नौका सस्थेकडे आहेत. 'गवेषणा' व 'सागरकन्या' या दोन मोठ्या नौका आहेत, गवेषणी ही ६८ मीटर्स लाब व १२ मीटर्स रूद नौका असून त्यावर चार सुसज्ज प्रयोगशाळा आहेत. १९ शास्त्रज्ञ व ४५ इतर अधिकारी व खलाशी असलेली ही नौका सुमारे म'हनाभर सागरामध्ये राहून सातत्याने सशोधन करू शकते. सागर कन्या ही नौका १०० मीटर्स लाब व १६ मीटर्स रूद आहे. नौकेवर १३ प्रयोगशाळा आहेत ३२ शास्त्रज्ञ व ६० अधिकारी व कर्मचारी याची व्यवस्था नौकेवर आहे सलग दीड महिन्यापर्यंत ही नौका सागरात राहून सशोधन करू शकते. दोन्ही नौकावर छायाचित्रण विभाग, ग्रथालये व इतर आवश्यक सुविधा आहेत. NIO चे सागरी सशोधन या दोन नौकाच्या सहाय्याने चालते सशाधनासाठी NIO कडे अनुभवी व कुशल शास्त्रज्ञ आहेत. ते केवळ सशोधन कार्य करतात असे नाही तर सागराशी सबधित कोणत्याही समस्येवर उपाययोजना सुचवितात. त्यासाठी यत्रणा उभारण्यासाठी मार्गदर्शन करतात.

सागर सशोधनासाठी प्रशिक्षणाचे कार्यक्रम ही सस्था हाती घेते. तरुण शास्त्रज्ञाची निवड करून त्याना सशोधन सहाय्यक म्हणून सामावून घेते भारतातील अनेक विद्यापिठानी सागरशास्त्रीय पदव्यूत्तर अध्यायनाचे केंद्र म्हणून या सस्थेला मान्यता दिली असून एम्. एस् सी व पी एच् डी. पर्यंतचे अध्ययन या ठिकाणी करता येते देशातील व परदेशातील अनेक शास्त्रज्ञ सशोधनासाठी NIO मध्ये येतात त्याना सर्व सुविधा सस्थेमार्फत उपलब्ध करून दिल्या जातात. इतर अनेक सस्थामधील शास्त्रज्ञाना इथे प्रशिक्षण सुद्धा दिले जाते.

Queen of the East म्हणून ख्यातनाम असलेल्या गोमतकीय भूमीला दरवर्षी लक्षावधी भारतीय पर्यटक भेट देतात. गोव्याची मदिरे, चर्चेस, वाळूच्या चौपाट्या आणि नारळीच्या बनानी रम्य असे किनारे ही पर्यटकाची आकर्षण केंद्रे असतात. आकर्षण नैसर्गिकच आहे पर्यटकामध्ये महाविद्यालयीन व उच्च शिक्षण घेणाऱ्या तरुण–तरुणीचे प्रमाण काही कमी नसते. असे उसळते तारुण्य, फेसाळत्या लाटाचे वाळूचे किनारे आणि गोव्याची सुप्रसिद्ध फेणी याच्या मिलाफाची आगळी लिंग भोगणे हा सुखद व थरारता अनुभव असला तरीही त्यातही वेळ काढून निदान तरुणानी तरी डोनापावलाच्या या सागर सशोधन केंद्राला भेट देऊन शक्यती माहिती करून घेणे ही गोष्ट ज्या प्रकारचा नवा भारत आपण घडवू इच्छितो त्या दृष्टीने अत्यत मोलाची व आवश्यक आहे. गोव्याचा मगेश, रामनाथ आणि म्हालसेपेक्षा भारताच्या या नव्या तिर्थक्षेत्राचे महत्व निश्चित कमी नाही. □



# दुर्धर रोगाशी एकाकी झुंज

सन १९७३ चा वसंतऋतू संपत आला होता. मी व माझे यजमान म्हणजे प्रा. वॉरन जॉन्सन, जॉर्ज वॉशिंग्टन विद्यापीठाच्या रुग्णालयातील एका खोलीत डॉक्टरसाहेबांची आतुरतेने वाट पाहत बसलो होतो. ती खोली रिकामीच होती व आम्हा दोघांशिवाय त्या खोलीत दुसरे कोणीच नव्हते. घड्याळाचे काटे मंदगतीने पुढे सरकत होते; परंतु माझ्या मनात विचारांचे डोंब मात्र अतिशय वेगाने उसळत होते.

डॉक्टरसाहेब आज काय सांगतील? या एकाच प्रश्नाभोवती माझे विचार धिंगाणा घालीत होते. सन १९७२ च्या वसंतऋतूपासून माझ्या यजमानांची प्रकृती बिघडू लागली होती. डेनव्हर येथील आमच्या डॉक्टरांनी माझ्या यजमानांच्या रोगाविषयी जे निदान केले होते, ते ऐकून आम्ही दोघेही हादरून गेलो होतो. डॉक्टरांच्या मते माझ्या यजमानांना स्क्लेरोडर्मा नावाचा रोग झाला होता. डॉक्टरांचे हे मत ऐकल्यापासून मी बेचैन झाले होते. कारण माझ्या एका मैत्रिणीची आई नुकतीच या रोगाला बळी पडली होती आणि माझ्या त्या मैत्रिणीने, आपल्याला तो रोग झाला होता की काय, हे पडताळून पाहण्यासाठी, मातृवियोगानंतर आपलीही वैद्यकीय तपासणी करून घेतली होती. या पार्श्वभूमीवर आता आमच्या डॉक्टरांनी मत दिले होते की, त्या प्राणघातक रोगाने आपला मोर्चा माझ्या यजमानांकडे वळविला होता. साहजिकच माझ्या तोंडचे पाणी पळाले होते.

परंतु डेनव्हर येथील आमचे डॉक्टर काही त्वचारोगतज्ज्ञ नव्हते. त्यामुळे त्यांच्याच सल्ल्यावरून, आम्ही जॉर्ज वॉशिंग्टन विद्यापीठाच्या रुग्णालयात दाखल झालो होतो. या रुग्णालयातील ज्या निष्णात त्वचारोगतज्ज्ञ डॉक्टरांनी सन १९७३ च्या वसंतऋतूत माझ्या यजमानांची, सर्व प्रकारच्या चाचण्या घेऊन, वैद्यकीय तपासणी केली होती, ते डॉक्टर पूर्वी जगप्रसिद्ध मेयो-क्लिनिकमध्ये काम करीत होते व त्यांनी स्क्लेरोडर्मा झालेल्या रुग्णांवर उपचार केले होते. त्यामुळे माझ्या यजमानांच्या रोगासंबंधीचे त्यांचे आजचे निदान अधिक महत्त्वाचे व निर्णायक ठरणार होते.

या रुग्णालयात येण्यापूर्वी, आमच्या डेनव्हर येथील डॉक्टरांनी आम्हाला आमच्यावर कोसळलेल्या संकटाची कल्पना दिल्यापासून, आम्ही दोघांनी त्या प्राणघातक रोगासंबंधी जेवढी माहिती मिळविता येणे शक्य होते तेवढी माहिती मिळविली होती. ती सर्व माहिती आमच्या दृष्टीने पूर्णपणे निराशजनक होती. त्या माहितीचा सारांश असा की, स्क्लेरोडर्मा हा रोग फार थोड्या लोकांना होतो. बहुधा तो रोग स्त्रियांवर झडप घालतो. त्या रोगावर कोणताही परिणामकारक उपाय करता येत नाही आणि त्या रोगाचा शेवट रोग्याच्या मृत्यूबरोबरच होतो!

वरील सर्व माहिती आम्हाला दिलासा देणारी खासच नव्हती. तरीसुद्धा आम्ही दोघे परतपरत एकाच शक्यतेचा विचार मनात घोळवून, स्वतःला व एकमेकांना थोडासा दिलासा देत होतो. शक्य होते की, डेनव्हर येथील आमच्या डॉक्टरांचे निदान बरोबर नव्हते. कारण किती झाले तरी, ते काही त्वचारोगतज्ज्ञ नव्हते. आशेचा हा एकच किरण. त्याचा अंधुक प्रकाशच काय तो आम्हाला दिलासा देत होता; परंतु तो दिलासा काही आमची अस्वस्थता पूर्णपणे नाहीशी करू शकत नव्हता.

वॉशिंग्टन विद्यापीठाच्या रुग्णालयातील त्या ओसाड खोलीत बसून धडधडत्या अंतःकरणाने डॉक्टरसाहेबांची प्रतीक्षा करण्यात दोन तास गेले. शेवटी आमशी एकदाची डॉक्टरांची भेट झाली. ते शांतपणे माझ्या यजमानांकडे वळून म्हणाले, 'तुम्हाला स्क्लेरोडर्मा झालेला आहे. सुदैवाने, तो रोग तुमच्या शरीरात बळावत आहे, असे दिसत नाही. एका विवक्षित मर्यादेपर्यंत वाढून, तो आता तेथेच स्थिरावला आहे. घाबरून जाऊ नका. त्या रोगाने ज्याच्या शरीरात शिरकाव केलेला असतो असे काही लोक त्यानंतर दहा-दहा वर्षेसुद्धा जिवंत राहतात...' डॉक्टरांचे ते शब्द ऐकल्याबरोबर मला माझ्या

पायाखालील जमीन निसटते आहे, असे वाटले आणि कोठेतरी शांत ठिकाणी जाऊन ओकसाबोक्शी आक्रंदन करावे, अशी तीव्र ऊर्मी माझ्या मनात उसळून आली.

कोण होते हे प्रा. वॉरन जॉन्सन ? आलेल्या परिस्थितीला त्यांनी व त्यांच्या कुटुंबियांनी कसे तोंड दिले ? त्या सर्वांना आपले मानसिक धैर्य टिकवून ठेवण्याच्या कामी सर्वांत अधिक साहाय्य कोठून व कसे मिळाले ? त्यांनी आपल्यावर कोसळलेल्या आपत्तीला सामोरे जाताना जो मार्ग अनुसरला त्याचा इतरांना कसा उपयोग योईल ? या व अशा अनेक प्रश्नांची उत्तरे आपल्याला प्रा जॉन्सन यांनी स्वत: लिहिलेल्या 'सो डेस्परेट दि फाइट' या छोटयाशाच पण मोठया उद्‌बोधक पुस्तकात वाचावयास मिळतात. म्हणून या लेखात त्या पुस्तकाच्या आधारे प्रा जॉन्सन यांची कहाणी थोडक्यात सांगण्याचा प्रयत्न केला आहे मी स्वत: ते पुस्तक जेव्हा प्रथम वाचून संपविले तेव्हा, नकळत स्वत:शी म्हणालो, 'तेथे कर माझे जुळती !'

## प्रा. वॉरन जॉन्सन

वॉरन जॉन्सन यांचा जन्म सन १९२१ मध्ये डेनव्हर नावाच्या शहरात झाला. हे शहर म्हणजे अमेरिकेतील कोलोरॅडो राज्याची राजधानी. जॉन्सन यांचे बहुतेक शिक्षण डेनव्हरमध्येच झाले. डेनव्हर विद्यापीठातून, इंग्रजी व शिक्षणशास्त्र हे विषय घेऊन बी ए. व एम. ए या पदव्या मिळविल्यानंतर, त्यांनी सन १९५० मध्ये बॉस्टन विद्यापीठातून शिक्षणशास्त्रातील डॉक्टरेटची पदवीही संपादन केली. शिवाय, त्याच वेळी त्यांनी हार्वर्ड विद्यापीठात मानसशास्त्राचा पदव्युत्तर अभ्यासही केला आणि तेव्हापासून ते मेरिलॅन्ड विद्यापीठात प्राध्यापक म्हणून रुजू झाले. त्यांचे शिकविण्याचे मुख्य विषय म्हणजे आरोग्यशास्त्र व शारीरिक शिक्षण.

प्रा. जॉन्सन हे एक यशस्वी प्राध्यापक होते शिकविण्याबरोबरच त्यांनी संशोधन व ग्रंथलेखन या क्षेत्रातही स्पृहणीय कामगिरी बजाविली होती व म्हणून त्यांना अनेक मान–सन्मान प्राप्त झालेले होते. आपल्या व्यासंगाच्या विषयावर त्यांनी स्वत लिहिलेले, सहकाऱ्यांसमवेत लिहिलेले व संपादित केलेले, असे एकूण सोळा ग्रंथ प्रकाशित झालेले आहेत

प्रा. जॉन्सन यांनी ज्ञानसाधनेबरोबर बलोपासनाही केली होती. विद्यार्थीदशेपासून ते नेहमी अनेक मैदानी व मर्दानी खेळात भाग घेत असत पोहावयास जाणे, हायकिंगला जाणे व मासे पकडावयास जाणे, हे तर त्यांचे आवडते छंद होते. शिवाय ते चांगले तालीमबाजही होते आणि मल्लविद्येत प्रावीण्य दाखवून त्यांनी एक अत्युच्च सन्मानही मिळविलेला होता. आपल्या आरोग्याची ते नीट काळजी घेत असत. त्यामुळे त्यांची शरीरप्रकृती निरोगी व ठणठणीत होती. नाही म्हणावयास ते ३९ वर्षांचे असताना प्रथम त्यांच्या पायाच्या अंगठयाला व नंतर पायाला संधिवात झाला होता परंतु योग्य वेळीच त्या विकाराचे निदान झाले होते व त्यावर औषधोपचार केल्यावर त्या विकाराचा पूर्ण बीमोड झाला होता. आणि संधिवाताच्या त्या विकारामुळे त्यांच्यावर आपल्या दैनंदिन जीवनात कोणत्याच रीतीने बदल करण्याची पाळी आली नव्हती.

खाजगी जीवनातही प्रॉ जॉन्सन सुखी व समाधानी होते त्यांचे त्यांच्या पहिल्या पत्नीशी पटले नाही म्हणून त्यांनी तिच्यापासून पूर्वीच घटस्फोट घेतला होता. पहिल्या पत्नीपासून त्यांना एक मुलगा झाला होता. त्याचे नाव डाउग. त्यांचा दुसरा विवाह मात्र यशस्वी ठरला होता. त्यांच्या दुसऱ्या पत्नीचे नाव ज्युली, व तिच्यापासून त्यांना झालेल्या मुलीचे नाव ट्रेसी.

१९६८ किंवा १९६९ सालापासून प्रा. जॉन्सन यांच्या हातातून विलक्षण पेटके येऊ लागले होते. जो प्राणघात रोग त्यांच्यावर नंतर हल्ला करणार होता, त्याची ही कदाचित केवळ सुरुवात असावी. परंतु त्यांच्या डॉक्टरांनी त्यांना फक्त भरपूर जीवनसत्त्वे व विश्रांती घेण्याचा सल्ला दिला. डॉक्टरांना वाटत होते को मामला काही गंभीर नव्हता. व थोडयाच दिवसात प्रा. जॉन्सन यांना बरे वाटू लागेल. प्रा. जॉन्सन यांनाही तसेच वाटले. कारण त्यांची प्रकृती लहानपणापासून निकोप होती.

परंतु काही दिवसांनी प्रा. जॉन्सन यांची प्रकृती सुधारण्याऐवजी जास्तच खालावू लागली. विशेषत: त्यांचे सांधे फारच दुखू लागले, व त्यांच्या सर्व हालचाली मर्यादित व मंद गतीने होऊ लागल्या. त्यांना मोटारीत चढणे व तिच्यातून बाहेर येणे कठीण होऊ लागले. इतकेच काय पण त्यांना खुर्चीवरून उठणेही त्रासदायक होऊ लागले. त्याचप्रमाणे त्यांना जिना चढणे–उतरणेसुद्धा तापदायक होऊ लागले. हळूहळू रात्रीच्या झोपेचा प्रश्नही बिकट होऊ लागला. कारण त्यांनी अंथरुणावर कोणत्याही अवस्थेत पडून राहण्याचा प्रयत्न केला, तरी त्यांना आराम वाटत नसे. फक्त ते जेव्हा उताणे पडून रहात असत, तेव्हा निदान थोडा वेळ त्यांना बरे वाटत असे. शिवाय त्यांना दोन्ही पायातील नडग्यांच्या खालील भागातून कमालीच्या वेदना जाणवू लागल्या. अशा परिस्थितीत मालीश व व्यायाम करून स्नायूंवर व

---

एखाद्या माणसाच्या शरीरात या रोगानं प्रवेश केला की, प्रथम त्या माणसाला थोडया श्रमांनी थकवा येऊ लागतो थोडं काम केलं की त्याचे खांदे दुखू लागतात. तो चार पावलं चालला तरी त्याला धाप लागून थकल्यासारखं वाटतं. त्याच्या शारीरिक हालचाली सुसंगतपण होत नाहीत. त्याचे स्नायू व सांधे कमालीचे ठणकू लागतात. या रोगाचा पुढचा टप्पा म्हणजे अर्धांगवायू !

आणि या सर्वांचा शेवट म्हणजे मृत्यू.

या रोगाला एका प्राध्यापकानं स्वत:च्या हिंमतीवर दिलेली निकराची झुंज...

---

सांध्यांवर काहीच चागला परिणाम होत नव्हता. उलट त्यामुळे त्यांच्या वेदना मात्र वाढू लागल्या. आणि अतिउत्साहाच्या भरात त्यानी आपले डावे मनगट व मांडीचा साधा इतके दुखवून घेतले की, त्यातून बरे होण्यास त्याना जवळजवळ एक वर्ष लागले !

प्रा. जॉन्सन यानी डॉक्टराकडून उपाय करून घ्यावयास सुरुवात केल्यानतर जवळजवळ सहा महिन्यांनी त्याच्या हातांच्या बोटावरील त्वचा गुळगुळीत व मेणासारखी होऊ लागली आणि एक दिवस त्यांच्या डॉक्टरानी त्या बोटांचे वगैरे निरीक्षण करून निदान केले होते की, प्रा. जॉन्सन याना बहुधा स्क्लेरोडर्मा हा रोग झाला होता. परंतु त्या विषयातील तज्ज्ञ डॉक्टराकडून निदान करून घेणे इष्ट होईल, म्हणून त्यांनी प्रा. जॉन्सन व श्रीमती ज्युली जॉन्सन याना वॉशिंग्टन विद्यापीठाच्या रुग्णालयात पाठविले होते. आता त्या रुग्णालयात प्रा. जॉन्सन यांच्या प्रकृतीची कसून तपासणी केल्यानंतर त्याना सांगण्यात आले होते की, त्याना स्क्लेरोडर्मा हाच रोग झालेला होता.

## मृत्यूची चाहूल

स्क्लेरोडर्मा हा रोग संधिवातासारखा असतो, असे म्हणता येईल. परंतु तो प्रामुख्याने जरी शरीरातील सधायक ऊतीवर (Connective tissues) हल्ला चढवतो, तरी त्याच्या तावडीतून स्नायू व त्वचाही सुटत नाही. हा रोग झालेल्या माणसाच्या त्वचेमधील लवचिकपणा जातो आणि ती अधिक कडक व कोरडी होऊन फुटू लागते साहजिकच त्वचेवरील केस बाहेर येतात आणि त्वचा कमालीची नाजूक व सवेदनाक्षम बनते. रोग्याचा चेहेरा तर भुतासारखा दिसू लागतो.

एखाद्या माणसाच्या शरीरात या रोगाने प्रवेश केला की, प्रथम त्या माणसाला थोड्या श्रमानेही थकवा येऊ लागतो. शरीरातील विशिष्ट भागात तर असा थकवा विशेष जाणवू लागतो. त्याने थोडे काम केले तरी त्याचे खादे दुखू लागतात. तो चार पावले चालला तरी त्याला धाप लागून थकल्यासारखे वाटते. त्याच्या शारीरिक हालचाली सुसंगतपणे होत नाहीत व त्यामुळे जिना चढता-उतरताना तो पायऱ्या चुकतो. तो कोणतीही वस्तू उचलण्यास गेला तर त्याचे हात त्या वस्तूवर आपटतात. त्याचे स्नायू व साधे कमालीचे ठणकू लागतात, त्यामुळे त्याला कोणतीही हालचाल करणे फार अवघड जाते.

या रोगाचा पुढचा टप्पा म्हणजे अर्धांगवायू ! शिवाय रोग्याच्या हाडांमध्ये क्षते पडतात व त्याला पंगुत्व येते. अखेर त्याला तोंड उघडणेही शक्य होत नाही. परिणामी त्याला कृत्रिम उपायांनी अन्नपाण्याचा पुरवठा करावा लागतो. या सर्वाचा शेवट म्हणजे रोग्याचा मृत्यू !

वैद्यकशास्त्रात अजून या रोगावर उपाय सापडलेला नाही. किंबहुना या रोगासबंधी फारसे सशोधनही झालेले नाही. संशोधन होणार कसे ? हा रोग फारच क्वचित कोणाला होत असतो. ज्या कोणाला होत असतो त्याला डॉक्टराकडे उपचार करून घेण्यासाठी जाण्याचे श्रम करणेही कठीण असते. आणि थडीच्या दिवसात तर रोग्याचे हाल काही विचारूच नका ! बरे जो कोणी रोगी डॉक्टरांकडे जातो, त्याला बहुधा डॉक्टर, 'अॅस्पिरिन घेऊन जमेल तर वेदना कमी करा,' एवढाच सल्ला देतात. त्यामुळे रोगी उष्ण हवेच्या ठिकाणी जाण्याचा प्रयत्न करतो व स्वत.वर अॅस्पिरिनचा मारा चालू ठेवतो. मग त्या रोगावर फारसे सशोधन झालेले नाही, यात काय नवल ?

एकूण या रोगासबंधी जी काही माहिती उपलब्ध आहे, त्यावरून इतकेच म्हणता येते की, हा रोग संसर्गजन्य नाही. या एका चागल्या बातमीखेरीज प्रा. जॉन्सन याना कोणतीही आशादायक बातमी कोणत्याही डॉक्टरांकडून समजली नाही.

जॉर्ज वॉशिंग्टन विद्यापीठाच्या रुग्णालयातून परतल्यावर प्रा. जॉन्सन यांना थोड्याच दिवसात असे आढळून आले की त्याच्या त्वचारोगतज्ज्ञ डॉक्टराचे निदान थोडे चुकले होते. म्हणजे असे की, प्रा. जॉन्सन यांच्या शरीरात घुसलेला स्क्लेरोडर्मा हा रोग स्थिरावलेला नव्हता. तो बळावत होता. दिवसेंदिवस प्रा. जॉन्सन याची प्रकृती अधिकच ढासळू लागली होती. त्यांच्या मनगटावरील व बोटांच्या सांध्यावरील कातडी सुकली, कडक झाली व फुटू लागली. त्याच्या कातडीला नुसता स्पर्श झाला तरी त्याना असह्य वेदना होऊ लागल्या. आपले हात खिशात घालणेही त्याना जवळजवळ अशक्य होऊ लागले. हळूहळू त्याच्या पायाच्या घोटघांवर सूज आली. खांदे व माड्या याच्यामधील साध्याना ठणका लागला. हाताच्या, बोटांच्या व पायांच्या हालचाली जास्तच मंद व मर्यादित प्रमाणात होऊ लागल्या. आपल्या छातीमधील व पोटामधील संधायक ऊती (Connective tissues) कठीण होत होते हे त्याच्या लक्षात आले. चेहऱ्यावरील सुरकुत्या नाहीशा झाल्या व चेहरा एखाद्या मुखवट्यासारखा दिसू लागला. सर्व कातडी कशी टणक बनली. त्याच्या वयाची माणसे चेहेऱ्यावरील सुरकुत्या नाहीशा करण्याच्या खटपटीत असतात. उलट ते मात्र चेहेऱ्यावर सुरकुत्या कशा दिसत नाहीत, या विवचनेत होते. शिवाय त्यांच्या छातीवरील, पोटावरील व काखांमधील सर्व केस गळून गेले. डोक्यावरील केस पाढरे होऊ लागले व टक्कलही झपाट्याने वाढू लागले.

त्याचे खांदे पुढे झुकू लागले व त्याना पोक आला. त्याच्या सर्व शारीरिक हालचालीमधील सुसूत्रता अजिबात बिघडून गेली. त्याचे हात व इतर अवयव भोवतालच्या वस्तूंवर नेहमी अदळू–अपटू लागले आणि बोटाची हालचाल तर फारच थंडावली. त्याना मूठही वळता येईना व बोटे सरळही करता येईनात. हातातून व पायातून तीव्र पेटके येऊ लागले या सर्वांचा त्याच्या दैनंदिन जीवनावर कोणता परिणाम होऊ लागला होता त्याची आपल्याला सहज कल्पना करता येण्यासारखी आहे. तोंड धुणे, दाढी करणे, दात घासणे, आपल्या अंगावरील कपड्याची बटणे लावणे व कोणतीही भांडी वगैरे वापरणे इत्यादी क्रिया त्याना करता येणे अशक्य झाले.

साहजिकच आपली प्रकृती आणखी एखाद्या तज्ज्ञ डॉक्टराकडून तपासून घ्यावी असे त्याना वाटू लागले. म्हणून त्यानी आणखी काही तज्ज्ञ डॉक्टराकडून आपली प्रकृती पुन्हा तपासून घेतली. परतु त्यांच्या या सर्व प्रयत्नातून असा निष्कर्ष निघाला की, त्याच्या प्रकृतीवर कोणताही इलाज करता येण्यासारखा नव्हता व त्याचे मरण अटळ होते.

## संजीवनी विद्येच्या शोधात

आपल्याला झालेला रोग उत्तरोत्तर अधिकच उग्र स्वरूप धारण करीत आहे हे समजून चुकल्यावर प्रा. जॉन्सन यानी प्राप्त परिस्थितीशी जुळवून घेऊन, जीवनात जेवढा आनद उपभोगता येईल तेवढा उपभोगण्याचे ठरविले. सुदैव असे की, यापूर्वीच त्याना एका संजीवनी विद्येचा शोध लागला होता. आणि या विद्येची बैठक त्याच्या मूळच्या विचारसरणीशी मिळती–जुळती होती. त्यामुळे योग्य वेळीच गवसलेल्या या संजीवनी विद्येचा स्वीकार करून, त्या विद्येनुसार जीवन जगण्याची सवय स्वतःला लावून घेणे त्याना अवघड गेले नाही. याचा परिणाम असा झाला की, त्यांनी आपल्या व्यावसायिक क्षेत्रात व वैयक्तिक आयुष्यात जो चमत्कार करून दाखविला, त्यामुळे त्याचे डॉक्टरही आश्चर्यचकित झाले.

प्रा. जॉन्सन याना गवसलेली संजीवनी विद्या म्हणजे न्यूयॉर्क शहरातील डॉ. अल्बर्ट एलिस यानी वृद्धिंगत केलेली विवेकनिष्ठ मानसोपचारपद्धती. ही पद्धती म्हणजे विवेकनिष्ठ जीवन–दृष्टिकोनावर भर देणाऱ्या प्राचीन स्टोइक तत्त्वज्ञानाची एक सुधारीत आवृत्ती आहे असे म्हणता येईल. किंबहुना या मानसोपचारपद्धतीची बैठक एपिक्टेटस या सुविख्यात स्टोइक तत्त्ववेत्याच्या विचारसरणीवर आधारलेली आहे. एपिक्टेटस म्हणतो की, माणूस त्याच्या जीवनात घडणाऱ्या घटनामुळे प्रक्षुब्ध होत नसतो, तो त्या घटनाकडे ज्या दृष्टिकोनातून पाहतो, त्यामुळे प्रक्षुब्ध होतो.

गेल्या सुमारे तीस वर्षात डॉ. एलिस यानी एपिक्टेटसच्या वरील सूत्राच्या आधारे व आधुनिक मानसशास्त्रातील सशोधनाच्या आधारे आपली विवेकनिष्ठ मानसोपचारपद्धती वृद्धिंगत केलेली आहे. येथे त्या पद्धतीचा विस्तृत आढावा घेण्याचे कारण नाही. तथापि प्रा. जॉन्सन यानी आपल्याला झालेल्या दुर्धर व्याधीशी हसतमुखाने सामना करिताना, प्रामुख्याने विवेकनिष्ठ मानसोपचार पद्धतीचा उपयोग केला होता. म्हणून त्या पद्धतीचे फक्त काही मूलभूत सिद्धात थोडक्यात समजावून घेणे समर्पक ठरेल.

विवेकनिष्ठ मानसोपचार पद्धतीचा पहिला सिद्धांत असा की, सामान्यतः माणसाच्या भावना तो सतत स्वतःशी जी वाक्ये कळत नकळत बोलत असतो त्यातून जन्माला येतात व फोफावतात आणि माणूस स्वतःशी सतत कोणती वाक्ये बोलतो, हे त्याच्या मनात खोल रुजलेल्या दृष्टिकोनांवर अथवा त्याच्या जीवन-तत्त्वज्ञानावर अवलबून असते. त्याच्या मनातील स्वतःकडे, इतराकडे व सभोवतालच्या परिस्थितीकडे पाहण्याचे दृष्टिकोन जर अविवेकी व अवास्तव असतील, तर तो त्या दृष्टिकोनानुसार स्वतःला सतत अविवेकी व अवास्तव वाक्ये सागून आपल्या मनात चिंता, क्रोध, न्यूनत्वाची भावना, मत्सर, विषण्णता व अपराधी भावना यांची वादळे निर्माण करतो. साहजिकच या अनिष्ट भावनाच्या वावटळीत सापडल्यामुळे त्याला आपल्या सभोवतालच्या जगाशी मिळते जुळते घेऊन आपले आयुष्य आनंदाने व सर्जनशीलपणे व्यतीत करणे कठीण होऊन बसते.

यावर उपाय काय ? विवेकनिष्ठ मानसोपचारपद्धतीच्या तत्राचा पहिला टप्पा म्हणजे माणसाला तो स्वत.शी बोलत असलेल्या वाक्याची व विचाराची जाणीव करून देणे. दुसरा टप्पा म्हणजे त्याला आपल्या मनातील विचारामध्ये अध्याहृत असलेल्या अविवेकी व अवास्तव दृष्टिकोनांची किंवा जीवनतत्त्वज्ञानाची तर्कशुद्ध व वैज्ञानिक पद्धतीने छाननी करावयास शिकविणे. तिसरा टप्पा म्हणजे त्याला अनेक बुद्धिनिष्ठ व सक्रिय उपायानी आपल्या मनातील अविवेकी व अवास्तव दृष्टिकोन उखडून टाकण्यास प्रवृत्त करणे. अशा प्रकारे त्याने आपल्या मनातील अविवेकी व अवास्तव दृष्टिकोनाचा किंवा जीवनतत्त्वज्ञानाचा नायनाट केला की, त्याच्या मनातील अनिष्ट भावनांची वादळे शात होतात व मग तो आपल्यासमोरील समस्येशी अधिक सुज्ञपणे मुकाबला करून आपले जीवन अधिक आनंदी करण्यास मोकळा होतो.

प्रा. जॉन्सन यांना जेव्हा एकदा नक्की कळले की, आपल्याला स्क्लेरोडर्मा हाच असाध्य रोग झालेला आहे व तो बळावतही चालला आहे, तेव्हा त्यानी प्रथम आपल्या स्वगत बोलण्यावर नियंत्रण ठेवण्यास सुरुवात केली. या दृष्टीने त्यांनी टाकलेले पहिले पाऊल म्हणजे आपल्या स्वगत बोलण्यातील ‘ भयंकरीकरण ’ थांबविले.

आजकाल राष्ट्रीयीकरण हा शब्द बहुतेक सुशिक्षिताना परिचित झाला आहे; परतु ‘ भयंकरीकरण ’ हा काय प्रकार आहे ? ‘ भयंकरीकरण ’ या शब्दाचा अर्थ असा की, ज्या माणसाच्या मनात अविवेकी व अवास्तव जीवनतत्त्वज्ञान दृढमूल झालेले असते असा माणूस आपल्या जीवनात कोणतीही अप्रिय घटना की, ती घटना ‘ भयकर ’ आहे, असे स्वतःला सागू लागतो. साहजिकच त्याच्या मनात चिंता, शत्रुत्व, विषण्णता, न्यूनत्वाची भावना, अपराधी असल्याची भावना याची वादळे उद्भवण्यास वेळ लागत नाही. म्हणून प्रा. जॉन्सन यानी प्रथम स्वतःला असे सागावयास सुरुवात केली की, त्यांच्यापुढील परिस्थिती दुर्दैवी होती; परंतु ती काही ‘ भयकर ’ नव्हती आणि त्याही परिस्थितीतून काहीतरी मार्ग काढण्यासारखा होता. अशा रीतीने त्यानी आपल्या मनात ‘ भयंकरीकरण ’ करण्याचे तर निक्षून थाबविलेच पण इतरांशी बोलतानाही त्यानी उगीच विमनस्क व शोकाकूल होऊन कधी आपल्या तक्रारीचा पाढा वाचला नाही.

एकदा त्यांच्या देखत एक बारा वर्षांचा मुलगा पडला व त्याच्या गुढघ्याला बरीच दुखापत झाली. त्यावेळी आसपास सर्व स्त्रियाच होत्या व ते एकटेच तेवढे पुरुष होते. त्या स्त्रियांना प्रा. जॉन्सन यांना झालेल्या रोगाची कल्पना नव्हती. प्रा. जॉन्सन यांना चालणेसुद्धा इतके यातनामय झालेले होते की, त्यांना त्या मुलाला उचलून नेणे अशक्यच होते; परंतु त्याही प्रसंगी, ‘ बापरे ! या मुलासंबंधी मी काहीच करू शकत नाही. या स्त्रिया मला निर्दय व शिष्टाचार नसलेला माणूस समजतील... हे किती भयंकर आहे ! ’ असे स्वतःला न सागता, त्यानी फक्त नजीकच्या टॅक्सीचे दार चटकन उघडले व ज्या स्त्रिया त्या मुलाला उचलून टॅक्सीत ठेवण्याच्या प्रयत्नात होत्या

**प्रा. जोन्सन यांनी प्रथम स्वगत बोलण्यावर नियंत्रण ठेवलं**

त्यांना जमेल तेवढी मदत केली.

दैनंदिन जीवनात त्याच्यावर असे अनेक प्रसग येत असत ते काही किरकोळ खरेदी करण्यासाठी कसेबसे आपल्या घराजवळच्या दुकानात गेले तर, विकत घेतलेल्या वस्तूचे पैसे खिशातून काढून दुकानदाराला देणे, या क्रियेलाही त्याना बराच वेळ लागत असे अशा वेळी 'बापरे! रांगेत माझ्यामागे उभे असलेले लोक माझ्यावर सतापतील व ते मला एक पीडा समजतील, तर किती भयंकर प्रसग ओढवेल,' असे स्वतःला न सांगता, ते स्वतःशी म्हणत असत, 'पैसे देण्यास मला लागला थोडा जास्त वेळ तर लागला; त्यामुळे कोणी मरत नाही

थोडयाच दिवसांत त्याच्या असे लक्षात आले की, त्यांनी एखाद्या सभाव्य घटनेबद्दल आपले स्वगत बोलणे नियंत्रित करण्याचा सराव केल्यावर त्याना त्या सरावाचा इतरही अनेक घटनाना सामोरे जाताना उपयोग होत असे.

## काहीच 'भयंकर' नाही

प्रा. जॉन्सन यानी आपल्या स्वगत बोलण्यावर नियंत्रण ठेवण्याचा सराव केल्यामुळे त्याच्या मनात अनिष्ट भावनांची वादळे निर्माण होणे हळूहळू बद झाले व त्यामुळे ते प्राप्त परिस्थितीशी अधिक हुशारीने जमवून घेऊ लागले. उदाहरणार्थ, त्यांच्या झोपेचे खोबरे झाले होते तरी ती परिस्थिती 'भयकर' आहे असे स्वतःला सागून उद्विग्न होण्याऐवजी, झोप येत नसे तेव्हा ते शातपणे लेखन व वाचन करू लागले.

आपल्या रोगावर उपाय म्हणून ते मुख्यत: दोन गोष्टी करीत असत पहिली गोष्ट म्हणजे व्यायाम व दुसरी गोष्ट म्हणजे काही विशिष्ट खनिज तेल वापरून आपल्या शरीराला मालीश करणे किंवा करवून घेणे या दोन्ही क्रिया करताना त्याना मरणप्राय वेदना होत असत; परतु त्या वेदना 'भयंकर' आहेत, असे स्वत: न सांगता त्यांनी त्या क्रिया चालू ठेवल्या. इतकेच नव्हे तर त्यानी व्यायाम व मालीश करण्याच्या अनेक अभिनव पद्धती शोधून काढल्या. त्या पद्धतीचा ऊहापोह त्यांनी आपल्या पुस्तकात विस्ताराने केला आहे

प्रा. जॉन्सन यानी स्वीकारलेली सजीवनी विद्या धार्मिक किंवा अध्यात्मिक पायावर आधारलेली नाही. उलट त्या विद्येची उभारणी, इहवादी व सुखवादी तत्त्वज्ञानावर केलेली आहे. त्या तत्वज्ञानाचा भर माणसाला या जगात जितका आनद मिळविता येईल तितका मिळविण्यास मदत करण्यावर आहे. माणसाच्या जीवनाला विश्वाच्या पसाऱ्यात काही खास अर्थ आहे. असे मानावयास पुरावा नाही. माणसाच्या जीवनाविषयी विश्वाला काडीमात्र सोयरसुतक नसते. म्हणून त्याने या जीवनात जमेल तेवढा आनद उपभोगावा व इतराना ही आनद उपभोगण्यास मदत करावी; त्याप्रमाणे त्याने आपले व इतराचे दु.ख जमेल तेवढे कमी करण्याचा प्रयत्न करावा, ह्याच सुज्ञपणा होय.

प्रा. जॉन्सन यानी वरील तत्वज्ञानाचा सक्रियपणे स्वीकार केला होता. त्यांना डॉक्टरांनी मद्यपान करण्यास मनाई केलेली नव्हती आणि बियर घेणे तर त्याना फारच आवडत असे. त्यामुळे मद्यपानाचा आनंद उपभोगण्यात त्यांनी कधी कुचराई केली नाही. अर्थात याचा अर्थ असा नाही की, त्यांनी नशाबाजीत वेळ घालविण्यास सुरुवात केली. उलट त्यांचा रोग अधिक गंभीर स्वरुप धारण करू लागला तरी त्यानी आपले शिकविण्याचे, सशोधनाचे व ग्रंथलेखनाचे काम जिद्दीने चालू ठेवले. किंबहुना या काळात त्यानी आपल्या पूर्वी प्रसिद्ध झालेल्या ग्रथापैकी दोन ग्रथाच्या सुधारित आवृत्त्या प्रसिद्ध केल्या व एक नवा ग्रथही लिहिला आणि ते ज्या बालविकास केंद्रात सचालक म्हणून काम करीत असत त्या केंद्रातील आपले कामही त्यानी बद केले नाही शरीरातील सर्व अवयवांना वेदनाचा ठणका लागलेला असतानाही आपल्याला झालेल्या दुर्धर व्याधीबद्दल 'भयंकरीकरण' न करता, ते हसत हसत म्हणत असत, 'चालायचेच. प्रत्येक माणसाच्या आयुष्यात असे कमीजास्त सोनखत पडायचेच!'

आपल्यापुढील अंधकारमय परिस्थितीला तोंड देताना आपल्याला आपल्या कुटुंबियाचे प्रेम व सहकार्य किती मोलाचे ठरत होते, याची प्रा जॉन्सन यानी आपल्या पुस्तकात कृतज्ञतापूर्वक नोद केली आहे. विशेषत त्यांना त्याच्या पत्नीची, म्हणजे श्रीमती ज्युली जॉन्सन याची, जी साथ मिळत होती ती केवळ अद्वितीय होती. श्रीमती जॉन्सन यानीही, विवेकनिष्ठ मानसोपचारपद्धतीत अनुस्यूत असलेल्या जीवनतत्त्वज्ञानाचा स्वीकार केलेला असल्यामुळे त्या आपल्या पतीच्या प्रयत्नांना अनेक प्रकारे सहाय्य करण्यास तयार असत तरी, त्यानी सदैव लाब चेहरा करून घराचे स्मशान करून टाकले नव्हते.

प्रा जॉन्सन याच्या शारीरिक दुर्बलतेमुळे त्याच्या कामजीवनावरही साहजिकच परिणाम झाला होता आपल्या दुर्बलतेमुळे आपल्या पत्नीची अकारण कुचबणा होऊ नये म्हणून त्यांनी तिला आपली कामवासना विवाहबाह्य सबध ठेवून पूर्ण करण्याची मुभा दिली; परंतु त्यावेळी श्रीमती जॉन्सन म्हणाल्या, 'सध्या म्हणाल तर मी कामाच्या रगाड्यात इतकी बुडून गेले आहे की, मला दुसऱ्या कशाचा व कोणाचा विचार करण्यासही वेळ नाही आणि अगदी कामवासनेच्या तृप्तीचाच प्रश्न उद्भवला तर मी केव्हाही हस्तमैथुन करू शकतेच, पुढचे पुढे पाहू.'

सुदैवाने प्रा. जॉन्सन याच्या अविश्रात प्रयत्नांमुळे त्यांच्या प्रकृतीत थोडी सुधारणा झाली. तथापि त्याचे शरीर दुर्बळ झाले होते, इतकेच नव्हे त्याची उंचीसुद्धा थोडी कमी झाली होती. त्याचे जननेंद्रिय ताठ झाले तरी ते जमिनीकडे वाकलेले रहात असे आणि सभोग करताना पुरुषाने स्त्रिच्या शरीरावर रहाण्याची पारपारिक पद्धत तर त्यांच्या बाबतीत अशक्य झालेली होती. एकूण कामक्रीडेमध्ये त्याच्या पत्नीलाच पुढाकार घेऊन महत्त्वाचा व जास्त क्रियाशील वाटा उचलावा लागत असे.

वरील प्रकारच्या अडचणीच 'भयंकरीकरण' न करता प्रा. जॉन्सन यानी मालीश व व्यायाम या उपायानी आपल्या शरीराकडून त्याही परिस्थितीत जमेल तेवढे काम करवून घेण्यात बरेच यश मिळविले. अर्थात त्याच्या या प्रयत्नाना त्याच्या पत्नीकडूनही उत्तम प्रतिसाद मिळत होता. तिनेही आपल्यापुढील विचित्र समस्येचे 'भयंकरीकरण' न करता त्या समस्येमुळे निर्माण झालेल्या अडचणीवर जमेल तेवढी मात केली.

येथे प्रा. जॉन्सन एका महत्त्वाच्या मुद्द्याचा आवर्जून उल्लेख करतात. तो म्हणजे त्यानी व त्यांच्या पत्नीने आपल्या कामप्रेरणेच्या

पूर्तीसाठी ज्या अभिनव पद्धती शोधून काढल्या त्या कामी त्याना त्याच्या डॉक्टराची काहीही मदत झाली नाही. किंबहुना कोणत्याही डॉक्टरांनी त्याना त्याच्या व त्याच्या पत्नीच्या कामजीवनासंबंधी कोणताही प्रश्न विचारला नाही. मग त्याविषयी मार्गदर्शन करणे तर दूरच राहो! त्याचप्रमाणे प्रा. जॉन्सन यांना स्क्लेरोडर्मा या रोगासबंधी उपलब्ध असलेल्या वैद्यकीय साहित्यात रोग्याच्या कामजीवनासबंधी कोणतीही आस्था आढळून आली नाही.

प्रा जॉन्सन याना नंतर असे आढळून आले की, वैद्यकीय जगातही त्याच्यासारख्या रुग्णाच्या कामजीवनासबंधी फारशी वस्तुनिष्ठ चर्चा होत नसते. त्यामुळे रोग्याला याविषयी डॉक्टरांकडून मार्गदर्शन मिळणे दुरापास्त असते. परिणामी याविषयी रोग्याने स्वतःच प्रयत्न व प्रयोग करून स्वत ला मार्गदर्शन केले पाहिजे.

### आत्मकथेचं प्रयोजन

आपल्यावर गुदरलेल्या आपत्तीशी सातत्याने सामना करून प्रा. जॉन्सन यानी आपल्या प्रकृतीत घडवून आणलेली सुधारणा पाहून दोन तज्ज्ञ डॉक्टर आश्चर्याने थक्क झाले. त्यांना प्रा. जॉन्सन याच्या प्रकृतीतील सुधारणा म्हणजे एक चमत्कार वाटला. प्रा. जॉन्सन मात्र मनोमनी ओळखून होते की, आपल्या प्रकृतीतील सुधारणा म्हणजे मळवावरचे पाणी होते. कारण त्याच्या शरीरात ठाण माडून बसलेला रोगच मुळी असा होता की, तो केव्हा कोणते स्वरूप धारण करील याचा नेम नव्हता

साहजिकच आपण स्क्लेरोडर्मा या दुर्धर रोगाशी कसा मुकाबला केला यासंबधी त्यानी लिहिलेल्या पुस्तकाचा उद्देश आपली यशोगाथा कथन करणे हा नाही. कारण त्याच्या प्रकृतीतील सुधारणा ही किती झाले तरी तकलुपी होती. त्याचप्रमाणे आपण कसे धैर्याचे मेरूमणी आहोत, याची दवडी पिटणे, हाही त्याच्या आत्मकथा लिहिण्यामागचा उद्देश नाही. तथापि त्याच्यावर कोसळलेल्या आपत्तीची वार्ता ऐकून कित्येक व्याधिग्रस्त लोक त्याना आवर्जून भेटावयास येऊन त्याच्याशी आपल्या समस्याविषयी चर्चा करीत असत. अशा व्याधिग्रस्त लोकाच्या मनात, प्रा. जॉन्सन याच्याशी बातचीत केल्यामुळे आपल्या जीवनातील समस्या हाताळण्याच्या कामी नव्या आशा व नव्या कल्पना पल्लवित होत असत. ही गोष्ट विचारात घेऊन प्रा. जॉन्सन यानी आपली मुलखावेगळी कहाणी पुस्तक रूपाने प्रसिद्ध केली. त्याच्या या खटाटोपाचा मुख्य उद्देश असा की, कोणत्याही असाह्य व्याधीने पिडलेल्या रुग्णाना विवेकनिष्ठ जीवनतत्त्वज्ञानाचा स्वीकार करून आपले जीवन आहे त्या परिस्थितीत सुसह्य, सुखी व सर्जनशीलपणे जगण्यास उत्तेजन मिळावे.

वरील हेतू मनात ठेवून त्यानी आपल्या पुस्तकात दोन खास प्रकरणाचा समावेश केलेला आहे. त्यापैकी एक प्रकरण श्री. डाउग नावाच्या त्याच्या तरुण मुलाने लिहिलेले आहे. आपल्या वडिलाच्या असहाय्य परिस्थितीकडे पाहून आपल्याला आपल्या अस्तित्वाविषयी व जीवनाच्या क्षणभगुरत्वाविषयी विचार करण्यास कशी चालना मिळाली, याचे श्री. डाउग यानी केलेले वर्णन इतके हृदयस्पर्शी आहे की, ते वाचकाच्या मनाला चटका लावून जाते.

प्रा. जॉन्सन याच्या पुस्तकातील दुसरे खास प्रकरण त्यांच्या पत्नीने म्हणजे श्रीमती ज्युली यानी लिहिलेले आहे. पतीच्या पंगुत्वामुळे श्रीमती जॉन्सन याना अनेक प्रश्नांना तोंड द्यावे लागत असे. त्यापैकी एक म्हणजे त्यांच्या परिसरातील माणसांच्या प्रतिक्रिया डाके थंड ठेवून पचविणे व त्या माणसाशी जुळवून घेणे. उदाहरणार्थ प्रा जॉन्सन याना झालेला चमत्कारिक रोग म्हणजे त्यानी लहान वयात केलेल्या हस्तमैथुनाचा परिणाम होता, याविषयी त्याच्या परिचयातील काही लोकाच्यात अगदी एकवाक्यता होती; परंतु त्याही लोकाकडून प्रा. जॉन्सन याना त्याच्या लढ्यात सर्वतोपरीने प्रोत्साहन व सहकार्य मिळत होते, ही गोष्ट श्रीमती ज्युली यानी नमूद करून ठेवली आहे. यावरून सर्व तऱ्हेच्या व्यक्तीशी वागताना श्रीमती ज्युली किती समतोलपणे व सौजन्याने वागत असल्या पाहिजेत, याची वाचकाना सहज कल्पना करता येते.

प्रा जॉन्सन याच्या पुस्तकात उपसहार म्हणून एक प्रकरण खुद्द डॉ. अल्बर्ट एलिस यांनी लिहिले आहे प्रा जॉन्सन यांनी आपल्यावर कोसळलेल्या सकटाशी ज्या धैर्याने व कल्पकतेने झुंज घेतली तिची डॉ. अल्बर्ट एलिस यानी मुक्तकंठाने प्रशसा केली आहे. प्रा. जॉन्सन असहाय्य रोगाने शारीरिकदृष्टया पंगू झाले होते तरी त्यानी आपले मन पगू न होण्यासाठी ईश्वराच्या कृपाळूपणावर भिस्त न ठेवता, विवेकनिष्ठ जीवनतत्त्वज्ञानाचा अवलब केल्याबद्दल डॉ. अल्बर्ट एलिस यानी त्याची विशेष तारीफ केली आहे. तसेच आपल्या दुर्धर आधी–व्याधींशी झुझताना, विवेकनिष्ठ मानसोपचारपद्धतीचा अवलब करणारे प्रा. जॉन्सन हे काही पहिले व एकमेव गृहस्थ नव्हते, याही बाबीकडे डॉ. अल्बर्ट एलिस यानी वाचकाचे लक्ष वेधून घेतले आहे. किंबहुना ज्यानी ज्यानी विवेकनिष्ठ जीवनतत्त्वज्ञानाचा उपयोग करून आपल्या आधि–व्याधीवर मात करण्याचा प्रयत्न केलेला आहे, त्याना आपले अनुभव शब्दबद्ध करण्यास डॉ. अल्बर्ट एलिस नेहमी उत्तेजन देत असतात. अशा अनेक व्यक्तीनी शब्दबद्ध केलेले अनुभव दि इन्स्टिटयूट फॉर रॅशनल–इमोटिव्ह थेरपी, या न्यूयॉर्क शहरातील सस्थेमार्फत प्रसिद्ध होणाऱ्या एका षण्मासिकात प्रसिद्धही झालेले आहेत.

मी स्वतः सन १९६८ पासून डॉ. अल्बर्ट एलिस याच्याशी पत्रव्यवहार करीत आहे आणि प्रा. जॉन्सन याचे स्फूर्तिदायक पुस्तक आपल्याकडे उपलब्ध नसल्यामुळे मी ते पुस्तक वरील सस्थेकडून मुद्दाम मागवून घेतले होते. सन १९८१ मध्ये प्रसिद्ध झालेले ते पुस्तक वाचून, प्रा जॉन्सन याच्या असामान्य कर्तृत्वाने मी प्रभावित झालो होतो; परंतु प्रा. जॉन्सन याच्या सन १९८१ नंतरच्या जीवनक्रमाविषयी मला काहीच माहिती नव्हती त्यामुळे वर उल्लेख केलेल्या षण्मासिकाचा सन १९८२ मधील दुसरा अक माझ्या हातात आल्यावर, त्यामध्ये मी जेव्हा प्रा. जॉन्सन यानी रचलेली एक सुदर कविता वाचली, तेव्हा मला अतिशय आनद झाला वाटले की, प्रा. जॉन्सन अजूनही आपल्या असाध्य रोगाशी मुकाबला करीत करीत आपले आयुष्य आनंदाने व सर्जनशीलपणे जगत असावेत.

परतु माझा तो आनंद फारच थोडा वेळ टिकला. कारण ज्या पृष्ठावर प्रा. जॉन्सन यांची कविता छापलेली होती, त्याच पृष्ठावर एक छोटी तळटीप दिलेली होती. त्या तळटीपेत लिहिले होते की, सन १९८२ च्या वसतऋतूत प्रा. जॉन्सन याच्यावर एक शस्त्रक्रिया करण्यात येणार होती. त्या शस्त्रक्रियेच्या अगोदर त्यानी वरील कविता केली होती. दुर्दैवाने त्या शस्त्रक्रियेत त्याचा हृदयद्रावक अत झाला. ती बातमी वाचून माझे मन सुन्न झाले. तथापि आपले शरीर खगत जात होते तरी अखेरच्या क्षणापर्यंत जीवनातील सौंदर्याचा व आनंदाचा आस्वाद घेण्याची उमेद शाबूत ठेवणाऱ्या प्रा. जॉन्सन याच्या महतप्रयासाचे स्मरण होऊन, मी परत एकदा स्वत शी म्हणालो, 'तेथे कर माझे जुळती !'

—कि. मो. फडके

## पुस्तके

# घटस्फोट का होतात ?

**स्त्री**मुक्ती बायकांना भांडायला शिकवते, कुटुंबामधून वेगळं पाडते किंवा घरं मोडते हा आरोप तसा जुनाच आहे. त्यामुळे 'स्वतःला शोधताना' या पुस्तकात काही घटस्फोटाच्या कथा आहेत असं म्हटल्यावर त्या स्त्रीमुक्तीवाल्या, आग्रही, तर्ककर्कश स्त्रियांच्या कथा असाव्यात असा ग्रह कोणीही करून घेणं शक्य आहे. गंमत अशी की या पुस्तकामध्ये घटस्फोटाच्या ज्या तेरा कथा किंवा घटना विशद केलेल्या आहेत त्यापैकी एकही स्त्री रूढ अर्थाने स्त्रीमुक्तीवादी स्त्री नाही. लग्नापूर्वी आत्मसन्मानाच्या जाणिवेचं पोषण झालेली, लग्नापूर्वी लग्न या संस्थेकडे संशयाने किंवा साक्षेपाने बघणारी किंवा करियरिस्ट व त्यापायी कुटुंबाकडे दुय्यम लक्ष देणारी अशी नाही. उलट या स्त्रियांमध्ये लग्न करताना लग्नाविषयीच्या खूपच पारंपरिक त्याग–समर्पणादी कल्पना तरी आहेत किंवा आंधळेपणा, अज्ञान तरी आहे. चाळीस वर्षांपूर्वी घटस्फोट घेतलेल्या एखाद्या विमलताईंचा अपवाद सोडला तर या पुस्तकातल्या इतर घटस्फोटिता साधारणपणे समकालीन, शहरी, आर्थिक सुस्थितीतल्या किंवा पुढे गरज पडल्यावर आर्थिक स्वातंत्र्य मिळवू शकलेल्या अशा आहेत. लग्नानंतर एक वर्षापासून पंधरा वर्षांपर्यंत कमी अधिक कालावधीत त्यांनी नवऱ्यापासून वेगळं होण्याचा निर्णय घेतला आहे. त्या निर्णयापर्यंत त्यांना नेणारी परिस्थिती आणि निर्णयानंतर त्यांच्या वाट्याला आलेले जीवन यांच्या अभ्यासकथा म्हणजे 'स्वतःला शोधताना' हे पुस्तक.

'मैत्रिणी' हे स्त्रियांचे व्यासपीठ १९८२ पासून मुंबईमध्ये कार्यरत आहे. घटस्फोटित स्त्रियांच्या मुलाखतींचा एक कार्यक्रम घेताना या विषयामध्ये अधिक खोलात जाऊन अभ्यास व विचार करण्याची गरज या मैत्रिणींना जाणवली. विवाहभंग हा संबंधित व्यक्तींना आणि समाजाला फारसा स्वागतार्ह व सुखावह वाटत नाही हे तर उघडच होतं; पण त्यापैकी पतीला किंवा पत्नीला एकट्याला दोष देऊन किंवा स्त्रीच्या नवजागृततेवर खापर फोडून मोकळं होणं हे सोपं असलं तरी ती अभ्यासाची दिशा नव्हती. यादृष्टीने विवाहभंगाचा पंचनामा करण्यापेक्षा दुभंगणाऱ्या वैवाहिक जीवनाचा अभ्यास करणे, कुटुंबसंस्थेतील ताणतणावांचा शोध घेणे व त्यात पुरुषाचे मन आणि स्त्रीची भूमिका कशी महत्त्वाची ठरली हे बघणं अशी उद्दिष्टे ठेवण्यात आली. स्वतःहून घटस्फोटाचा निर्णय घेणाऱ्या स्त्रिया निवडल्या गेल्या. हेतू हा की जे विवाहबंधन, सुरक्षिततेसाठी, स्थैर्यासाठी आणि अपत्यासाठी स्त्री स्वतःहून पत्करते ते तिलाच टाकावेसे का वाटते हे बघणे अर्थपूर्ण आहे. या घटस्फोटितांना बोलके करण्यात आले. हिंदुस्थानातल्या अल्पसंख्याक गटांचे प्रतिनिधित्व व्हावे म्हणून ख्रिश्चन व मुस्लीम समाजातील एकेक स्त्री निवडली गेली. अशा प्रकारे अभ्यास विषय घटस्फोटित स्त्रीभोवती घोटाळत असला तरी तिचा पती, तिचे आई वडील आणि निटकचे आप्तेष्ट यांना भेटून शक्य तितक्या अलिप्तपणे, पूर्वग्रह सोडून परिस्थिती समजावून घेण्याचा प्रयत्न झाला. याबाबतीत पतीची मनोवृत्ती किंवा मानसिक आंदोलन समजून घेण्यात अडचणी आल्या, फारसे यश आले नाही असे प्रस्तावनेत म्हटले आहे. त्यासाठी मैत्रिणींनी काही पुरुष प्रतिनिधी पाठवून समजून घेण्याचा प्रयत्न केला होता काय ? त्यामुळे हेतुतः नव्हे, पण नाइलाजाने ही चित्रणे एकारलेली असण्याची शक्यता नाकारता येत नाही. अर्थात काढलेले निष्कर्ष फार टोकाचे, सामान्यीकरणाचे किंवा आग्रहाचे नसल्यामुळे त्याने पुस्तकाच्या परिणामावर बाध येत नाही.

अगदी उघड कारणामुळे–जसे वेड, आपस्मार–लैंगिक दोष–इत्यादींमुळे घटस्फोट झाल्याच्या कहाण्या यात फारश्या नाहीत. उलट वरवर बघता अनुरूप वाटलेल्या, ठरवून केलेल्या विवाहांची परिणती अखेर विसंवादातून घटस्फोटापर्यंत कशी झाली हेच दाखवून दिलेले आहे. विकास काळे, मेधासारख्या कोवळ्या मुलीला मागणी घालून चक्क फसवतो. तिच्यावर एका मुलीची जबाबदारी लादून तिला शारीर व मानसिक छळ सोसायला लावतो. फातिमा ही बाजार चित्रपटापल्यासारख्या मुस्लीम कुटुंबातील स्त्री घरच्यांचा दबाव असह्य होऊन आईवडिलांची नाती निराशाजनक वाटून अखेरीस स्वतःहून वीस वर्षांनी मोठ्या पुरुषाला माळ घालते. विवाहांतर्गत बलात्काराला बळी जाते. मध्यमवर्गीय, ब्राह्मण कुटुंबातील पण संसारापलीकडचे काही कार्यक्षेत्र खुणावत असणारी अरुणा, रमेश चितळेचा मध्यमवर्गीयपणा (मीडिऑक्रसी / सामान्यपणा) सहन करू शकत नाही. तर 'नीला म्हणते' मधील नीला, जयंतच्या भावनिक पिळवणुकीने कंटाळून पण अत्यंत त्रास सोसून अखेरीस घटस्फोटापर्यंत जाते. 'वाटा बदलताना, मधील विद्या आणि आनंद तर समाजकार्य हेच स्वतःचं क्षेत्र मानून लग्नाबाबत विचार करतात. तरीही सहजीवनाच्या सुरुवातीलाच आपल्या वाटा वेगळ्या असल्याचे त्यांच्या लक्षात येते. मात्र घटस्फोटानंतर हे लग्नाचे बंधन दूर झाल्यामुळे ते दोघे मित्र म्हणून अधिक सहजपणे एकमेकांना सामोरे जाऊ शकतात. 'तिची गोष्ट' मधल्या 'ती' चा मधुचंद्र तिच्या योनिमार्गाचा पडदा फार घट्ट असल्याने समाधानकारक होऊ शकत नाही. यात तिचा दोष नसला तरी नवऱ्याला आयुष्यभर उगाळायला ती गोष्ट सापडते ! आणि स्वतःचा ईगो, स्वतःचं सुख, स्वतःची प्रतिष्ठा गोंजारणारा तो माणूस अखेरीस घटस्फोटाचा आश्रय घेतो. जानकी 'सरळ मनाची' असते. तरीही प्रौढ, जाणत्या वयात लग्न केलेल्या लेलेचा सहवास तिला असह्य होतो. क्रूरता आणि अतिमद्यपान या कारणांसाठी ती घटस्फोट मिळवते. अशी प्रत्येकीची वेगवेगळी चित्तरकथा ! मानवी संबंधांचे अनंत धागे उकलणारी. आंधळ्या चाकोऱ्या चालणाऱ्यांना हे सगळे मुळातूनच वाचायला हवे.

### एकजिनसीपणा नाही

हे पुस्तक वाचल्यानंतर संवेदनाक्षम माणसाला लग्नसंस्थेविषयी निश्चितच विचार करावासा वाटेल. पतिपत्नीसंबंध हा तिचा

पाया. बाकी नातेवाईक, कुटुंब, सासरचा छळ किंवा माहेरची उपेक्षा या गोष्टी व्यवहारात किंवा कथाकादबऱ्यामध्ये महत्त्वाच्या वाटत असल्या तरी या सर्व घटस्फोटामध्ये या घटकाचे स्थान तसे दुय्यमच आहे पतिपत्नीसंबंध पुरेसा जिव्हाळ्याचा, आश्वासक, परस्परपूरक असेल तर इतर घटकामधला विसवाद–ताण–संघर्ष पार करता येतात. अनेक स्त्रियानी इतिहासात व वर्तमानात तसे केलेले आहेत. त्यामुळे लग्ने ही पतिपत्नी सबंधावर उभी राहातात व त्याच्या अभावी कोलमडतात हे निश्चित दिसते दुसरी महत्त्वाची जाणीव म्हणजे पतीमधल्या कोणत्याही भावनिक, मानसिक, शारीर त्रुटीसाठी, विसवदासाठी पत्नीने स्वत हून अन्य पुरुष शोधल्याचा किंवा तशी एखादी संधी घेतल्याचा प्रकार या पुस्तकात तरी दिसत नाही. बहुधा समाजातही तो फारसा नसावा. पतिपत्नीसंबधात स्त्रीची एकतर्फी निष्ठा आपण एवढी गृहीत धरलेली असते की, पुरुषाचे या बाबतीतले गुन्हे आपण खपवून घेतो. तरीही पुरुष किरकोळ कारणाने सशय घेणे,आळ घेणे त्याबद्दल स्त्रीला मानसिक अगर प्रसंगी शारीरिक शिक्षा करणे असे प्रकार करताना दिसतात. पत्नीबद्दलचा हा मालकीहक्क आणि त्यापोटी येणारी असुरक्षितता ही पुरुषाच्या डोक्यामधून झटकून काढायला पाहिजे. तिसरा मुद्दा म्हणजे घटस्फोटाने फक्त स्त्रीचेच जीवन उध्वस्त होते असे नाही तर कित्येकदा महत्वाकाक्षी, आत्मलक्षी किंवा आत्मसन्मान जागृत झालेली स्त्री घटस्फोटाने तिच्या जीवनाच्या वाटेवरचा एक मोठा अडथळा दूर करून टाकते. उलट पुरुष मात्र तिच्यावर फारच ' अवलबून ' असेल किंवा लग्नानतर तिच्याखेरीज अन्य कशाची उभारणी करू शकला नसेल तर तोच घटस्फोटानंतर उध्वस्त होतो. जसा ' स्वयसिद्ध 'मधला ' सुभाष पंडित ' झालेला आहे. मीनाशी घटस्फोट घेतल्यानतर एका गरीबाघरच्या, जेमतेम मॅट्रिक मुलीशी तो लग्न करतो तेव्हा त्याचं जीवनमान, अनुभवविश्व हे पुन्हा सकुचित होऊ लागत. मीनाची किंमत मीना गेल्यावरच त्याला कळते. मेधामारखी मुलगी इतक्या लहान वयात लग्न–घटस्फोट या अनुभवातून जाते की, आता त्याच्या बाहेर पडल्यावर ती पुन्हा नॉर्मल जिणे जगू शकते. नीला कुलकर्णीचा नवरा घटस्फोट देतानाही आपलं औदार्य किंवा हौतात्म्य सोडायला तयार नसतो. बहुतेक घटस्फोटित पुरुष घटस्फोटानंतर अपमान, सूड, वैमनस्या या भावनाच्या बाहेर पडू शकत नाहीत. उलट माहेरच्याची भूमिका लग्नाआधी उतावीळपणाची आणि लग्नानतरची विचित्र तटस्थपणाची राहाते. जावई या नात्याने कोडकौतुक हाही नव्यानं विचार करण्याजोगा विषय असल्याचे येथे जाणवते.

हे पुस्तक लिहिण्याची प्रक्रियाही नेहमीपेक्षा थोडी वेगळी आहे. सामुदायिक पद्धतीची सकल्पना आणि लेखन हा प्रयोग यात केलेला आहे. त्यामुळे पुस्तकाला एकजिनसीपणा नाही सर्व कहाण्या सारख्याच तटस्थपणे लिहिल्या आहेत असे वाटत नाही. काही ठिकाणी निव्वळ निवेदन आहे, काही ठिकाणी त्या अतर्गत भाष्य आहे, तर काहीत सामान्यीकरणही केलेले आहे अर्थात पहिल्या प्रयोगापेक्षा यापुढे याबाबतीत अधिक एकसूत्रीपणा आणणे शक्य आहे. लेखनात कच्चेपणा येऊ न देता ही सूत्रे साभाळणे अवघड होते असे संपादकीयात म्हटले आहे. ही तारेवरची कसरत पुष्कळशी जमली आहे एवढे नक्की. शेवटी हे पुस्तक वाचकाला विचार करायला लावते. घटस्फोटामुळे घरे मोडतात हा प्रवाद जुना झाला; पण खरोखर घटस्फोटामुळे घरे मोडतात की मोडलेल्या घरातून घटस्फोट होतात ?

—मंगला गोडबोले

स्वतःला शोधताना
ग्रंथाली व स्त्री उवाच प्रकाशन
पृष्ठे १८८
मूल्य : ३० रुपये.

## स्त्रीत्वाची नवी प्रतिमा

' मानुषी ' या कादंबरीत प्रतिभा रानडे यानी एका सर्वसामान्य स्त्रीचा कर्तबगार, महत्त्वाकाक्षी स्त्रीत झालेल्या परिवर्तनाचा आलेख आखला आहे.

खूप जुन्या काळात जन्मलेली; पण विचारानं खूप पुढं गेलेली अशा तारेची ही कथा. वडलाच छत्र हरवून बसलेल्या तारेला तिच्या आईला आणि अक्काला मामाकडं आश्रित जीवन जगावं लागतंय. विधवा बाईला खड्यासारखं वगळलं जाण्याचा तो काळ. शिक्षण नाही म्हणून नोकरी नाही आणि उंबरठ्याबाहेर पडून धडाडीनं एकटीच्या बळावर काही करण्याचं मानसिक बळ नाही. अशा ताराच्या आईचे आणि पर्यायाने अक्का आणि तारेचे अपेक्षा–आकांक्षांचे अधिकार काढून घेतलेले आहेत. नेमकी हीच सामाजिक परिस्थिती आहे तशी स्वीकारायला, आणि त्याप्रमाणे वागायला ताराच्या मनाची तयारी नाही. अर्थात या सगळ्याला एकटीच्या बळावर तोंड देणं तिला जमत नाही आणि प्राप्त परिस्थितीपुढं मान तुकवावीच लागते. तशी ती तुकवतेही; पण मूळ स्वभाव काही बदलत नाही. त्यामुळच शंकररावासारख्या तिरसट, विक्षिप्त बिजवराबरोबर मनातल्या मनात घुसमटत, तणतणत संसार करणारी तारा त्यांच्या मृत्यूनंतर मात्र पुन्हा डिवचून उठते. तोपर्यंत नवऱ्याच्या कलानं आयुष्य जगणारी तारा यापुढच आयुष्य स्वतःच्या मनाप्रमाणे घडवण्याचं निश्चित करते. नवऱ्याच्या मागं आईसारखं अपराधी, मिंधं आयुष्य जगण्याचं नाकारते. या वाटचालीत भय्याची मिळालेली साथ साऱ्या समाजाला आव्हान देत स्वीकारते आणि तरीही स्वतःचं स्वतंत्र आयुष्य मात्र सोडत नाही. हा प्रवास आत्मकेंद्रित आहे आणि त्यातूनच हरिपूर कॉंग्रेसच्या महिला शाखेच्या अध्यक्ष ताराबाई, नवऱ्यापाठी बाईला परस्वाधीन जिणं जगायला लागू नये म्हणून धडपडणाऱ्या, त्याना उद्योग, व्यवसाय मिळवून देणाऱ्या ताराबाई, ऑनररी मॅजिस्ट्रेट ताराबाई–अशा त्यांच्या व्यक्तिविकासाच्या खुणा दिसतात.

पूर्वीच्या काळाशी तुलना करता आज जरी परिस्थितीत पुष्कळ बदल झाला असला तिच्याकडे, तिच्या विचाराकडे बघण्याचा दृष्टिकोन मोकळा झाला असला तरी ताराबाईपुढं उभ्या ठाकणाऱ्या प्रश्न–अडचणीना आजच्या काळातल्या स्त्रीलाही तोड द्यावच लागतं आहे. अर्थात या प्रश्नांची दाहकता आज निश्चितच कमी झाली आहे; पण ही कादबरी ज्या काळात घडते तो काळ खूप जुना. स्त्री स्वातंत्र्याच्या कल्पनाचं वारही न लागलेला. साहजिकच हा काळ महत्त्वाचा ठरतो. कारण जुन्या काळात हे सगळं घडतं म्हणून कादबरीचा रोखच बदलतो. त्यामुळं या काळाच नीटसं चित्रण झाल नसतं तर पतीच्या मृत्यूनंतर ताराबाईनं प्रवाहाविरुद्ध जात दिलेल्या एकाकी लढतीतील दाहकता तेवढी जाणवली नसती.

कदाचित या दृष्टिकोनातूनच त्या काळाचा जाणूनबुजून उपयोग केला असावा. त्यामुळच कथासारात फारस वैशिष्टय नसलं तरी ताराबाईच्या आयुष्याचा प्रवास त्या काळाच्या स्पष्ट चित्रणासह आणि बारकाव्यासह समोर उभा रहातो. सर्वसामान्यपणे प्रचलित असलेली स्त्रीची, भित्री, परस्वाधीन प्रतिमा पुसून टाकून तिच आत्मविश्वासपूर्ण, धडाडीच असं समर्थ स्वरूप रंगवण्याचे सध्या अनेक लेखिकाचे प्रयत्न चाललेले आहेत. त्यामुळ साहित्याला एक वेगळ वळण मिळालं आहे आणि स्त्रीच्या नव्या प्रतिमेचा पुरस्कार करण्याच्या प्रयत्नातील 'मानुषी' हा आणखी एक प्रयत्न आहे.

—शुभदा रानडे

मानुषी
प्रतिभा रानडे
श्रीविद्या प्रकाशन
पृष्ठे : ११८, किंमत : ३५ रु.

## उत्कट अनुभती

'ते अज्ञात बेट' हा सुभाष सोनवणे याचा एकाकिका संग्रह आहे– यात 'एक फॅंटसी: सूडाची !' आणि 'बिरबलाची गोष्ट' हे दोन दीर्घांक आणि 'हृदयाची गाणी', 'अस्पर्श', 'ते अज्ञात बेट' हे तीन एकांक आहेत

'एक फॅंटसी सूडाची' ही दलित वाङ्मयात मोडणारी एक उत्कृष्ट एकाकिका आहे यात प्रभावी उपहास उपरोध आहे, दांभिकपणाचे बुरखे ओढून काढणारा विनोद आहे, कटु वास्तवाच चित्रण करताना सामाजिक, राजकीय परिस्थितीची आणि प्रवृत्तीची टर उडविलेली आहे एका दलित तरुणाने सवर्णीयावर घेतलेल्या जगावेगळया सूडाची ही कहाणी आहे जातिव्यवस्थेबद्दल मनात खदखदणारी चीड, तीव्र संताप यातल्या शब्दाशब्दातून व्यक्त झाला आहे. थोडी लाबण, ताणलेल्या कल्पना टाळल्या असत्या तर एकाकिका आटोपशीर झाली असती. यातल्या जवळजवळ सगळयाच एकांकिकामध्ये लाबण लावलेली दिसते. त्यामुळे मनाची पकड घेण्याचे सामर्थ्य असलेली नाटयबीजे असूनही वाचताना थोडेसे कंटाळवाणे होतेच.

'बिरबलाची गोष्ट'मध्ये नजिकच्या भूतकाळातल्या सत्य राजकीय घटनावर चढवलेला हल्ला, तिरस्करणीय प्रवृत्तीवर बिरबलाने केलेले भाष्य अप्रतीम आहे

'हृदयाची गाणी', 'अस्पर्श', 'ते अज्ञात बेट' या तीन एकाकिकामधील भावनाभिव्यक्ती आधीच्या दोन दीर्घांकापेक्षा अगदी वेगळ्या स्वरूपाची आहे. सामाजिक, राजकीय परिस्थितीतील ,दाहकता, ढोंग, विसंगती याचं दर्शन घडवण्यात लेखक जसा कुशल आहे, तसाच तो मानवी मनातील सुप्त भाव-सवेदनांना तलस्पर्श करण्यातही वाकबगार आहे हे विषयाच्या निवडीवरून आणि त्याच्या प्रभावी आविष्कारावरून दिसून येतं. अगदी विरुद्ध टोकाचे दोन प्रकारचे आशय सारख्याच समर्थतेने व्यक्त करणं ही गोष्ट खचितच भूषणास्पद आहे.

काहीशा कल्पनारम्यतेच्या आश्रयाने सुप्त अशा अस्सल वास्तवाचे दर्शन घडवणे हा प्रकार तसा थोडा अवघडच. कारण काल्पनिकतेची पातळी आणि ठाम असण्याची पातळी या दोन्हीवर गुतागुतीचं मनोदर्शन तोलताना परिणामकारकता उणावण्याची भीती अधिक ! 'ते अज्ञात बेट'च्या संदर्भात हा प्रकार घडण्याची विशेष शक्यता होती पण त्या किंवा इतर दोन्ही एकाकिकात असं होत नाही. थोडा संयम आवश्यक होता असं वाटतं ते लाबलेल्या सवादांच्या सदर्भात ! मुळातल्या लैंगिक विषयाच्या हाताळणीत मात्र कुठे सदभिरूचीला सोडून काही लिहिलेल नाही.

'हृदयाची गाणी'मध्ये एक अनोखे नाटय साकार केले आहे ज्या स्त्रीवर सतीश जोशीचे प्रेम असते, तिचा विवाह श्रीकृष्ण दीक्षितशी होतो; पण सतीशला ती आपलीच आहे असे वाटत रहाते तिच्या पतीला वारंवार फोन करून तो, मी आणि तू एकच आहोत, तू तुझ्या पत्नीशी क्रीडा करीत असताना मीही तिथे असतो, तिच्या शरीरावर माझा हक्क आहे अस सारख सागत रहातो. तुझ्या शरीराच्या रूपाने मीच तिच्याशी एकरूप होतो, आपल्यात पूर्णपणे अद्वैत आहे अस पटवीत रहातो व अखेरीला श्रीकृष्ण दीक्षितला, सतीश जोशी आणि आपण एकच आहोत अस खरच वाटू लागत. तो त्याच्यासाठी तळमळू लागतो, हा विषय नवा त्याचप्रमाणे केवळ व्यक्तीच्या फोनवरील सवादातून हे नाटय उलगडीत नेण्याचं कसबही चाकोरीबाहेरचं ! ही एक उत्तम श्रुतिका आहे.

'अस्पर्श'चा विषयही लैंगिक भावना हाच आहे यात स्त्रीला पुरुषाचे वाटणारे आकर्षण आणि स्त्रीला स्त्री विषयी वाट लागलेले अनैसर्गिक आकर्षण असे दोन्ही विषय आले आहेत. यातील वातावरण निर्मिती तसेच धीरगंभीर करून वैफल्यग्रस्त आणि श्रद्धेने ओथबलेले असे दोनच व्यक्तीमधले परस्परविरोधी सवाद या एकाकिकेला एक वेगळीच लय प्राप्त करून देतात एकाकिकेत दोन ख्रिश्चन स्त्रिया आहेत एक शरीर धर्म झिडकारून प्रभूच्या आणि मानव तेच्या सेवेसाठी नन् झाली आहे. दुसरी तिची वॉर्ड पुरुषप्राप्तीसाठी व्याकुळलेली आहे. तिच्या वासना अनावर आहेत नन् तिच मन बदलविण्याचा खूप प्रयत्न करते पण एकक्षण असा येतो की, ननला वार्डचंच आकर्षण वाटू लागतं आणि वॉर्डची शरीरोपभोगाची लालसा एकदम नष्ट होते. तिला ननचा उपदेश पटू लागतो. ही गुतागुत लेखकाने हळुवारपणे उलगडत नेली आहे

'ते अज्ञात बेट'ची अभिव्यक्ती काहीशी चाकोरीपलीकडील आहे पण तिचा आशय मला खास वैशिष्टयपूर्ण वाटला नाही. मानवी मनातील स्वप्नरजन आणि वास्तव यातलं अतर दाखवण्याचा हा प्रयत्न आहे. त्याचप्रमाणे वास्तवातील काव्य आणि काव्यातल वास्तव यातील परस्परसबधांचा हा शोध आहे कल्पना रमणीयतेचे आवरण फार ताणले गेल्यामुळे मनावर एकच एक परिणाम घडवून आणण्यात ही एकाकिका कमी पडते. अधिक सुटसुटीतपणे, कमी शब्दात हा आशय व्यक्त झाला असता तर एकाकिका जास्त चागली झाली असती.

एकूण हे सबध पुस्तक वाचल्यावर होणारा वाचकाच्या मनाचा प्रवास त्याला कलास्वादाच्या उत्कट अनुभूतीच्या अज्ञात बेटावर नेऊन पोचवतो. मानवी मन, समाज, राष्ट्र या विविध पातळयावरील उलथापालथीच दर्शन घडवतो, विचाराला धक्के देतो नि भावनाही हेलावून टाकतो. पहिल्याच एकांकिका सग्रहात हे इतके यश ही काय साधीसुधी बाब ? सुभाष सोनवणे याच्या पुढील लिखाणाची आतुरतेने वाट पहावी अस वाटायला लावणारे हे लिखाण आहे.

—मेधा सिधये

ते अज्ञात बेट
सुभाष सोनवणे
चेतश्री प्रकाशन, अमळनेर
पृष्ठे : ११४, मूल्य : रु. २०/–

# ऐलमा पैलमा, शिक्षण देवा

## लीला पाटील

आपल्यावरचा ठपका शक्य तितक्या सफाईनं व शक्य तितक्या लवकर दुसऱ्याच्या माथी मारण्याचा प्रकार शिक्षणक्षेत्रात नेहमीच चालतो. पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा अपुरा बौद्धिक विकास, वाचन-लेखनासारखा अध्ययन साधनावरील त्याची अपुरी पकड, स्वत चे विचार सुसगतपणे दुसऱ्यांसमोर मांडण्यातला त्याचा कच्चेपणा अशा बाबींची विद्यापीठीय पातळीवर जेव्हा चर्चा होते तेव्हा तेथील प्राध्यापकमडळी 'आम्ही हो काय करणार ? विद्यार्थी अगदीच कच्चे असतात. खरे पाहता महाविद्यालयानी अधिक तयारी करून घेतली पाहिजे. उच्च माध्यमिकची दोन आणि पदवीची तीन अशी पाच वर्ष विद्यार्थी त्यांच्या ताब्यात असतात.' नेमका हाच युक्तिवाद इयत्ता पाच ते दहाचा दाखला देऊन महाविद्यालयाचे प्राचार्य व प्राध्यापक करतात माध्यमिक शाळांच्या मुख्याध्यापक शिक्षकाशी आपण बोलू लागलो की इयत्ता पाचवीत दाखल होणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांना पुरेशी अक्षर ओळख नसते, त्याना जोडाक्षरे वाचता येत नाहीत. वाक्यांचा अर्थ लक्षात घेऊन वाचता येत नाही, लिहिताना तर वाक्य रचना, लेखनशुद्धता याबाबत चुका असतात, एवढेच नव्हे तर लिपीतील सगळी अक्षरेही त्यांना अचूक काढता येत नाहीत. बेरीज-वजाबाकी, गुणाकार-भागाकार ह्या गणितातील चार मूलभूत प्रक्रियांशी त्याची पुरेशी ओळख असत नाही-अशा तक्रारी (बरेच वेळा सप्रमाण) आपणापुढे माडतात. काही वेळा मुलाच्या अभ्यासाकडे पालक पुरेसे लक्ष देत नाहीत असा युक्तिवाद करून पालकांच्या माथीही दोष मारला जातो.

पदव्युत्तर पातळीपासून मूल जन्माला घालणाऱ्या पालकांपर्यंत विद्यार्थ्यांच्या अपुऱ्या असमाधानकारक सपादनाचा दोष इकडून तिकडे टाकणारे आपणच ( कोणत्या ना कोणत्या भूमिकेन) आणि मुलाना जन्म देऊन त्यांना शिक्षणाच्या चक्रात टाकणारेही आपणच पालक म्हणून आपली प्रार्थना एकच असते. कोणती बरे ?

'ऐलमा पैलमा शिक्षण देवा.
आमचा खेळ माडून द्यावा, करीन तुमची सेवा.'

आपलं मूल शिकावं आणि त्यानं नाव कमवाव अस आपल्याला वाटत असत. विद्यार्थ्यांनी शिकावं आणि मार्क मिळवून स्वत चं आणि शाळेचं नाव करावं असं शाळाच्या मुख्याध्यापक शिक्षिकांना वाटत असत.

आश्चर्य वाटतं ते याचं की आपणा पालक शिक्षकाची अविरत प्रार्थना मुलाच्या/विद्यार्थ्याच्या शिक्षणाचा खेळ माडून द्यावा अशीच असली तरी हा खेळ आपल्या अपेक्षाप्रमाणं का बरं मांडला जात नाही ? का बरं आपली मुल/आमचे विद्यार्थी अपेक्षित उची गाठत नाहीत ? दोषारोप इकडून तिकड फेकण्यानं दोष का नाहीसे होतात ? नक्कीच नाहीत. तेव्हा मंडळी, विचार केलाय की तुम्ही आणि मी मिळून 'शिक्षण' ह्या आपल्या सर्वांच्याच लेखी महत्त्वाच्या असणाऱ्या विषयाचा थोडा विचार करायचा.

विचार करण्याच्या अनेक पद्धती आहेत. आपल गृहीतक, आपलं निरीक्षण, आपले विचार हेच खरं धरायचं आणि तिथून पुढचं आणि त्याच सदर्भात पूर्वीचं सारं शोधायचं. दुसरी पद्धत अशी की आपले सारे पूर्वग्रह बाजूला ठेवायचे आणि जे दिसतंय, ऐकू येतंय, वाटतय त्यासंबंधी खुल्या मनानं नव्यानं विचार करायचा. मला वाटत आपण दुसरी पद्धत स्वीकारूया. शिवाय आणखी एक. आपल्याला महत्त्वाच्या वाटणाऱ्या ह्या शिक्षणाच्या प्रश्नाबद्दल आजूबाजूच्या वेगवेगळ्या लोकांना काय वाटत तेही समजून घ्यायचा प्रयत्न आपण करायचा. विचाराचा विषय सामान्यपणानं जरी एकच असला तरी वेगवेगळे लोक भिन्न भूमिकांतून त्याचा विचार करतात. त्याचे त्या विषयाबद्दलचे अनुभव वेगवेगळे असतात. हत्तीच्या शरीराच्या आपल्या हाती लागणाऱ्या भागावरून हत्तीची समग्र कल्पना येत नाही हे सांगणारी एक रूपककथा आहे.ही कथा तुम्ही-मी वाचलेली आहे. तेव्हा आपण ठरवू या की 'ऐलमा, पैलमा, शिक्षण देवा' ह्या मालिकेत शिक्षणाच्या विविध प्रश्नांशी या ना त्या रीतीनं सबधित असणाऱ्या विविध घटकाची व त्याच्या शिक्षणाविषयीच्या अभिप्रायांची चर्चा आपण करायची. या लेखमालेत माझं म्हणण स्वाभाविकच प्रतिबिबीत होईल. पण मी अशी खबरदारी घेईन की मैत्रीण, सहकारी, सहाध्यायी-या व अशा कोणत्याही नात्यानं तुमच्यापैकी काहीनी या विषयासबधी माझ्यापर्यंत जे जे पोचवल असेल त्याचही या लेखमालेत प्रतिबिब असेल

'ऐलमा पैलमा शिक्षण देवा' ह्या लेखमालेत शिक्षणविषयक तात्त्विक परिभाषा फारशी न वापरता, तुम्हाला मला नेहमी सतावणारे जे प्रश्न आहेत त्याची चर्चा आपण करणार आहेत 'मूल सुखी व्हावं,मूल आयुष्यात यशस्वी व्हाव' या भावनेन भारलेले आपण सारे पालक मुलाला लवकरात लवकर शाळेत दाखल करण्याला उत्सुक असतो. मुलाच्या सुखाचा व यशस्वितेचा पाया त्याला शाळेत दाखल करून आपण घालत आहोत अशी आपली समजूत असते. अमुक प्रकारचं शिक्षण चागल, अमुक माध्यमात शिक्षण दिलं असता ते चागलं, तमुक प्रकारच्या शाळा चागल्या, शाळांनी हे शिकवावं व ते शिकवू नये. अशा नानाविध शैक्षणिक बाबीसबधी आपल्या काही समजुती असतात. या समजुती म्हणजे जणू चाकोऱ्या. आपण चाकोरीकडे पाहतो आणि प्रवास कुठवर व कसा करायचा हे ठरवतो शिक्षण वगळता इतर सर्व क्षेत्रात अहो, सारे बदलले' अस म्हणून आपण जुन्या चाकोऱ्या सोडत आहोत,जुन्या समजुतीचा त्याग करत आहोत. जानेवारी १९८५ मध्ये भारताचा पस्तिसावा प्रजासत्ताक दिन आपण साजरा केला. या पस्तीस वर्षात शिक्षण क्षेत्राबद्दलही आपल्याला 'अहो, सारे बदलले' असे म्हणता येईल का ? आपण तस म्हणणार असू तर शिक्षणासबंधीच्या जुन्या चाकोऱ्या आपण सोडल्या आहेत काय ? आपला देश स्वतंत्र झाल्याला अडतीस वर्षे पूर्ण झाली, या काळात आपलं शिक्षण कितपत स्वतत्र झालं ? शिक्षणसस्था कितपत स्वायत्त

झाल्या ? विद्यार्थी व शिक्षक यांच्या परस्पर नातेसंबंधांचा पोत कितपत बदलला ? मुक्तते कडे जी नेते ती विद्या–सा विद्या या विमुक्तये ।–हा मानवी विकसनाचा मंत्र कितपत साकार झाला ?

पूर्वप्राथमिक ते इयत्ता बारावीपर्यंतचा काळ म्हणजे व्यक्तीच्या वसंतोत्सवाचा काळ. ह्या वसंतोत्सवाचा हा बहर बाहेरून कृत्रिम फुले–पाने चिकटवून आपण निर्मितो आहोत की व्यक्तींच्या अंतरंगातूनच हा बहर उसळी घेत आहे ? The destiny of India is being shaped in her classrooms असं कोठारी आयोगाच्या अहवालातील पहिलेच वाक्य आहे. त्या वाक्यातील आशय इ. स. १९६६ मध्ये प्रत्यक्षात दिसत होता काय ? आज दिसतो आहे काय ? आज दिसत नसला तर कधी दिसणार आहे ?...बाई... बाई...बाई.. किती ही प्रश्नांची फैर ! प्रश्न पुरे म्हणता. बरं पुरे. 'ऐलमा पैलमा शिक्षण देवा' या लेखमालेत यांपैकी काही प्रश्नांची उत्तरं आपण एकमेकांच्या मदतीनं शोधू या. ह्या लेखमालेचे वाचक म्हणून तुम्ही एक अट मात्र पाळली पाहिजे. लेखांबद्दल तुम्हाला जे काही म्हणावेसे वाटेल, आशयात काही भर घालावीशी वाटेल, आशय चुकीचा / बरोबर सांगावासा वाटेल– ते सारं तुम्ही थेट माझ्यापर्यंत पोचवायचं. □

---

शिक्षणविषयक प्रश्नांची चर्चा करणाऱ्या 'ऐलमापैलमा' या नव्या सदरातील पहिला लेख

# शिक्षकपण म्हणजे काय ?

'शिक्षक होणे म्हणजे नेमके काय हो ?'

'शिक्षक होणे म्हणजे डोनेशन देऊन वशिला लावून किंवा सरळ मार्गाने बी. एड. ला प्रवेश मिळविणे.' 'नुसता प्रवेशच ?' 'अहो, बी. एड्.ला प्रवेश मिळविलेले सगळेच लोक पास होतात ! प्रवेश मिळणे किंवा मिळविणे, एवढेच महत्वाचे ! तुम्ही बी. एड्. पदवी मिळविली की शिक्षक झालातच.'

शिक्षक–प्रशिक्षणाविषयीच्या या संकल्पना, माणसांच्या रूपाने आज महाराष्ट्रातील ५१,५३४ प्राथमिक शाळांत आणि ६,२२७ माध्यमिक शाळांत साकार झालेल्या आहेत. शिक्षक होणे म्हणजे काय हे त्या माणसांनी जसे आत्मसात केले तसा आकार त्यांच्या शिक्षकपणाला येत आहे. परिणामतः आजच्या शाळांत निर्जीव, निष्प्राण, अचेतन, माहितीच्या ढिगाखाली मुले पेंगळली आहेत, जांभया देत देत शाळा संपण्याची वाट पहात आहेत. आमची मुले आणि इतर देशांतील मुले यांची माती वेगवेगळी असेल का ? तसे नसेल तर, त्या मुलांत दिसणारी चटपटती वीज तल्लखपणा आमच्या सर्वसाधारण मुलांत का दिसत नाही ? आता हेच बघा. परदेशातील एका चौदा वर्षाच्या मुलाला सांगितले की, 'तुला आवडणाऱ्या वीस बाबींची यादी कर.' त्याने काय लिहिले ते वाचू या. (१) अनवाणी चालणे (२) वीणा वाजविणे (३) पतंग उडविणे (४) पैसे खर्च करणे (५) धुंदीत राहणे (६) वारा अंगावर घेणे (७) लोकांशी बोलणे (८) इतरांत मिसळून जाणे (९) खाण्याचे पदार्थ बनविणे (१०) चित्रविचित्र कपडे घालणे (११) स्पर्श करणे (१२) हसणे (१३) अडथळे ओलांडीत दौडणे (१४) नवीन लोकांना भेटणे (१५) जंगलातून पळणे (१६) वाचणे (१७) राजकारणाविषयी बोलणे (१८) चॉकलेटस् खाणे (१९) कोणाला तरी मदत करणे (२०) स्वतः-सारखंच असणे.

अमेरिकेतल्या एका पोराने केलेली यादी वाचताना आपण थक्क होऊन जातो. किती वेगवेगळ्या बाबींतील सौंदर्य त्याला जाणवले आहे ! अनवाणी चालणे, वारा अंगावर घेणे, हसणे, जंगलातून पळणे, मदत करणे आणि स्वतःसारखेच असणे– या बाबी तुम्ही–मी तरी लिहू का हो ? आपल्यापैकी सर्वसाधारण माणूस या बाबी लिहील का? या बाबींतील सौंदर्य तुम्ही–मी अनुभवलेच नाही ! या संदर्भात ऐकलेला एक किस्सा सांगते–

शिक्षणाचे काम करण्यासाठी जिवाचा अटापिटा करणाऱ्या एक बाई. पुरोगामी विचाराच्या, अनेकदा परदेशची वारी केलेल्या त्यांच्या एका परदेशी मैत्रिणीने त्यांचे केस पाहून एकदा त्यांना विचारले. 'हे केस पाठीवर मोकळे सोडून, त्यातून आरपार जाणारे वारे अनुभवीत फिरावे असे तुम्हाला कधी वाटतच नाही का ?' प्रश्न ऐकून बाई चमकल्या. आपले केस सुंदर आहेत हे जसे त्यांना पहिल्यांदा समजत होते तसेच केस पाठीवर सोडून वारा अंगावर आणि केसात घेत फिरण्यात मजा असू शकेल, ही कल्पनाही त्यांच्यापर्यंत पहिल्यांदाच पोहचत होती. बाईने कसे नीटनेटके असले पाहिजे असे आपल्याकडे मानतात. केस जरा इकडे तिकडे झाले की आई, सासू, नवरा 'काय अवतार केला आहेस' असे म्हणतात. माणसाला अनेक प्रकारे बांधून ठेवून जीवनाच्या अनुभवांपासून किती दूर ठेवतो आपण त्याला !



आजच्या शाळाशाळांत चालणारे शिक्षणसुद्धा बरेचसे असेच आहे. एक बायकी उपमा सांगू ? लोणचे घालताना ते टिकावे म्हणून त्यात खूप तेल घातले जाते. लोणच्याच्यावर तेलाचा दोन तीन इंच थर असला की तो

थर फोडून हवा आत जातेच कशी आणि लोणचे नासेलच कसे ? मुलांभोवतीचे आयुष्य मुलांपर्यंत पोहचेल तर मूल नासेल अशी अनामिक भीती आम्हाला वाटत असते. गुलमोहोराचे वर्णन शाळेतल्या पुस्तकात वाचायचे; पण गुलमोहोर पाहायचा नाही. परोपकाराचे धडे शब्दांतून शिकायचे; पण कृतीतून मुलाच्या वर्तनास तसा अंकुर फुटू द्यायचा नाही. लोणच्याच्यावर जसे तेलाचे थर ओतायचे, तसे माहितीच्या (कित्येकदा अनावश्यक) ढिगाऱ्याखाली मुलाची चिकित्सक बुद्धी गाडून टाकायची एखादी वस्तू समोर ठेवली नि मुलांना सांगितले ' विचारा प्रश्न याबद्दल ' की, त्या वस्तूचे रंग-रुप,आकार यापलीकडे मुले फारशी जातच नाहीत. ढोबळ वस्तुमानाला छेद देऊन अमूर्ताकडे झेपावणाऱ्या कल्पनेच्या, बुद्धीच्या फांद्या आपण पालक–शिक्षक छाटून टाकत असतो. जास्वंदीच्या आकाराचे फूल काढले की त्याला लाल रंगच दिला पाहिजे, एखाद्या मुलाने त्याला पिवळा रंग दिला की, मास्तर किंवा बाई त्याला ठाकून–ठोकून साच्यात बसवतात– 'लाल रंग दे त्या फुलाला !' चवळीपासून खाण्याचे पदार्थ बनवायचे म्हटले की ' उसळ ' हा जणू एकच पदार्थ ! 'मोड आलेली चवळी नुसती कच्ची खाणे हाही एक पदार्थच नाही का ! ' असे एखाद्या मुलीने म्हटले की, ' उद्या घरातल्या लोकांना आंबोण भिजवूनच घालणार ग तू ! ' असा टोला तिला मिळालाच. एका शाळेत एकदा मी गेले होते. मुख्याध्यापकांनी आपल्या शाळेच्या शिस्तीचे रसदार वर्णन केले होते. मी गेले नि थोड्या वेळात मधली सुट्टी झाली. घंटा होताच मुले-मुली वर्गातून बाहेर पडली. मुले बाहेर पडतात की सैनिक हेच मला क्षणभर समजेना. दोना दोनांच्या ओळीत, नाकासमोर बघत, ओठ घट्ट मिटून मुले बाहेर पडत होती. मुख्याध्यापक मला सांगत होते, ' सांगितले होते ना मी तुम्हाला आमच्या शिस्तीबद्दल.' मी पाहत नि ऐकतच राहिले– ती शिस्त !

खलील जिब्रानने ' अध्यापन म्हणजे काय' हे सांगणारी एक कविता लिहिली आहे. काही ओळी पहा.

' The teacher gives not of his wisdom but rather of his faith and his lovingness...

...If he is indeed wise he dose not bid you enter the house of his wisdom, but rather leads you to the threshhold of your own mind...

...The vision of one man lends not its wings to another man.'

अध्यापनाने काय घडले पाहिजे किती सुरेख मांडलेले आहे खलील जिब्रानने ! शिक्षकाने विद्यार्थ्यीपर्यंत काय पोहोचवायचे आहे ? त्याने जमविलेले शहाणपणाचे गाठोडे नव्हे. त्याचा प्रेमळपणा आणि त्याने संपादन केलेल्या श्रद्धा (faith). शिक्षकाने स्वतःच्या ज्ञानमंदिरात प्रवेश करण्याची आज्ञा विद्यार्थ्याला करायची नसते, विद्यार्थ्याला त्याच्या मनाच्या उंबरठ्यापर्यंत न्यायचे असते. शिक्षक स्वतःच्या नजरेचे (vision) पंख विद्यार्थ्याला उसनवार देऊ शकत नाही अध्यापनाद्वारे ! आपल्या शाळाशाळांत मात्र ' अध्यापना 'च्या नावाखाली आपण जे करतो, ती असते उधार उसनवारी– क्रमिक पुस्तकातल्या ' तय्यार ' माहितीची, शिक्षकाने सांगितलेल्या विज्ञान प्रयोगांची,शिक्षकांकडून / बाईकडून ऐकलेल्या भूरचनेची, क्रमिक पुस्तकांतून वाचलेल्या वनस्पतींची ! ही माहिती विद्यार्थ्याला स्वतःला कधीही ' भावत ' नाही. असे हे शाळांचे कारखाने उभारून सळसळत्या मनांची, स्पंदनशील हृदयांची आणि चवकस बुद्धीची ' माणसे ' कशी तयार होणार ? हाच प्रश्न वेगळ्या पण अधिक प्रभावी स्वरुपात पुढच्या कवितेत विचारला आहे, त्याबद्दल पालक आणि शिक्षक म्हणून आपण विचार केला तर आपले शिक्षकपण कसे नसले पाहिजे म्हणजेच पर्यायाने कसे असले पाहिजे हे लक्षात येईल.


' काय रे पोरा ?
शिकवलंय का तुला ? कधी आणि
कुणी ?




काय आणि कसं
पहावं, ऐकावं, हुंगावं आणि
आस्वादावं ते !
का वजावलं तुला ?
' ऐक आणि पाहा, निमुटपणं,
सांगतोय ते.
योग्य नव्हे वर्गाचा वेळ फुकट जाणं '
' अरे मुला !
दिलेत का तुला, कधी आणि कुणी
स्वाध्याय आणि संशोधनाचे मंत्र ?
का सुचवलंय हळूच तुला
जे उमजलंच नाही ते दडवून ठेवायचं
तंत्र ! '

' अरे अरे बाळा !
कसं जगावं ? आणि कशासाठी
मरावं !
याचा दिलाय का अर्थ समजावून
त्यांनी, कधी तरी ?
का बिंबवलंय त्यांनी, मनावर तुझ्या–
हे असंच चालायचं, निभावून न्यायचंय कसं तरी ! '

' सांगतोस, पोरा ?
दिलंय का तुला त्यांनी
जीवनावर हुकमत गाजवण्याचं
सामर्थ्य
आणि अनंत प्रश्नांशी लढण्याची
हिम्मत ?
का दिलाय दिलासा–
साऽऽरं ठीक बनवून ठेवलंय तुझ्यासाठी
करूच नकोस प्रयत्न आणि संघर्ष–
उद्याच्या परिवर्तनासाठी ! ! □




# प्रत्येक क्षण अभिनयाचा
# इन्ग्रीड बर्गमन

● रघुपती भट्ट ●

'स्टॉकहोम' मधील ती शाळकरी मुलगी अत्यंत बुजरी होती, पण तिच्या महत्त्वाकांक्षा मोठ्या होत्या. स्वीडनमधील सर्वात प्रसिद्ध नटाबरोबर कामे करण्याची स्वप्नं ती पाहात होती. तिच्या दुर्दम्य इच्छेला नियतीने साथ दिली आणि ती चित्रपटात कामंही करू लागली. तिच्या अभिनयाचं आणि सौंदर्याचं कौतुक होऊ लागलं. एके दिवशी न्यूयॉर्कमध्ये राहणाऱ्या एका स्विडीश दांपत्याने तिच्या गुणांची महती एका लिफ्टच्या शिपायाजवळ गायली. त्या शिपायाकडून ती माहिती डेव्हिड सेल्झनिकपर्यंत पोचली. सेल्झनिकने तिची सर्व माहिती मागवली आणि त्याचा अभ्यास करताना त्याच्या लक्षात आलं की, एक आत्यंतिक टॅलेंटेड अभिनेत्री स्वीडनमध्ये धुमसत आहे. त्यानं ताबडतोब तिला हॉलीवूडला बोलवून घेतलं.

डेव्हिड सेल्झनिक म्हणजे हॉलीवूडमधलं बडं प्रस्थ होतं मोठमोठ्या कलाकारांनासुद्धा तो सडेतोडपणे सुनावत असे. पिक्चर तयार करण्यापूर्वी त्याच्या काही संकल्पना प्रत्यक्षात आणणे हा तो आवश्यक भाग मानत असे.

ही स्विडीश नटी जेव्हा त्याच्यासमोर आली तेव्हा तिलाही सेल्झनिकच्या स्वभावाची कल्पना होती. सिनेमा धंद्याच्यादृष्टीने आवश्यक असे काही बदल त्याने सुचवले. पहिला बदल म्हणजे नावातील. तिचं स्विडीश नाव बदलून तिनं सुटसुटीत अमेरिकन नाव धारण करावं. दंतवैद्याला एक भेट द्यावी आणि काही दात कॅप करून घ्यावेत आणि भुवया कोरून घ्याव्यात. एवढे बदल केल्यावर ती हॉलीवूड अभिनेत्री म्हणून घ्यायला पात्र ठरेल असं तो म्हणाला.

पण या स्विडीश अभिनेत्रीने यातील कोणतीही गोष्ट करायला नकार दिला.

'मी जशी आहे, तशी मला स्वीकारणार असाल तरच मी तुमच्या चित्रपटात काम करेन.' ती म्हणाली, 'अन्यथा मी स्वीडनला परत जाईन, तिथं मला कमतरता नाही.'

सेल्झनिकला अक्षरशः धक्का बसला. अगदी त्याच्यासारखाच स्वभाव असलेली अभिनेत्री आपल्यासमोर आहे हे त्यानं ओळखलं. तिच्या स्वभावावर तो इतका खूश झाला की त्याने आयुष्यात प्रथमच दुसऱ्याचे म्हणणे ऐकले. तिच्या म्हणण्याला रुकार दिला.

अशा तऱ्हेने 'इन्ग्रिड बर्गमन' ची हॉलीवूडमध्ये एंट्री झाली.

हॉलीवुडमध्ये आपला पहिला इंटरमेझो (Eentermezzo) नावाचा चित्रपट बनवताना इन्ग्रिड अवघ्या तेवीस वर्षाची होती, पण तरीसुद्धा तिची समज मोठी होती आणि तिच्या व्यक्तिमत्त्वात, अभिनयात जी सहजता, नैसर्गिकता होती ती तिची खासियत होती.

त्यानंतर इन्ग्रिडने मागे वळून पाहिलेच नाही. 'इंटरमेझो' मध्ये तिने एका एकाकी पियानो शिक्षिकेची भूमिका केली होती. ती गाजल्यावर खास तिला पुढे ठेवून कथानकं लिहिण्यात येऊ लागली आणि नामवंत नट आणि दिग्दर्शक इन्ग्रिडबरोबर काम करण्याची संधी मिळावी म्हणून धडपडू लागले. सेल्झनिकचा विश्वास तिने सार्थ ठरवला. तिचे नाव हॉलीवुडच्या टॉप स्टार्समध्ये आले. तिची भूमिका म्हटल्यावर पिक्चर हमखास गर्दी खेचणार हा फॉर्म्युलाच झाला.

इन्ग्रिड म्हणजे पॉल म्युनीच्या जातीची कलाकार होती. कोणताही चित्रपट स्वीकारण्यापूर्वी त्या कथेचा आणि व्यक्तिरेखेचा पूर्ण अभ्यास ती करीत असे. अभिनयावर तिची किती श्रद्धा होती ती मांगण्यापेक्षा तिचे एक वाक्य फार बोलके आहे.

‘जर तुम्ही माझ्यापासून अभिनय हिरावून घेतलात तर माझा श्वासच बंद पडेल.’

यापेक्षा जास्त श्रद्धा ती कोणती ?

पॉल म्युनीप्रमाणे ती आपल्या भूमिकांत रगून जात असे. त्या कॅरॅक्टरमधून बाहेर येणे तिला अवघड वाटत असे. यासाठी तिने सतत वेगवेगळे रोल स्वीकारले. भूमिकाना त्या चित्रपटात जास्त महत्त्व आहे की नाही याकडे लक्ष न देता त्या भूमिकेत आव्हान किती आहे याकडे तिचे जास्त लक्ष असायचे. मिनेमातल्या कामापेक्षा क्रेडिटमध्ये आपल्या नावाचा क्रम पहिला आहे की दुसरा यावरून भांडत बसणाऱ्या आपल्यातील स्टार, सुपरस्टार वगैरेंना इन्ग्रिडच्या वागण्यावरून आदर्श घ्यायला हरकत नाही.

‘गॅसलाईट’मध्ये तिने वेडेपणाकडे झुकलेल्या नववधूचे काम केले होते. त्यातील बारकावे तिने अप्रतिमपणे टिपले होते. या भूमिकेबद्दल तिला १९४४ चे ऑस्कर पारितोषिक मिळाले. आणि बुजरी स्विडीश मिशनरी उभी केली ‘मर्डर ऑन द ओरिएट एक्स्प्रेस’मध्ये. याबद्दलही तिला अकादमी पारितोषिक मिळाले. ‘स्पेलबाऊड’ मध्ये ती भावनाविवश मानसोपचारतज्ज्ञ आहे. ‘द बेल्स ऑफ सेंट मेरीज’ मध्ये बेसबॉल खेळणारी नन् आहे. या सगळ्या विविध प्रकारच्या भूमिकाना प्रेक्षकाकडून आणि समीक्षकांकडून सदैव प्रचड दाद मिळाली. कारण इन्ग्रिडचे जीव ओतून केलेले काम. अगदी प्रेक्षकाना आतून ढवळून यावे असा अत्युकट भावाविष्कार.

...दुसरी महत्त्वाची बाब इन्ग्रिडमध्ये होती ती ही की ती एका भूमिकेचा स्पर्श दुसऱ्या भूमिकेला होऊ द्यायची नाही. ननचे वैशिष्ठ्य ननमध्ये सपायचे पुन्हा दुसऱ्या भूमिकेत तिला डोकावू द्यायचे नाही.वेगळ्या अदा, वेगळ्या छटानी दुसरी भूमिका साकार करायची. ‘स्टिरीओटाईप’ म्हणतात तो येऊ द्यायचा नाही या वैशिष्ठ्यामुळे इन्ग्रिडच्या प्रत्येक चित्रपटात नाविन्य असे व ते पाहायला लोक उत्सुक असत आणि यामुळेच तिने आपली लोकप्रियता वर्षानुवर्षे टिकवली. कधीच आपल्यात शिळेपणा दाखवू दिला नाही...

इन्ग्रिडला आपल्या यशामुळे कधीच गर्व झाला नाही. ती अतिशय साधेपणाने वागणारी प्रेमळ हृदयाची स्त्री होती. तिच्या सहवासातील सर्वांनीच तिच्या प्रेमळपणाचे किस्से सागितले आहेत. तिच्या एका मैत्रिणीबरोबर एकदा ती रोममध्ये ‘पोप’च्या उपस्थितीतील ‘मास’ हा धार्मिक सोहळा अनुभवत होती. एकदम तिच्या लक्षात आलं की तिच्याजवळ असलेली तरुण मुलगी आधळी आहे. कनवाळू हृदयाची इन्ग्रिड त्या मुलीजवळ गुडघे टेकून बसली आणि तिने त्या धार्मिक सोहळयाच्या प्रत्येक विधीचे तिला इत्यभूत वर्णन केले. त्या मुलीला माहिती नव्हतं की जगप्रसिद्ध इन्ग्रिड बर्गमन आपल्याला मदत करते आहे. इन्ग्रिडची मैत्रीण मात्र तिच्या कनवाळूपणाने आत्यंतिक भारावून गेली.

‘पिटर लिंडस्टॉर्म’ हा इन्ग्रिडचा पहिला नवरा, त्याच्याबरोबर तिचा ससार चांगला चालला होता; पण १९४८ मध्ये एके रात्री तिने ‘ओपन सिटी’ नावाचा एक चित्रपट पाहिला. हा रियॅलिस्टिक चित्रपट होता. या चित्रपटाचा दिग्दर्शक आणि निर्माता होता रॉबर्टो रोझेलिनी. प्रख्यात इटालियन सिनेसम्राट! ज्या क्षणी रॉबर्टोचे ते पिक्चर पाहिले त्या क्षणीच इन्ग्रिड रॉबर्टोच्या प्रेमात पडली. तिने दुसऱ्या दिवशी रॉबर्टोला पत्र लिहिल आणि त्याच्या चित्रपटात काम करण्याची इच्छा व्यक्त केली.

आणि पिटर लिंडस्टॉर्म, त्यांची मुलगी याना सोडून रॉबर्टोच्या चित्रपटात काम करण्यासाठी रोमला निघून गेलेली इन्ग्रिड परत आलीच नाही. पिटरला घटस्फोट न देता ती रॉबर्टोकडे गेली आणि त्याच्याबरोबर राहिली, तिला एक मूलही रॉबर्टोपासून जन्मले. इन्ग्रिडच्या वागण्याने सनातनी विचाराचे रोमन तर खवळलेच पण आधुनिक विचाराची, अणुयुगाची प्रवर्तक अमेरिका सुद्धा हादरली.

खरं म्हणजे अफेअर्सनी भरून गेलेल्या अमेरिकन फिल्म इंडस्ट्रीला हादरायच काही कारण नव्हतं; पण इन्ग्रिडचे चित्रपट आणि आतापर्यंतचे वागणे यामुळे तिची एक पब्लिक इमेज तयार झाली होती. या इमेजला तडा पोचल्यामुळे लोक नाराज होते. (जॅकेलिन केनेडीने पुनर्विवाह केल्यानंतर तिच्या चाहत्यांचा जो अपेक्षाभंग झाला तो या अपेक्षाभंगासारखाच होता.)

एका वर्तमानपत्रानं लिहिलं. ‘इन्ग्रिड बर्गमनने आपला संसार वाऱ्यावर सोडून बेशरमपणे बिनलग्नाचे रॉबर्टोबरोबर राहाणे ही आत्यंतिक लाजिरवाणी गोष्ट आहे आणि अशा बाईला आपण अमेरिकन्स किंमत देतो हे त्याहीपेक्षा लाजिरवाणे आहे.’

त्याहीपेक्षा जास्त म्हणजे अमेरिकन सिनेट मध्ये त्यावर चर्चा झाली आणि एका सिनेटरने मत व्यक्त केले की ‘अमेरिकेत पुन्हा पाऊल ठेवायला इन्ग्रिड नालायक ठरली आहे!’

याचा परिणाम इन्ग्रिडच्या करियरवर झाला. तिचे पिक्चर आपटू लागले, रोझेलिनी बरोबर चित्रपट अपयशी ठरले आणि चित्रपटाच्या अपयशाबरोबर त्याचा ससारही जमला नाही. इन्ग्रिडच्या कलावेढी मनाची रोझेलिनीवर छाप बसली होती; पण मुळचा बहर ओसरल्यावर इन्ग्रिडच्या आणि रोझेलिनीच्या सबधात तो हळुवारपणा राहिला नाही.

‘पण इन्ग्रिडने जगाची फारशी फिकीर कधी केली नव्हती. आपल्याला हवे तसे जगणे

---

जन्म : २९ ऑगस्ट, १९१६, स्वीडन.

पहिला हॉलीवूड चित्रपट ‘इन्टरमेझो’ – १९३९.

गाजलेले चित्रपट : गॅसलाईट, ॲनास्तेशिया, मर्डर ऑन द ओरीएंट एक्स्प्रेस, स्पेलबाउड, द बेल्स ऑफ सेंट मेरीज, द इन ऑफ द सिक्स्थ हॅपीनेस.

पारितोषिक विजेते चित्रपट : गॅसलाईट, ॲनास्तेशिया, मर्डर ऑन द ओरीएंट एक्स्प्रेस.

एम्मी पुरस्कार गोल्डा मायरच्या भूमिकेबद्दल.

मृत्यू : २९ ऑगस्ट, १९८२.

---

हे तिने सारसर्वस्व मानले होते. म्हणूनच तिच्या स्वभावातच विक्षिप्तपणाच्या छटा होत्या. भर पावसात भिजत जाणे तिला मनसोक्त आवडायचे. दिवसाच्या कोणत्याही वेळी ती भरपूर आईस्क्रिम खायची.ती म्हणायची, मी ज्या गोष्टी केल्या त्याची मला कधीच खंत वाटत नाही. ज्या गोष्टी मला करता आलेल्या नाहीत त्याची मात्र जरूर खत वाटते.

असं बोलणारी ती बाई होती.

पण इन्ग्रिड अत्यंत थोर कलावती होती. कलावंतांचा हा आविष्कार केव्हाही महत्वाचा असतो. १९५६ मध्ये 'अनास्तेशिया' नावाचा एक चित्रपट आला. अनास्तेशिया ही झार निकोलस दुसरा याची सगळयात धाकटी मुलगी. ती झार कुटुंबाबरोबरच खलास करण्यात आली असे मानतात; पण ती त्यातून वाचली असाही एक समज आहे. कारण बऱ्याच स्त्रियानी आपणच अनास्तेशिया आहोत असा नतर दावा केला होता. या अनास्तेशियावर आधारित चित्रपटात इन्ग्रिडने तिला इतके समरसून उभे केले की १९५६ चे ऑस्कर पारितोषिक तिच्याशिवाय दुसऱ्या कोणाला मिळवता आले नाही.

अनास्तेशियाने इन्ग्रिडची सगळी बदनामी धुवून काढली. पुन्हा एकदा इन्ग्रिडचे नाव सिनेरसिकांच्या तोंडी घोळू लागले. इन्ग्रिड म्हणजे अक्षरशः लाटच झाली. तिच्या वैभवशाली पुनरागमनाच्या हकिकती प्रसिद्ध होऊ लागल्या.

लोकांच्या भावनांची दखल अमेरिकन सिनेटने घेतली. एकदा याच सिनेटने इन्ग्रिड अमेरिकेत पुन्हा पाऊल ठेवायला नालायक आहे असे जाहीर केले होते. त्याच सिनेटने पुन्हा एक ठराव करून इन्ग्रिडच्या कर्तृत्वाबद्दल तिचे अभिनंदन केले. एक महान कलाकार म्हणून तिचा गौरव केला. आपल्या पूर्वीच्या उद्‌गाराचे स्मरण ठेवून एक जेष्ठ सिनेटर म्हणाला.

'याच गृहामध्ये २२ वर्षांपूर्वी जगातल्या एका आत्यंतिक देखण्या आणि प्रतिभाशाली कलावतीवर कडवी टीका करण्यात आली होती. अमेरिकन प्रेक्षकाच्या हृदयात एक अत्युच्च प्रतिभावंत कलाकार म्हणून तिचे स्थान कायमच राहिले आहे. आणि राहील. कुमारी बर्गमन यांचे आमच्या देशात कायम स्वागत होत राहिल एवढेच नव्हे, तिच्या भेटीमुळे आम्ही सदैव सन्मानित होत राहू.'

डेव्हिड सेल्झनिकला आपले म्हणणे मान्य करायला लावणाऱ्या इन्ग्रिड बर्गमनचा अमेरिकन सिनेटवर हा दणदणीत विजय होता. असा विजय इतर कोणत्याही महान शक्तीला मिळाला नव्हता; पण एका स्त्रीने केवळ आपल्या अभिनय सामर्थ्यावर हा शक्य करून दाखवला. या विजयामुळे कलावंतांचे खाजगी जीवन आणि कला या दोन गोष्टी भिन्न आहेत आणि कला ही सदैव महानच असते हे इन्ग्रिडने पटवून दिले, याबद्दल जगातले असख्य महान कलाकार इन्ग्रिडचे सदैव ऋणी राहतील यात शकाच नाही.

१९५८ मध्ये 'द इन ऑफ द सिक्स्थ हॅपीनेस' नावाच्या चित्रपटात तिने काम केले. दुसऱ्या महायुद्धात शेकडो चिनी मुलाना वाचवून फार्मोसीमध्ये एक अनाथाश्रम चालवणाऱ्या एका मिशनरीची ती कहाणी होती आणि ती एक सत्यकथा होती. मुळचा कनवाळू स्वभाव असणाऱ्या इन्ग्रिडने एक व्रत म्हणून मिशनरी वृत्तीने ती भूमिका केली. या चित्रपटामुळे अनाथ मुलाविषयी सहानुभूती तिच्या मनात निर्माण झाली.

त्या अनाथाश्रमाला तिने नंतर भेट दिली. अपुऱ्या सोयीत तडफडणारी ती मुले तिला पाहवेनात. मग सगळया युरोप, अमेरिकेचा दौरा करून तिने पैसे गोळा केले आणि ती अनाथाश्रमाना मदत देत राहिली.

आपण साकार करत असलेल्या व्यक्तीरेखेत आपण किती गुंतू शकतो याचे इन्ग्रिड म्हणजे परमोच्च उदाहरण आहे. तिने मिशनरी वृत्त फक्त पडद्यावरच साकार केली नाही तर प्रत्यक्षात सुद्धा ती व्यवहारली. पडद्यावर देशभक्त साकारून प्रत्यक्षात स्मगलिंगमध्ये गुंतणाऱ्या आपल्या हिरोच्या पुढे हे उदाहरण ठेवायला हरकत नाही.

याशिवाय इतर अनेक सामाजिक कार्यात इन्ग्रिड अगदी हिरीरीने भाग घेत असे. आपल्या तब्बेतीची पर्वा न करता तिची धडपड चालू असे. १९७३ च्या सुमारास तिला कॅन्सरने गाठले, डॉक्टरनी पूर्ण विश्रांतीचा सल्ला दिला तरी इन्ग्रिडने मानले नाही.

आणि आयुष्यातील शेवटची भूमिका या कॅन्सरग्रस्त अवस्थेतच इन्ग्रिडने पुरी केली. ही भूमिका इस्रायली पंतप्रधान गोल्डा मायर यांची होती. टेलिव्हिजनने या चार तासाच्या चरित्रपटासाठी इन्ग्रिडची निवड केली होती.

या चित्रपटासाठी इन्ग्रिडने अफाट मेहनत केली. इस्रायलमध्ये अनेक वेळा जाऊन तिने गोल्डा मायरना प्रत्यक्ष पाहिलेल्या, त्यांच्याशी जवळून संबंध आलेल्या सर्वांच्या प्रदीर्घ मुलाखती घेतल्या. गोल्डावर चित्रित करण्यात आलेले अनेक न्युजरिल्स तिने प्रत्यक्ष अनेक वेळा पाहिले. गोल्डाची चाल, बोलण्याची पद्धत हावभाव या सगळया गोष्टी जशाच्या तशा प्रत्यक्षात उतराव्यात म्हणून तिने तास न् तास रियाझ केला.

आणि मग जाडजूड, गिड्डी अघळपघळ कपडयातील गोल्डा तिने हुबेहुब उभी केली. ही फिल्म तयार होत असताना, गोल्डा साकार होत असताना इन्ग्रिड अक्षरशः मृत्यूशी झुंज घेत होती. आपल्या यातना तिने कोणाला दाखवून दिल्या नाहीत. हा चित्रपट पूर्ण झाल्याशिवाय मरायचे नाही अशी जणू तिची जिद्दच होती. तिचा उजवा हात सुजायचा, त्याच्यावर सारख बँडेज करायला लागायचे, असह्य वेदना व्हायच्या; पण इन्ग्रिडची त्याच्यावर काहीतरी मजेदार कॉमेंट असायची. इतराना आपल्यामुळे त्रास होऊ नये ही एकच भावना त्याच्यामागे तीव्र असायची त्यामुळे इन्ग्रिडची अवस्था कितपत गंभीर आहे याबद्दल तिच्या अगदी जवळच्या म्हणवणाऱ्या मित्रांनाही कल्पना नव्हती.

पण शेवटचा क्लोजअप जेव्हा घेतला गेला तेव्हा मात्र इन्ग्रिडला राहवले नाही. तिचे डोळे पाण्याने भरून आले—आता येथून पुढे आपल्याला चित्रपटात काम करता यायचे नाही हे तिच्या अभिनयवेडया मनाला कळून चुकले होते. माझा अभिनय काढून घेतलात तर माझा श्वास बंद पडेल असं कळवळून सागणारी इन्ग्रिड, त्या दिवशी मात्र तिचा बांध फुटला, कारण ती वेळ आली होती.

इन्ग्रिडच्या या कामाची सुद्धा आत्यंतिक प्रशसा झाली. त्याबद्दल तिला १९८२ सालचे एम्मी पारितोषिक मिळाले.

२९ ऑगस्ट, १९८२ ला तिच्या ६७ व्या वाढदिवशी इन्ग्रिडने या जगाचा निरोप घेतला.

इन्ग्रिड बर्गमन! निळयाशार डोळयाची

आणि नैसर्गिक सौंदर्याची देणगी मिळालेली अफलातून कलावती! सत्तेचाळीस चित्रपटातून प्रेक्षकांना आणि समीक्षकांना प्रचंड धन देणारी प्रतिभावती! सर्वोत्कृष्ट ऑस्कर पारीतोषिक तिने तीनदा मिळवले आणि एकवार एम्मी पारितोषिक. स्टेज आणि चित्रसृष्टी याशिवाय आयुष्यात शेवटपर्यंत दुसरा विचार न केलेली इन्ग्रिड बर्गमन! तिला लोकांनीही मनःपूत प्रेम, आदर दिला. इन्ग्रिडच्या ऐन बहरात ती इतकी प्रसिद्ध होती की,

'इन्ग्रिड बर्गमन, लंडन'

एवढ्या पत्त्यावर तिला पत्रं मिळत असत. एखाद्या चित्रपटात ती जी फॅशन करेल ती तावडतोब रूढ होत असे. तिने सायकियाट्रिस्ट चितारली तर सगळे सायकियाट्रिस्ट इन्ग्रिड बर्गमनसारखे दिसण्याचा आटोकाट प्रयत्न करीत असत. एखाद्या चित्रपटात इन्ग्रिड बर्गमन मेकअप्‌शिवाय वावरली तर तिचा नवा चित्रपट येईपर्यंत सौंदर्य प्रसाधनांचा खप कमी होत असे. एवढी लोकप्रियता आणि आदर फक्त नशीबवंतानाच मिळत असतो.

इन्ग्रिडला चार मुलं होती. या चार मुलांसाठी ती एक अत्यंत प्रेमळ अशी आई होती. आपल्या मैत्रिणीसाठी मनमुराद हसणारी, आत्यंतिक आतिथ्यशील आणि मनसोक्त शाम्पेन पिणारी अशी ही हवीहवीशी वाटणारी मैत्रिण होती. रॉबर्टो रोझेलिनीसारख्या प्रतिभावंत दिग्दर्शकासाठी ती सात समुद्र ओलांडून येणारी प्रेयसी होती आणि प्रेक्षकांसाठी कधी वधु, कधी संन्यासिनी, शिक्षिका, कधी मिशनरी, कधी अविचल गोल्डा मायर अशा अनेकविध भूमिकातून कलानंद देणारी अभिनेत्री होती आणि एवढ्या सगळ्या विविध भूमिकांत इन्ग्रिड बर्गमन नावाचे जे व्यक्तिमत्व होते त्याच्या विविध अंगी छटा, विविध पैलू जे जगाला दैदिप्यमान होऊन दिसले त्याचा कधीच कोणाला विसर पडणार नाही. तिच्या शब्दात सांगायचे झाले तर तिच्यामध्ये एक 'सिंह' होता ज्याचा राजेशाही डौल आणि अविरत शक्ती यांना माणसात तोड सापडणार नाही.

इन्ग्रिड बर्गमनचे मर्त्य शरीर विश्रांती घेत पहुडले असले तरी इन्ग्रिडची कला मात्र अनेक शतके भावी पिढयांना मार्गदर्शन करीत राहील.

□




शोभा भागवत

# पालकपणाचा राजीनामा

विश्वास सध्या पाचवीत आहे. त्याच्या वयाच्या मुलानी ज्या समंजसपणे, व्यवस्थितपणे वागावं तसं तो वागत नाही. थिरथिरेपणा फार करतो, जेवायला बसला तरी सांडून ठेवेल. तोंडाला सगळं खरकटं लागलेलं त्याच्या लक्षात येणार नाही. एखादं काम करायला सांगितलं तरी धडपडेल, तोडेल, फोडेल, पाडेल. अभ्यास शांतपणे बसून करणार नाही. अंघोळ स्वच्छ करणार नाही. मनासारखं काही झालं नाही तर लहान मुलासारखा रडेल.

त्याचे आईवडील फारसे न शिकलेले, शिवाय घरात आजी. लहानपणी सर्वांनी पहिला मुलगा म्हणून खूप लाड केले विश्वासचे. आई आणि आजी त्याला कायम लाडानंच वागवायच्या. वडील लाड करायचे; पण काही मनाविरुद्ध वागला तर फाडकन थोबाडीतही मारायचे. ते स्वतः त्याला भांग पाडून द्यायचे. कपडे घालून द्यायचे. त्याचे कपडे नेहमी भारी कापडांचे असावेत अशी दक्षता घ्यायचे.

हळूहळू या मंडळींच्या लक्षात यायला लागलं की, विश्वास आई आणि आजीचं मुळीच ऐकत नाही. हळूहळू आई-आजीची भाषा बदलली. कायम लाडाऐवजी कायम तक्रारी.

हा फुटक्या हाताचाच आहे.
हा अजागळच आहे.
याला अभ्यास नको.
हा उनाडच आहे.
हा आम्हाला जुमानतच नाही.
फक्त वडलांना घाबरतो.

त्यामुळे मग काही झालं की तुला कोंडून घालीन, बाबांना सांगीन, पोलिसाला बोलावीन अशा धमक्या त्या द्यायला लागल्या, तरी विश्वासवर परिणाम नाही.

सुटीत विश्वास आमच्याकडे रहायला आला होता पंधरा दिवस. आणि नंतर घरी गेला तेव्हा काही दिवस खूप शहाण्यासारखा वागला होता. हळूहळू पुन्हा मूळ पदावर आला.

ह्या मुलाचा अभ्यास करताना मला असं वाटलं की, मुलगा मुळात चलाख आहे, प्रेमळ आहे, कामाचा उरक आहे त्याला पण त्याच्या मनात खूप गोंधळ आहे.

हा गोंधळ त्याच्या बोलण्याच्या पद्धतीतही दिसतो. वाक्यं संपूर्ण बोलायची नाहीत. अर्धवट वरवर वरवर बोलायचं. त्याच्या मनातला गोंधळ कशाबद्दल आहे हे शोधून काढताना मला आढळलं की आपण खरे कसे आहोत हे विश्वासला उमगत नाही आहे. त्याच्यातल्या चांगुलपणाला घरात दाद मिळत नाही आहे आणि चुकतं आहे ते का हेही त्याला समजावून सांगितलं जात नाही.

खरं तर प्रेमळ म्हणावं अशा कुटुंबात विश्वाससारख्या मुलाची ही दिशाभूल कशी होते?

विश्वासच्या घरातल्या मोठ्या माणसांनी विश्वासला कायम लहान मूल म्हणूनच वाढवलं. त्याच्या वयाला समजतील त्या गोष्टी त्या त्या वेळी त्याच्याशी बोलल्याच गेल्या नाहीत. त्याचे लाड करतानाही आपण पालक आहोत हे मूल आहे ही भूमिका होती, त्याला धमक्या देतानाही.

तू लहान आहेस. हेच त्याला नकळत सुनावलं जात होतं आणि त्याला फाडकन थोबाडीत मारतानाही त्याची जागा त्याला दाखवली जात होती.

आता तुम्ही म्हणाला, पालक म्हणून आईवडलांनी नाही वागायचं तर काय म्हणून वागायचं?

मानसशास्त्र सांगतं की, आपल्या प्रत्येकात एक मूल असतं, एक पालक असतो, एक समंजस प्रौढ असतो. पालक म्हणून आपण दुस-

ऱ्याशी वागतो तेव्हा दुसऱ्यानं कायम मूल म्हणूनच वागावं अशी आपली नकळत अपेक्षा असते. हे घरातच नाही तर दोन मित्रांमध्ये, मैत्रिणींमध्ये, सहकाऱ्यांमध्ये, मालक, नोकर संबंधांमध्येही दिसून येतं. स्वतःकडे पालकत्व घेऊन दुसऱ्याची काळजी घेणारं, प्रेमळ माणूस म्हणून कुणी वागायला लागलं आपल्याशी की, आपल्याला हळूहळू कंटाळा येतो. आपल्याला सतत मूल म्हणून रहायचा कंटाळा येतो. आपण प्रौढ म्हणून अशा माणसांशी बरोबरीच्या नात्यानं बोलायला जावं तर ती अस्वस्थ होतात लगेच थप्पड मारून आपल्याला मूल बनवू पाहतात.

मुलगा पस्तीस चाळीस वर्षांचा झाला तरी काही आया ( बायकोही ) त्याच्या खाण्यापिण्याची त्याला काही समजत नाही अशा थाटात काळजी घेतात, त्याचे लाड करून त्याला आंजरतात, गोंजारतात आणि काही पुरुष असे लाड करून घेतात. तेव्हा त्या दोघांमधलं पालक–मूल हे नातं त्यांना सोईचं वाटत असतं. आईचंही मन सुखावत असतं आणि मुलगा त्याचा फायदा घेऊन ‘ मूल ’ रहात असतो.

घरी खूप लाड झालेल्या तरुण मुला–मुलींना लग्नानंतर आपल्या जोडीदाराशी अनेकदा जमवून घेता येत नाही. याचं कारणही हे नातं असू शकतं. मुलीला नेहमी मूल म्हणून वागायचीच सवय असते. त्यात गोड वागणं, पालकांच्या मनासारखं वागणं, स्वतंत्र निर्णय न घेणं, हट्ट करणं, कौतुकाची अपेक्षा करणं, दुसऱ्यानं आपल्याला सांभाळावं अशी अपेक्षा ठेवणं हे सगळं येतं. नवरा जर अशा मुलीशी प्रौढ म्हणून वागू लागला, बरोबरीच्या नात्यानं वागू लागला तर तिला हा नातेबदल मानवत नाही. मग तो माझी पर्वा करत नाही, त्याला माझी किंमत नाही आदी तक्रारी सुरू होतात.

आपल्या मुलांना कायम ‘ लहान ’ म्हणून वागवलं, प्रौढपणे त्यांच्याशी बरोबरीच्या नात्यानं बोलणं, वागणं, काही बाबतीत त्यांचा सल्ला विचारणं, त्यांच्या मताला मान देणं, त्याचा आत्मविश्वास वाढवणं, आत्मप्रतिष्ठा जपणं हे केलं नाही तर मूल वाढत नाही. ते मोठ्या वयातही ‘ लहान ’ असल्यासारखं वागतं. मग आपण त्याला ‘ वेडं ’ म्हणतो पण त्याच्या मनाचा गोंधळ आपणच केलेला असतो.

विश्वासला आपलं घर सोडून दुसरीकडे रहायला जाऊन हेच शिकायला मिळालं. दुसऱ्या घरातली माणसं आपल्याला ‘ लहान ’ समजत नाहीत. ती आपल्याकडून वेगळ्या अपेक्षा करतात. त्यांच्या अपेक्षेप्रमाणे आपण वागायला हवं ह्या अनुभवानी त्याला शहाणं केलं.

मूल मोठं व्हावं, शहाणं व्हावं असं तोंडानी बोलत, मनात ठेवत प्रत्यक्षात आपण त्याला लहानच ठेवत असतो. तोंडी संदेशापलीकडे आरपार मूल आपल्याला पहातं, आपण ‘मूल’ रहाण्यातच पालकांना समाधान आहे हे ते जाणतं आणि तसं वागत राहतं.

विश्वासनं शहाणं व्हायला हवं असेल तर त्याच्या पालकांनी सतत पालक म्हणून वागणं सोडून द्यायला हवं. त्यांनी ‘ प्रौढ ’ व्हायला हवं. पालकपणाचा राजीनामा द्यायला हवा. □

---

डार्विनचे वेगळेपण हे की त्याने माणसाला ‘ माणूस ’ केले. मनुष्यात ‘ ईश्वरी ’ अंश आहे, तसेच कोणा एकाच्या पापामुळे मनुष्यजन्म प्राप्त झाला आहे, या दोन्ही धार्मिक असत्यांच्या मगरमिठीतून त्याने माणूस मुक्त केला.

पण भारतीय समाजाला ही मगरमिठी अजून पूर्ण सोडवता आलेली नाही. माणसातील जाती-पोटजाती थेट परमेश्वराने निर्माण केल्या आहेत अशी आपली श्रद्धा आहे.
म्हणूनच डार्विन चरित्राचा अभ्यास आज उपयुक्त ठरेल.

**चार्ल्स डार्विन**

**व्यक्ती, क्रांती आणि उत्क्रांती**

**लेखक : भा. रा. बापट**

डेमी आकार, पृष्ठे : १८२
भरपूर आकृत्या व साधार
विवेचनासह प्रकाशित झालेली
पहिली आवृत्ती.

**किंमत : रुपये बत्तीस**

शाळा कॉलेजच्या ग्रंथपालांनी
त्वरित मागणी करावी.

राजहंस प्रकाशन

१०२५ सदाशिव, नागनाथ पाराजवळ
पुणे ३०.

---

## रंगभूमी

### आवर्जून पाहावे असे मुक्तनाटच

# मुलगी झाली हो !

वि. भा. देशपांडे

---

'मुलगी झाली हो !' हे मुक्तनाटच अनेकांच्या परिचयाचे झाले आहे. एक तर प्रयोगांचे सातत्य आणि दुसरे म्हणजे दूरदर्शनवर झालेले नाटचावलोकन. मुंबईची स्त्री मुक्ती संघटना यांच्या वतीने हे प्रयोग पेश होतात. दोनशेच्या जवळपास या नाटकाचे प्रयोग झालेले आहेत. मुख्यतः ते निरनिराळ्या वक्त्यांमध्ये, कार्यालयांमध्ये किंवा अशाच खाजगी ठिकाणी. त्यामुळे अनेकांना या प्रयोगाविषयी पुरेशी माहिती नाही.आता दूरदर्शनमुळे अनेकांना माहिती होऊन काहीसा चांगला बोलबालाही झाला आहे.

या मुक्तनाटचाचे प्रयोग कमानी (प्रोसिनिअम) रंगमंचापेक्षा चौकटीबाहेच्या जागेवर घडण्यातच औचित्य आहे. अशाच ठिकाणी हे प्रयोग झाल्याने मोठ्या प्रमाणात प्रसिद्धीही मिळणे शक्य नव्हते. प्रसिद्धीसाठो प्रसिद्धीची गरज नाही; पण अधिकात अधिक लोकांपर्यंत प्रयोग जाणे महत्त्वाचे. तशी यंत्रणा उपलब्ध होणे किंवा करून देणे आवश्यक आहे.

'मुलगी झाली हो !' या शीर्षकातच त्याच्या नाटचविषयाची स्थूल कल्पना येते. आपण वरकरणी कितीही आधुनिक झाल्याचा किंवा असल्याचा दावा करीत असलो, विज्ञानयुगात राहून अण्वस्त्रांच्या गोष्टी करीत असलो तरी काही गोष्टींच्या दृष्टिकोनात आपली पारंपारिकता एकाच जागी ठप्प झाल्यासारखी आहे. जर आपल्याला मुलगी झाली किंवा सलग दोन–तीन मुलीच असल्या तर माता-पित्यांकडे आपण दया बुद्धीने पाहतो. एक चमत्कारिक पातळीवरची सहानुभूती, कणव आपल्या नजरेत किंवा स्वरात जाणवत राहते. एखादा अडाणी, अशिक्षित माणूस दैववादाच्या आधीन होऊन जर भाबडेपणाने म्हणाला की, ही सारी देवाची करणी, त्याच्या मनात असेल तसे होईल तर एक वेळ त्याच्या अडाणीपणाच्या आड तो लपू शकेल. पण चांगली सुशिक्षित, सुसंस्कृत माणसे जेव्हा घरात मुलगी जन्माला आली की जी उदासीन प्रतिक्रिया व्यक्त करतात ते पाहून थक्क व्हायला होते ! विज्ञानयुगात राहून विज्ञानदृष्टी असणे आणि त्या अंगाने जगणे हे जसे दुर्मीळ असते तसेच शिक्षित, सुसंस्कृत असूनही विचाराने प्रगत असणे दुर्मीळच असते ! जन्म ही माणसाच्या स्वाधीनची गोष्ट नाही. त्यामुळे त्याची जात, लिंग, धर्म याची निवड तो करू शकत नसतो हे जर नेमकेपणाने कळाले तर मुलगी झाल्यावर तिच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलू शकेल.

मुलगी झाली तर अनेक अर्थाने वाईट वाटून घेणारा समाज आहे. एक तर मुलगी हे परक्याचे धन आणि त्यामुळे तिचा आपल्या घराशी संबंध राहणार नाही. मुलगा हवा तो म्हातारपणाच्या आधारासाठी आणि वंशाचे सातत्य टिकण्यासाठी. वंशसातत्य ही आपल्या घट्ट समजूत आहे. या समजुतीपोटी नवस सायास करून, व्रतवैकल्ये करून मुलगा व्हावा म्हणून मंडळी प्रयत्नात असतात. इतके सारे करून पुत्र प्राप्ती झाली नाहीच तर दत्तक घेण्याची कल्पना आहे. पण काय वाट्टेल ते करून मुलगा हवा. मुलगी नको ही भूमिका असते. घरात मुलगा आणि मुलगी एकेक–दोन असले तर त्यातही मुलाला अधिक शिकवायचा, मुलीला पूर्वी शिकवण्याची पद्धत नव्हतीच, ती आता तुलनेने खूपच आहे. पण तिलाही प्रमाणाबाहेर शिकवायची नाही. एक म्हणजे ती लग्न होऊन परक्या घरी जाणार आणि दुसरे म्हणजे ती अधिक शिकली तर तिच्यापेक्षा अधिक शिकलेला नवरा पाहावा लागणार, हुंडा मोठ्या प्रमाणात द्यावा लागणार इत्यादी.

असे अनेक प्रश्न आणि दृष्टिकोन 'मुलगी झाली हो' या मुक्तनाटचात ज्योती म्हापसेकर यांनी प्रभावीपणाने व्यक्त केलेले आहेत. मुलीच्या जन्मापासूनच तिच्याकडे उणेपणाने, डावेपणाने पाहिले जाते, तिला घरात, समाजात, लग्नाच्या बाजारात कोणत्या पद्धतीने वागवले जाते इत्यादी गोष्टी व्यक्त करणे हे या नाटचलेखनाचे सूत्र आहे. ते सूत्र व्यक्त करण्यासाठी किंवा सादरीकरणासाठी वापरलेली मुक्त पद्धतीही तितकीच परिणामकारी आहे. लेखिका-दिग्दर्शिका या नात्याने ती कामगिरी स्मरणात राहणारी आहे. या सादरीकरणासाठी मुख्यतः लोककलांचे काही प्रकार वापरलेले आहेत. गण-गोळणीचा वेगळा बाज आहे, लावणी-पोवाड्याचा थाट आहे. भारूड आहे. तसेच स्त्रियांच्या संदर्भातले पारंपारिक खेळ, आहेत त्यांचाही वापर आहे. उदाहरणार्थ भोंडला, खुर्ची का मिर्ची इ. याच्या जोडीला निवेदनाचा, संवादांचा आणि प्रसंगदृश्यांचा वापरही महत्त्वपूर्ण आहे.

या मुक्तनाटचाकडे केवळ रंजनाच्या किंवा एरवीच्या नाटचप्रयोगाच्या पद्धतीने पाहून चालणार नाही. कारण रंजनातून प्रबोधन हा या मुक्तनाटचाचा प्रधान हेतू आहे. स्त्री ही अनेक जाचांतून मुक्त व्हायला हवी, तिने स्वतःच्या व्यक्तित्वाच्या, कर्तृत्वाच्या बळावर स्वतंत्र व्यक्ती म्हणून सन्मानाने, पुरुषाच्या बरोबरीने जगायला हवे हा संदेश जनमानसापर्यंत पोहोचावा हा उद्देश आहे. लेखिकेने केवळ वास्तवाचे दर्शन घडवणे एवढाच

सीमित हेतू यात ठेवलेला नाही तर या प्रबोधनात एक दिशाही दाखवली आहे ती म्हणजे जर हा समाज आपल्याला स्वातंत्र्य देणार नसेल, माणूस प्रतिष्ठा देणार नसेल तर बंड करून ते आपण मिळवू ! ही दिशा महत्त्वाची आहे. अशा नाटचाने त्वरित बंड होत नसते हे कोणालाही कळेल, पण निदान जाग येईल, भान येईल एवढे तरी नक्की ! या प्रयोगात उपरोधाचा, उपहासाचा केलेला वापर लक्षणीय आहे. विनोदाच्या अंगाने समाजरूढींवर केलेले आघात अधिकतेने. पोहोचतात. तसे या प्रयोगात पोहोचत होते. संगीत ही या प्रयोगाची आणखी जमेची बाजू. सांघिक पातळीवर ती बाजू चांगली होतीच, पण व्यक्तिगत पातळीवर ज्योती म्हापसेकर आणि मंगला पाध्ये यांचे गायन श्रवणीय होते. प्रयोगाची गुणवत्ता वाढवणारे होते.

जे सांगणे अनेक व्याख्यानांतून, अग्रलेखांतून होईलच असे नाही ते अशा नाटचप्रयोगांतून मोठचा प्रमाणावर होऊ शकते. काही महिन्यांपूर्वी औरंगाबादच्या जिगीषा या संस्थेने 'स्त्री' नामक अशीच नाटिका पेश करून स्त्रीविषयक प्रश्नांकडे लक्ष वेधले होते. हा प्रयत्न निरनिराळचा गावांतून स्वतंत्ररीत्या व्हायला हवा. ज्या व्यक्तींना, संस्थांना ही जाग यावी असे वाटते त्यांनी नाटचमाध्यमातून ते व्यक्त करायला हवे.

'मुलगी झाली हो !' हा मुंबईच्या संघटनेने पेश केलेला प्रयोग आवर्जून पाहावा आणि इतरांना पाहण्यास सांगावा इतक्या योग्यतेचा आहे. □

---

चित्रपट

## नवं आकर्षण–थ्री डी फिल्म



थ्री डायमेन्शनल फिल्म्स् हे चित्रपटसृष्टीतलं अगदी ताजं आकर्षण. मूक चित्रपटांकडून बोलपटांकडे, कृष्णधवल चित्रपटाकडून रंगीत चित्रपटांकडे, ३५ एम एमकडून ७० एम. एम. कडे अशी काळानुसार सतत होत गेलेली चित्रपटसृष्टीची प्रगती आता थ्री डी फिल्मसच्या टप्प्याशी येऊन थडकलीय. नव्या नव्या कल्पना ताबडतोब राबवण्यात पुढाकार घेणाऱ्या दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीनं थ्री डी फिल्म्स् या नव्या स्थित्यंतराकडं आपला मोहरा वळवला आणि 'माय डियर कुट्टीचेतन' ही पहिली थ्री डी फिल्म तयार केली. गेल्या चार वर्षांत जगात तयार झालेल्या अंदाजे सोळा फिल्म्स्च्या पार्श्वभूमीवर गेल्या दोन–चार महिन्यांच्या अल्प कालावधीत जवळजवळ वीस ते बावीस थ्री डी फिल्म्स् तयार करण्याच्या दृष्टीनं झालेली तयारी– थ्री डी च्या वाढत्या प्रस्थाची स्पष्ट कल्पना द्यायला पुरेसं आहे.

चित्रपटसृष्टीत नव्या नव्या स्थित्यंतरांविरुद्ध नेहमीच गहजब झाला; पण दूरदर्शन आणि व्हीडीओच्या आक्रमणानं मात्र चित्रपट सृष्टीवर हवालदिल होण्याची पाळी आली. कारण दूरदर्शन आणि व्हीडीओमुळं चित्रपटच प्रेक्षकांच्या घरात शिरले होते. साहजिकच त्याचा परिणाम चित्रपटसृष्टीला भोगावा लागला दूरदर्शन आल्यानंतर जेवढी धास्ती प्रत्यक्षात घेतली गेली होती, त्या अपेक्षेत फारसे परिणाम दिसून आले नाहीत. निदान चित्रपटगृहातील गर्दीवर तरी गदा आली नाही. म्हणजे दूरदर्शनवर नित्यनेमानं दर आठवडचाला चित्रपट पाहात असूनही चित्रपटगृहात जाऊन चित्रपट बघणं–याचं प्रेक्षकांना अप्रूप होतच. कारण एक तर दूरदर्शनचा कृष्णधवल पडदा आणि दुसरं म्हणजे दूरदर्शनवर दाखवले जाणारे चित्रपट जुने असल्यानं नव्या चित्रपटांची प्रेक्षकांची भूक भागणंच शक्य नव्हतं, त्यामुळं चित्रपटसृष्टीला भेडसावणारा धोका पुष्कळ अंशी कमी झाला होता; पण पुढं हाच धोका व्हीडीओनं निर्माण केला. कारण चित्रपटगृहात चित्रपट लागायच्या आधीच व्हीडीओवर येऊ लागले आणि याच गोष्टीचा फायदा घेत धडाधड व्हीडीओ कोचेस, व्हीडीओ पार्लर्स निघाली. त्यामुळं दूरदर्शनमुळं नाही तरी व्हीडीओमुळं चित्रपटसृष्टीचं भवितव्य धोक्यात आलं. व्हीडीओच्या या वाढत्या प्रस्थाला सध्या तरी थ्री डी फिल्म्स्चा उपयोग करूनच शह देता येणं शक्य आहे, असा एक दिलासा चित्रपटवाल्यांना मिळाला तर नवल नाही.

थ्री डी फिल्म्स्विषयीचं पहिलं सेन्सेशन निर्माण केलं ते अप्पचेन या मद्रासमधील दिग्दर्शकानं तयार केलेल्या 'माय डियर कुट्टीचेतन' या चित्रपटानं. अप्पचेन यांच्या भूतकाळावर नजर टाकली की, लक्षात येतं की हा माणूस कसा नव्या शोधांनी भुललेला आहे. कारण चित्रपटसृष्टीत आलेल्या प्रत्येक नव्या स्थित्यंतराचं, शोधाचं त्यांनी नेहमीच उत्साहानं स्वागत केलंय. ही नवी वाट चोखाळून पाहण्याचं धाडस केलंय आणि त्यात त्यांना यशही मिळालंय. 'थाचोली अबू'च्या निमित्तानं त्यांनी सिनेमास्कोप चित्रपट निर्माण करण्याचा प्रयत्न केला. तर भारतातील पहिला सेवन्टी एम. एम. चित्रपट तयार करण्यातही त्यांनीच बाजी मारली साहजिकच थ्री डी. फिल्म तयार करण्याचा मोह त्यांना झाला आणि त्यातही त्यांनी आघाडी मारली– याचं फारसं आश्चर्य वाटायला नको अर्थात इतर वेळेस नव स्थित्यंतर राबवण्यात त्यांनी

पुढाकार घेतला असला तरी त्यातील यशाची त्यांना खात्री होती; पण थ्री डी फिल्म्स्च्या बाबतीत मात्र ते काहीसे साशंक होते आणि त्यामुळंच अशा प्रकारची फिल्म निर्माण करण्यात पुढाकार घेण्याचं धाडस करावं, असंही त्यांना वाटत नव्हतं; पण अप्पचेन यांच्या मुलानं परदेशात अनेक थ्री डी फिल्म्स् पाहिल्या आणि तेव्हापासूनच त्याच्या डोक्यात थ्री डी फिल्म्स्चे वारे वाहायला लागले होते. त्यासाठी त्यानं परदेशात राहून स्टिरिओव्हीजन सिस्टिमचं शिक्षण घेतलं आणि त्याप्रमाणे ' माय डियर कुट्टीचेतन ' ही पहिली थ्री डी फिल्म मल्याळममध्ये पस्तीस लाखात तयार झाली. हीच फिल्म पुढं तामिळ, तेलगूत डब झाली आणि हिंदीत ' छोटा चेतन ' या नावानं आली. पस्तीस लाखात तयार झालेली ही फिल्म आज कोटीच्या घरात फायदा मिळवते आहे. साहजिकच खर्च कमी आणि फायदा जास्त अशी समजून होऊन अनेकजण थ्री डी फिल्म्स्कडे ओढले गेले. याच आकर्षणातून ज्या अनेक थ्री डी फिल्म्स्च्या घोषणा झाल्या त्यात कमीत कमी चार ते पाच हनुमानावरच्या फिल्म्स् आहेत. परदेशी कल्पना घेऊन तयार करण्यास येणाऱ्या चित्रपटांची संख्याही कमी नाही. ' सी ड्रीम्स ' या अमेरिकन थ्री डी डॉक्युमेंटरीवर आधारीत ' सागर ' ही थ्री डी फिल्म तयार होत असून पाण्याखाली चित्रीत केलेली भारतातील पहिली थ्री डी फिल्म अशा प्रकारे या फिल्मची जाहिरात केली जात आहे आणि या जाहिरातीमुळं या चित्रपटाचं वितरण मात्र झटक्यात झालं, ' टारझन अँड दी एप मॅन ' या बहुचर्चित चित्रपटावर तयार होत असलेली थ्री डी फिल्म हे सध्याचं आकर्षण आहे. यात विजयेंद्र आणि पवित्रा अनुक्रमे टारझन आणि बो डेरेकचं काम करत आहेत. अर्थात यातल्या बऱ्याच फिल्म्स् अद्याप अपूर्णावस्थेत असल्या तरी रोमू सिप्पी यांची ' शिवा का इन्साफ ' मात्र पूर्ण झाली असून लवकरच प्रदर्शित होण्याच्या मार्गावर आहे. ' शिवा का इन्साफ ' ही दुसरी थ्री डी फिल्म आणि त्यात जॅकी श्रॉफसारखे नावाजलेले कलाकार आहेत. या गोष्टीचा ' शिवा का इन्साफ ' ला फायदा होऊ शकेल.

थ्री डी फिल्म्सना मोठ्या प्रमाणावर उचलून धरलं गेलं असलं तरी इतर नेहमीच्या चित्रपटनिर्मितीच्या तुलनेत थ्री डी फिल्म्सचा हा मार्ग काही फार सरळ आणि सुखाचा नाही. कारण पहिली गोष्ट म्हणजे थ्री डी फिल्म्स तयार करण्यासाठी लागणाऱ्या विशिष्ट थ्री डी कॅमेऱ्यांची कमतरता. स्टिरिओव्हीजन सिस्टीम आणि एरोव्हीजन सिस्टीम अशा दोन प्रकारे थ्री डी फिल्म्स बनवण्यात येतात आणि या दोन्ही पद्धतींचे फायदे–तोटे आहेतच. सध्या दोन तयार थ्री डी फिल्म्सपैकी ' माय डियर कुट्टीचेतन ' स्टिरिओव्हीजन सिस्टीमनं तर ' शिवा का इन्साफ' एरोव्हीजन सिस्टीमनं तयार करण्यात आला आहे. या कॅमेऱ्यांच्या किमती जवळ जवळ वीस लाखाच्या घरात जाणाऱ्या असून या प्रकारचे कॅमेरे अद्याप आपल्याकडे तयार होत नाहीत. त्यामुळं हे कॅमेरे मिळवण्यासाठी अक्षरशः झुंबड उडाली आहे. ' शिवा का इन्साफ ' पूर्ण झाल्यानंतर मद्रासला पाठवलेले दोन्ही कॅमेरे १९८६ पर्यंत बुक झालेले आहेत.

थ्री डी फिल्म्सचा आणखी एक दोष म्हणजे या फिल्म्सच्या मर्यादित प्रिंटस्च काढता येतात. नेहमीच्या फिल्मच्या जशा ३०–४० प्रिंटस् काढून एकाच वेळी अनेक ठिकाणी हा चित्रपट प्रदर्शित करता येतो, ती शक्यता थ्री डी फिल्म्स्च्या बाबतीत नाही. त्यामुळं फिल्म प्रदर्शित करण्यावरच मर्यादा येतात आणि निर्मितीचा खर्च भरून निघायलाही वेळ लागतो. तसंच थ्री डी फिल्म्स्चा परिणाम जास्त चांगला होण्यासाठी ज्या प्रकारच्या स्क्रीनींग, साऊंडच्या सोयी असायला हव्यात, त्या दुर्दैवानं आज कित्येक चित्रपटगृहात नाहीत. त्याचा प्रतिकूल परिणाम या थ्री डी फिल्म्स्वर होतोय. याशिवाय सेन्सॉरचा प्रश्न. थ्री डी फिल्म्स्चं वाढतं प्रस्थ सेन्सॉरला महागात पडेलसं वाटतंय. आधीच चित्रपटांबरोबरच व्हीडीओंची जबाबदारी सेन्सॉरच्या गळ्यात पडलीच आहे. त्यात आता थ्री डी फिल्म्स्ची भर पडलीय. कारण थ्री डी फिल्म्स्मधले प्रसंग तेच असले तरी या फिल्म्स् पाहण्याच्या विशिष्ट पद्धतीमुळं त्या प्रसंगातला अर्थ मात्र बदलण्याची शक्यता आहे आणि ही बाब सेन्सॉरला डोकेदुखी निर्माण करू शकेल. कदाचित त्यासाठी सेन्सॉरच्या गाईडलाईन्सही बदलाव्या लागतील.

आज ' छोटा चेतन 'चे भरघोस यश सगळ्यांच्या डोळ्यासमोर आहे आणि त्यामुळे जो तो भारावल्यासारखा थ्री डी फिल्म्स्च्या मागं लागला आहे; पण उद्या मोठ्या प्रमाणावर थ्री डी फिल्म्स् तयार होऊ लागल्या, स्पर्धा वाढू लागली म्हणजे हे प्रश्न अधिक तीव्र होतील; पण थ्री डीनं पछाडलेल्या कोणाला आज तरी त्याची फारशी चिंता नाहीय.

–शुभदा रानडे




आपल्या दोन मुलांत
तीन वर्षांचे अंतर ठेवा
निरोध
तांबी
गोळया
NIRODH
कोणतीहि पद्धत स्वीकारा
davp 84/225

## सप्रेम नमस्कार...।

पृष्ठ १ वरून

बाहेरची आहेत–आणि त्याच्याच भरीला विष्णुशास्त्री इत्यादिकाच्या वृत्तीलाही 'पुणेरी वृत्ती' संबोधिण्याची रूढी पडली आहे

पुणे शहर, पेशवाई, सनातनी वृत्ती, भटाचा कावा, या सर्वांची एकच सांगड घालण्याची प्रवृत्ती रूजली आहे. वस्तुतः त्या सर्व बाबी अलगअलग आहेत आणि अलगच ठेवल्या पाहिजेत, याची जाणीव लोपली आहे घाटावरची महाराष्ट्र भाषा या शब्दामध्ये तो विवेक दिसतो.

मात्र मला स्वतःला त्या शब्दप्रयोगामध्ये काही सिद्धांत दिसत नाही.एक असे की,शास्त्रीबुवांची भाषा विषयपरत्वे आणि लिहिण्याच्या हेतूप्रमाणे वेगवेगळी रूपे धारण करते. ती सर्वत्र संस्कृतप्रचुर पांडित्यदर्शी आहे असे नव्हे. 'केसरी' मधील त्याचे बहुतेक लेख साध्या सरळ घाटणीचे आहेत. तुकारामाची कविता शिक्षणक्रमात दाखल झाली तेव्हा त्याबाबत शास्त्रीबुवानी जे लिहिले आहे ते खोचक असले तरी भाषा पंडिती नाही. असे पुष्कळ दाखले देता येतील. दुसरे असे की, शास्त्रीबुवाची भाषा आणि त्याच्या वडिलांची भाषा यामध्ये भरपूर साम्य सहज दिसेल; परतु तारीफ किंवा निंदा फक्त विष्णुशास्त्र्याच्या भाषेवरच होत याचे नवल वाटते.विष्णुशास्त्री-टिळक अशी जोडी लावली जाते आणि भाषादूषण आगरकराच्या वाट्याला येत नाही, तथापि टिळकाची भाषा रोखठोक सरळ आहे–गीतारहस्याची सुद्धा भाषा धावनी सरळ आहे–आणि उलट आगरकर मात्र संस्कृतप्रचुर अलकारिकतेकडे झुकतात, हे लक्षात घेतले जात नाही आणि विष्णुशास्त्री, आगरकर, टिळक हे सगळे पुणेकर. चिपळुणकराच्या आधीचे पुणेकर लेखक जे लोकहितवादी, त्याची भाषा अगदी दुबळी म्हणावी इतकी लपक आहे, दुसरे पुणेकर जे परशुरामतात्याबल्लाळ गोडबोले, त्याची भाषा तशी दुबळी नसली तरी तिच्यात जोम कसा तो अगदी नाही. तिसरे पुणेकर ज्योतीराव गोवदराव फुले, ते उत्तम व्याकरणबद्ध मराठी लिहू शकत, तरीसुद्धा हेतुपूर्वक त्यांनी अगदी परखड रागडया शैलीमध्ये उत्तरोत्तर लिखाण केलेले आहे चौथे पुणेकर मेजर कँडी, त्याची भाषा सरळ सुबोध तरी प्रौढ आहे.

आता 'मुबईकरांची भाषा' म्हणून म्हणावे तर तिच्यातही वेगवेगळी रूपे दिसतात. कॅप्टन जार्व्हिस यानी हाताशी धरलेले क्रमवत, घगवे वगैरे शास्त्री घेतले तर त्याची भाषा अगदीच केविलवाणी आहे. कोठे लठ्ठ सस्कृत शब्द तर कोठे अगदी नवळी शैली असे विचित्र मिश्रण तिच्यात आहे. उलट आद्यशास्त्रग्रंथकार हरि केशवजी पाठारे याची भाषा अगदी स्वच्छ आहे, तिची तुलना कँडीच्या भाषेशी करता येईल. 'मुबईचे वर्णन' लिहिणारे गोविंद नारायण माडगावकर याची भाषा तर सुबोध आणि तरीही रसाळ प्रौढ आहे; परतु मुबईकर गुजीकर, हळवे यांची भाषा फारच संस्कृतप्रचुर अलकारिक आहे बाळमित्रकर्ते छत्रे, बाळबोधकर्ते विनायक कोडदेव ओक हे अनुक्रमे मुबईकर आणि पुणेकर; परतु दोघाच्या भाषेत फार साम्य आहे तशीच भाषानतर धोंडो केशव कर्वे (पुणेकर) आणि धर्मानद कोसबी (पुणेकर) याची दिसते.

तेव्हा कोकण घाट असा भेद कोणत्या तत्त्वावर करावा हे कळत नाही. एवढे मात्र लिहावेसे वाटते की, विष्णुशास्त्र्याची भाषा पुणेरी, ब्राह्मणी, पगडीवाली इत्यादी टीका फारशी बरोबर नाही आणि तिच्यात जेवढे तथ्य आहे ते लागू करावयाचे तर पुण्याबाहेरच्या, अब्राह्मणांनाही तसे दोष देता येतील. अनावश्यक आणि अशास्त्रीय ठरू शकतील अशा वर्गीकरणानी वृथा गैरसमज मात्र होतात. बखरीची भाषा, शाहीराच्या नानाविध भाषाशैली, सताची पदे आणि पडिताची कविता, ग्रामीण आणि स्थानिक बोली, यापैकी कोणाकोणाची कोणाकोणाच्या भाषेवर अधिक छाप दिसते अशा तऱ्हेची चर्चा कदाचित योग्य हाईल.

पण याबद्दल अधिक लिहीत नाही, कारण मराठी माझी मातृभाषा असली तरी तो माझ्या अभ्यासाचा विषय नाही-किंबहुना 'आर्टस (?) कोर्स' मधील कोणताच विषय मी रीतसर शिकलेलो नाही.

विष्णुशास्त्र्याचे गुणदोष वगैरे चर्चेमध्ये पडण्याचे मला कारण नाही. त्याच्या लिखाणामुळे जर काही अनिष्ट घडले असेल तर ते सुधारावयाला आपणाला भरपूर म्हणजे शभराहून अधिक वर्षांचा काळ मिळाला होता. कोणावर त्यानी अन्याय केला असेल, तर दुसरी बाजू आता प्रियोळकर, गं. बा. सरदार, धनजय कीर इत्यादिकानी व्यवस्थित माडलेला आहेच आणि ही दुसरी बाजू आज जास्त प्रमाणात प्रसिद्ध आहे.

पण हे सर्व लिहिले ते अवांतर. मुख्य म्हणजे श्री भट्ट याचा लेख. त्यांनी आपले काम परिचय करून देण्यापुरते आखून घेतले आणि ते अगदी चोखपणे केलेले आहे. आहिताग्नी–उल्लेख किंवा एखादे अनवधानिक वाक्य असल्यास ते, सोडले तर श्री. भट्ट हे कोणत्याही कलाला झुकलेले नाहीत. परिचय तपशीलवार तरी माफक आणि गुणग्राहक तरी अलिप्त असा झाला आहे. हे काम कठीण, ते उत्तम साधले.

'आमच्या देशाची स्थिती' हा निबध सरकारने जप्त केला होता हा उल्लेख असता तर बरे होते.

२५ फेब्रु. ८५ — श. वि. गोखले, दादर

### चिपळूणकर चरित्रासंबंधी

■ २३ फेब्रुवारी ८६ च्या 'माणूस' मधील 'विष्णुशास्त्री चिपळूणकर' चरित्राची ओळख करून देणारा लेख वाचला. चिपळूणकरासबधी आपणास काही अपूर्व, अनुपलब्ध, नवीन माहिती देणारे चरित्र गवसले अशी लेखकाने समजूत करून घेतलेली दिसते. नव्या वाचकाची दिशाभूल होऊ नये म्हणून चार शब्द लिहितो–

'कै. विष्णुशास्त्री चिपळुणकर याचे चरित्र' (बी. ए, हेडमास्तर हायस्कूल यांनी लिहिलेले) प्रथम १८९४ साली पुणे येथील 'सत्यप्रकाश' छापखान्यात छापिले. पृष्ठे डेमी सुमारे ३६०, कापडी १॥ रु, कागदी १। रु. प्रस्तुत चरित्र चिपळूणकराचेच धाकटे बधु ल. कृ. चिपळूणकर यानी लिहिलेले आहे, हे त्या चरित्राच्या चित्रशाळेने छापलेल्या १९२१ मधील आवृत्तीवरून स्पष्ट होते. लेखक म्हणून या पुनरावृत्तीवर ल. कृचेच नाव आहे. तेव्हा 'माणूस' मधील लेखाचे नेमके प्रयोजन काय हे ध्यानी येत नाही. दुसरे असे को, 'चिपळूणकराबद्दल, त्याच्या कार्याबद्दल मराठीत साहित्य उपलब्ध नाही' हे लेखकाच (की सपादकाच) विधान असत्य आहे किंवा अतिशयोक्त तरी आहे. जिज्ञासूसाठी भरपूर साहित्य प्रकाशित आहे. पुस्तकाची नावे देऊन जागा अडवीत नाही. मूळ चरित्राची पहिली आवृत्ती दुर्मिळ असली तरी महत्त्वाच्या ग्रथालयातून उपलब्ध आहे. तीन-चार वर्षापूर्वी स. प. कॉलेजमधील प्राध्यापक गो. रा. कामतकर यानी चिपळूणकर विषयावर प्रबंध लिहून पीएचडीही मिळवली आहे. हा प्रबध थोडया सक्षेपाने प्रकाशित होणे आवश्यक आहे असे मला वाटते.

२३ फेब्रु. ८५ — म. श्री. दीक्षित, पुणे

MANOOS WEEKLY ( Licensed to post without prepayment of postage No-11 ) Regd. No. PNCW-28


या प्रकरणात माझ्या कंपनीनं काही कोटी रुपये मिळवले
मग मी काही लाख मिळवले तर बिघडलं कुठे ?

–कुमार नारायण
विभागीय व्यवस्थापक, दिल्ली ऑफिस
एस्. एल्. एम्. माणेकलाल इंडस्ट्रीज लि.

---

"आम्ही व सैन्य अकाल तख्ताच्या दिशेनं चालत होतो. चहूबाजूनी गोळ्यांचा वर्षाव चालू होता. सहकारी खाली कोसळत होते. डोक्यावर एकदम आवाज ऐकू आला, वर पाहिलं तर एक लहान मूल किंचाळत खाली येत होतं. पुढच्याच सेकंदाला त्याचा स्फोट झाला. रक्तमासाच्या चिंधड्या आमच्या गणवेषावर पडल्या. मग कळलं, डायनामाइट बांधून ते पोर आमच्यावर फेकलं होतं. १९७१ च्या युद्धात मी होतो. पण ईश्वरसाक्ष सांगतो, असे हैवान मी कुठेच पाहिले नाहीत. त्यानी ते मूल मारलं नाही, आमच्यातला उरलासुरला ओलावा मारून टाकला."

–सुवर्णमंदिरातल्या लष्करी कारवाईतील एक अधिकारी

ऑपरेशन ब्लू स्टार पार पडलं आणि सूडाचं चक्र सुरू झालं.
पुढं काय झालं ते ३१ ऑक्टोबरला साऱ्या जगानं पाहिलंच.

---

## हेरगिरी प्रकरण आणि इंदिरा गांधींची हत्या

देश हादरवणारी ही दोन कारस्थानं शिजली कशी ? केव्हा ?
त्यांचे खरे सूत्रधार कोण ? त्याच्या जबान्या काय सांगतात ?
यातून त्यांनी मिळवलं काय ? देशानं गमावलं काय ?
या साऱ्याचा सुन्न करणारा शोध.

# वाट चुकलेली माणसं

**शिरीष सहस्रबुद्धे**

भरपूर छायाचित्रांसह १० मार्चला प्रकाशित होत आहे.

**मूळ किंमत : ४० रुपये । सवलत किंमत : २८ रुपये**

सवलत ३१ मार्चपर्यंत.

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव, पुणे ४११ ०३०.